म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. ५७३

REFBK-0000015

ગ્રંથ
નં. ..........
.........

लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर.



जन्म, शके १७८४,
फाल्गुन शुद्ध १४.

मृत्यु, शके १८२२,
माघ, कृष्ण ९.

# लक्ष्मण बापूजी

उर्फ

# भाऊराव कोल्हटकर यांचें चरित्र.

"As an actor confessed without rival to shine,"

*Goldsmith.*

त्यांच्या सहवासांत बरेच दिवस घालविलेल्या व त्यांच्या

गुणांची व स्वभावाची ओळख असलेल्या

एका [illegible]नें

लिहिलें.

पुणें

" ज्ञानप्रकाश " छापखान्यांत छापलें.

---

सन १९०१.

REFBK-0000015

( सर्व हक्क राखले आहेत )

श्रीमंत सरदार

# संभाजीराव बाबासाहेब आंग्रे

वजारत माब, सवाई सरखेल

लष्कर ग्वाल्हेर

यांस

त्यांची भाऊरावाबद्दल गुणग्राहकता व त्यांच्या
विषयीं विशेष भक्ति पाहून हें पुस्तक
अर्पण केलें आहे.

" To paint fair nature, by devine command,
Her magic pencil in his glowing hand.
A Shakespeare rose : then, to expand his fame
Wide over this breathing world, a Garric came.
Though sunk in death the forms the poet drew
The Actor's genius made them breathe anew.
Though like the bard himself, in night they lay,
Immortal Garric call'd them back to-day ;
And still eternity with power sublime,
Shall mark the mortal hour of hoary Time
Shakespeare and Garric like twin stars shall shine
And earth irradiate with a beam devine. "

**ग्यारिक** नांवाचा प्रसिद्ध नट इंग्लंडांत सन १७१६ त जन्मला व १७७६ मध्यें मृत्यु पावला. यानेंच शेक्सपीयरचीं नाटकें उदयास आणलीं. याच्यासारखा नट अद्याप झाला नाहीं म्हणतात. याच्या थडग्यावर वरील काव्य खोदलेलें आहेत, तें प्रस्तुत चरित्रनायकास बरोबर लागू पडतें.

# प्रस्तावना.

एखाद्या जुन्या शोभिवंत इमारतीचीं, मनाला व दृष्टीला आनंद देणारीं सुंदर व दर्शनीय कलाकुसरीचीं कामें नाहींशीं होऊन तिच्यांत जसे नुसते पायाचे दगड कायम राहतात, त्याप्रमाणें, **किर्लोस्कर मंडळी**च्या पायाच्या दगडावर **मोरोबा, बाळकोबा** आदिकरून जे खांब उभारले होते, व **भाऊरावा**सारखे जे इमारतीला कळस शोभत होते, ते सर्व जाऊन दगड या नांवाची अन्वर्थकता करण्याला प्रस्तुत लेखकच अगदीं जुन्यापैकीं किर्लोस्कर मंडळींत एकटा बाकी राहिला आहे. ही गोष्ट एक प्रकारें उद्वेगजनक आहे; तथापि मंडळीच्या हितचिंतकांनीं व आश्रयदात्यांनीं पुन्हां तिला पूर्वस्वरूपांत आणण्यासाठीं कंबर बांधली आहे हें पाहून प्रस्तुत लेखकाला जो थोडासा हुरूप आला आहे त्याचें, **भाऊरावाचें** चरित्र हें फळ आहे. हें लोकांस आवडलें तर आनंदच आहे हें सांगावयास नको.

रा० रा० **नारायण नरसिंह साठे** ज्ञानप्रकाश छापखान्याचे व्यवस्थापक यांचीच मदत हें पुस्तक बाहेर पडण्याला फार झाली, हें येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं.

**मुंबई,** ता० १८ नोवेंबर १९०१.

# कै० लक्ष्मण बापूजी

उर्फ

# भाऊराव कोल्हटकर यांचें चरित्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय

## संगीताची पूर्वपीठिका.

आठराव्या शतकांत इंग्लंडच्या इतिहासांत चमकणारीं **जान्सन, गिबन, गोल्डस्मिथ, बर्क, फाक्स** आदिकरून जीं रत्नें उदयास आलीं, त्यांतच नाट्य-नैपुण्यांत ज्यानें आपलें नांव अजरामर करून ठेवलें, इतकेंच नाहीं तर **शेक्सपीयर**सारख्या कविमुकुटमणीलाही अप्रसिद्धीरूप अंधःकारांतून, आपल्या नाट्यकुशलतेनें सूर्याप्रमाणें प्रकाशित करून सोडलें, त्या **ग्यारिक**प्रमाणें, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, महाराष्ट्रांतल्या एका सुप्रसिद्ध शहरांत जीं विद्वद्रत्नें उदयास आलीं त्यांतच नाट्यकलेचा उद्धार करणारीं व महाराष्ट्राला भूषणभूत होणारीं दोन रत्नें उदयास आलीं. कोणत्याही देशांत चांगलीं चांगलीं माणसें एकेकाळींच निपजण्याची मधून मधून पर्वणीच येत असते असें आजपर्यंतच्या अनुभवावरून म्हणावें

लागतें. **ग्यारिक** उदयास आला त्याचवेळेस वर सांगितलेले तत्ववेत्ते, इतिहासकार, नाटककार व वक्ते **इंग्लंडांत** प्रसिद्धीस आले. त्याचप्रमाणें **शिवाजी**-च्याच वेळेला **रामदास, तुकाराम,** इत्यादि साधुपुरुष उत्पन्न झाले. **नानासाहेब, माधवराव पेशवे,** यांच्याच कारकीर्दींत, **महादजी शिंदे, मल्हारराव होळकर,** इत्यादि शूर व **सखारामबापू, नाना फडनवीस** यांचेसारखे शहाणे निपजले. **कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरुनाना छत्रे, रानडे, कुंटे,** हे समकालीनच होते. त्याचप्रमाणें **विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर, आपटे, नामजोशी** इत्यादि मंडळी **पुणें** शहरांत चमकूं लागली त्याच-वेळेस कर्मधर्मसंयोगानें **अण्णा**साहेब किर्लोस्करांसारखे अर्वाचीन नाट्याचार्य उत्पन्न होऊन त्यांनीं नाट्यक-लेच्या भावी उत्कर्षाची मुहुर्तमेढच **पुणें** शहरांत रोवून ठेविली म्हणण्यास चिंता नाहीं.

सन १८७९ सालीं **पुणें** शहरांत अग्निनारायणाचा कोप झाला, व याच सुमारास **पु**ण्याच्या आसपास दरोडेखोरांनीं कांहीं दिवस जी धामधूम चालविली होती तिच्यापासून उद्भवलेली अस्वस्थता नुकतीच थंड होऊन १८८० सालीं **पुणें**शहरांत पुनः पूर्ण शांतता नांदूं लागली होती. त्या अवधींत विद्वान् लोकांचें लक्ष निरनिराळ्या गोष्टींनीं सुधारणा करण्याकडे लागून त्या त्या दिशांनीं प्रयत्न करण्यास सुरवात झाली. न्यू स्कूल स्थापन झालें; केसरी,

मराठा पत्रें निघालीं; क्रीडाभुवन उत्पन्न झालें; चित्रशाळा पुढें आली; सारांश, **पुणें** शहर या वेळेस चळवळीचें माहेरघर दिसूं लागलें. एकोपा आणि उत्साह हीं येथें मूर्तिमंत भासूं लागलीं. आणि विद्या आणि कला यांचा जणुं काय हंगामच पुणें शहरांत आला आहे असें त्या वेळेला वाटूं लागलें.

पुणें शहर रसिकपणाबद्दल पूर्वीपासूनच प्रख्यात आहे. पौराणिक नाटकांची आवड या वेळेपर्यंत येथें कायम होती, परंतु आतां मात्र मनोरंजनाच्या कांहीं तरी नवीन तऱ्हेकरितां पुणें शहर बुभुक्षित झालें होतें. गद्यात्मक नाटकाची नवी तऱ्हा नुकतीच अमलांत आली होती. आर्योद्धारक नांवाची मंडळी निघून तींत रा० **देवल, पाटकर** यांसारखे कुशल नट प्रसिद्धीस आले. परंतु थोड्याच दिवसांत कै० **अण्णासाहेब** किर्लोसकरांनीं संगीत नाटकाची कल्पना काढल्याबरोबर तिच्या पूर्वीच्या सर्वच करमणुकीच्या तऱ्हा अपुऱ्या, रूक्ष व फिक्या वाटूं लागल्या. १८८० सालीं **पुण्याला** एक प्रकारें सर्वच शुभ ग्रह आले होते असें वाटतें. कारण, त्या सालीं निघालेल्या संस्था लागलीच जशा भरभराटीस आल्या, त्या प्रमाणें किर्लोस्करांची संस्थाही निघाल्याबरोबर मोठ्या जोरांतच फोफावली. किर्लोस्करांच्या बुद्धिमत्तेची जितकी तारीफ करण्यासारखी होती तितकीच त्यांच्या योजकतेचीही तारीफ करण्यासारखी होती. कारण, त्यांच्या उद्देशाच्या उभारणीला त्यांनीं

पाहिलेलीं दोन माणसें, रा० **मोरोबा वाघुलीकर** व **बाळकोबा नाटेकर** नाटकाच्या कामाला सर्वगुणसंपन्न अशीं होतीं. यांच्यापेक्षां अधिक योग्य माणसें त्यावेळीं मिळणें शक्यच नव्हतें; व पुढेंही अद्याप तशीं मिळालीं नाहींत. तसेंच किर्लोस्करांनीं त्यावेळीं जें नाटक संगितांत आणण्याचें योजिलें होतें, तेंही या मंडळीला योग्य असेंच होतें. नाटकपात्रांच्या अनुरूप नाटक असावें, किंवा नाटकाच्या अनुरूप पात्रें असावींत हा जो नाटकशास्त्राचा सर्वसाधारण नियम आहे तोच **अण्णांनीं** आरंभीं व पुढेंही त्यांनीं जीं स्वतंत्र नाटकें रचलीं त्यांत सारखा पाळल्यामुळें हीं दोन पात्रें संगीताकरितांच जन्मास आलीं आहेत कीं काय असें लोकांस वाटायला लागलें. नाटक ह्मणजे हलका धंदा अशीं त्या वेळेपर्यंत समजूत होती. तरी या दोघांचाही गवयीपणाचा पेषा असल्यामुळें संगीत नाटकाचें महत्व त्यांच्या ध्यानांत सहज येण्यासारखें होतें. **पुणें** शहरांत संगीत शाकुंतल नाटकाचा प्रयोग झाल्याबरोबरच कै० **अण्णा**साहेब किर्लोसकरांच्या बुद्धिमत्वाची वहावा व रा० **वाघोलीकर** व **नाटेकर** यांच्या गुणांची वाखाणणी सर्वत्र होऊं लागली.

यावेळीं **पुण्यां**तील वर्तमानपत्रांत हल्लींसारखा बखेडा नसल्यामुळें एखाद्या नवीन कल्पनेचें योग्य प्रकारें अभिनंदन होत असे. हल्लीं जसें एखाद्या नाटकाचें तिकीट आलेंच तर त्याच्याबद्दल तिकिटाच्याच आकाराचें अनुकूल मत द्यावयाचें किंवा तिकीट न आलें

तर नाटकमंडळीचा 'सूड' ह्मणून तिच्या विरुद्ध कालमच्या कालम खरडावयाचे ही पद्धत आहे तशी त्यावेळेस फारशी नव्हती. वर्तमानपत्रांत नाटकासंबंधानें विरुद्ध लेख आले तरी ते भारदस्तपणानें व मार्मिकपणानें येत असत. पुण्याच्या त्यावेळच्या केसरी, ज्ञानप्रकाश, व शिवाजी व मुंबईच्या नेटिव्ह ओपिनियन इत्यादि पत्रांत संगीत नाटकासंबंधानें अनुकूल व प्रतिकूल असे फारच मार्मिक व वजनदार बहुमतदर्शक लेख आले आहेत.

पुण्यास शाकुंतल नाटकाचे दोन प्रयोग झाल्यावर १८८० च्या ज्ञानप्रकाशाच्या नोव्हेंबर ता० ११ च्या अंकांत पुढील लेख आला आहे:—

Shakuntala the wellknown play by Kalidas was upon the stage during the last fortnight.....................On both these occasions the theatre was excessively crowded...........Every one...... acquitted himself of his part in a creditable manner. But दुष्यंत, शकुंतला and कण्व deserve to be specially mentioned. On the occasion of his meeting शकुंतला, in the lonely bower by the riverside, दुष्यंत, displayed his abilities to such a perfection as to evoke repeated deafening applause from the audience. In the same way the कण्व sustained his character very creditably when शकुंतला was taking

leave of her father. All the spectators were rapt attention itself during the time that the touching scene was being enacted and there were not a few who were actually moved to tears. We conclude this brief notice of the two performances with the expression of our heartfelt thanks to Mr. Anna Kirloskar for his having entertained the Poona public in the manner set forth above. We only hope that the next year when he comes once more amongst us, he will be prepared to entertain us in a similar manner. We have no doubt that if the native stage be under the able guidance of gentlemen like Mr. Kirloskar, it will be improved in time, and the taste of the theatre-frequenting public reformed,

**पुणें** ह्मणजे त्यावेळीं विद्यादेवीच्या भक्तांचें माहेरघर व रसिकपणाचें अग्रस्थान असे. अशा ठिकाणचा प्रेक्षकसमाज काय पुसायचा? पूर्वकालीन स्वयंवराला जमलेल्या किंवा संग्रामास सिद्ध झालेल्या निरनिराळ्या राजेलोकांचा व राजवीरांचा समाज जसा पाहणारांच्या ठिकाणीं अचंबा व उत्साह उत्पन्न करीत असेल त्याप्रमाणें त्यावेळीं **पुणें** व **मुंबई**चा समाज पाहून आनंद, हर्ष व उत्साह उत्पन्न होत असे.

**पुण्या**चे हे कोण **रानडे**, हे **कुंटे**, हे **केरूनाना छत्रे**, हे **शं० पां० पंडित**, हे **टिळक**, हे **आपटे**, हे **आगरकर**; **मुंबई**चे हे कोण **तेलंग**, हे **शांताराम नारायण** वकील, हे **महादेव चिमणाजी आपटे**, हे डा० **कुंटे**, हे, **किर्लोसकर** हे **शंकर मोरो रानडे** अशीं रत्नें त्यावेळीं **पुण्यामुंबई**च्या समाजाला शोभवीत असत व कोणाकडेही पाहिलें तरी निरनिराळ्या प्रकारानें पाहणारांच्या अंतःकरणांत त्यांच्याबद्दल पूज्यभाव उत्पन्न होत असे.

असो, ही अपूर्व लोकरंजनाची कला लोकांपुढें आल्याबरोबर लोकांची अभिरुचि एकदम बदलून गेली. इतकेंच नाहीं तर नाटकाबद्दलचा दुराग्रहही नाहींसा होत चालला. याला दुसरें कारण असें झालें कीं, किर्लोस्करांनीं नाटकाकरितां या दोन गृहस्थांखेरीज इतर जी मंडळी घेतली ती बहुतेक त्यांच्याच कचेरींतील मोठी हुद्देदार असून पदवीधर होती. शिवाय **पुणें** शहरांतील चांगल्या व सन्मान्य गृहस्थांचें सहाय्य मिळाल्यामुळें किर्लोस्करांचें नाटक ह्मणजे प्रतिष्ठित संस्थेपैकीं एक संस्था होऊन बसली.

सन १८८० सालच्या आक्टोबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस **पुणें** शहरांत **अण्णा**साहेब किर्लोस्करानीं संगीत शाकुंतल नाटकाचे चार अंक करून दाखविले. त्या सालीं फक्त **पुणें**शहरांत दोन व **मुंबई**शहरांत एकच असे तीन प्रयोग झाले. परंतु त्यांनीं इतकी लोकप्रियता संपादन केली कीं,

संगीत या नांवानें सर्व महाराष्ट्र दुमदुमूं लागलें. किर्लोस्करांनीं पावसाळयांत त्यांची कचेरी पुण्यास आली ह्मणजे खेळ करावयाचे असा क्रम दोन वर्षे ठेवला. व संगीताची अभिरुचि लोकांत जशी जशी वाढूं लागली तशी ही कला चिरस्थायी करण्याची कल्पना त्यांच्या मनांत घोळूं लागली. या कामाला मोठी अडचण गाणाऱ्या स्त्रीपात्रांची होती. या वेळेपर्यंत शाकुंतल नाटकांतील स्त्रीपात्रांचीं कामें त्यांनीं साध्या पात्रांवर भागवून घेतलीं. परंतु संगीत नाटकाला संगीत स्त्रीपात्रें नसणें हें गौण अंग किती दिवस चालवून घ्यावयाचें? एकीकडे जवळ असलेल्या पात्रांना अनुरूप अशी सौभद्र नाटकाची रचना व दुसरीकडे गाणाऱ्या मुलांचा शोध किर्लोस्करांनीं चालविला होता. यावेळेस किर्लोस्कर-मंडळीच्या साह्यकारी मंडळींपैकीं एक गृहस्थ कै० **विनायकराव** उर्फ रावसाहेब **चौबळ** बी. ए. हायकोर्टांतील एक इंटरप्रिटर यांच्या पाहण्यांत बडोद्यास दोन हरदासाचीं मुलें आलीं होतीं. ती माहिती त्यांनीं सांगितल्यावरून रा: **मोरोबा वाघुलीकर** यांस **ब**डोद्यास लागलींच रवाना करण्यांत आलें.

वीस वर्षांपूर्वी **पुणें**शहर जितकें भरभराटीस आलेलें होतें तितकेंच **बडोदें**शहर सुधारणेच्या कामांत मागसलेलें होतें. हल्लींच्या महाराजांस नुकतीच मुकत्यारी मिळाली होती. त्यामुळें **ब**डोद्यांत हल्लीं ज्या सुधारणा झपाट्यानें चालू आहेत त्यांचा त्यावेळीं—आरंभसुद्धां

नव्हता. त्यावेळीं. तेथें जुने विचार व जुने रीतरिवाज यांचेंच प्राबल्य होतें. तेव्हां अर्थातच तेथें नाटका-संबंधाची कल्पना ह्मणजे अंदाराकडून लोकांनीं करण्याचा धंदा या पलीकडे नव्हती. त्यांतून बालबोध व गृहस्थी बाण्याच्या कुटुंबांत नाटका-संबंधानें अनुकूल ग्रह असण्याचा संभव कमी. तरी **बडोदें** शहर **खंडेराव** महाराजांपासून गाण्यावाजविण्याचें शोकी असल्याबद्दलची प्रसिद्धि होती. त्यावेळीं तेथें **बापू**बोवा नांवांचे हरिदास असत, त्यांचीं दोन मुलें **रामचंद्र** उर्फ **आप्पा** व **लक्ष्मण** उर्फ **भाऊ** हीं देखणीं व गाणारीं असल्यानें **बडोदें** शहरांत बरींच नांवाजलेलीं होतीं. **आप्पाचें** वय त्यावेळीं सुमारें एकवीस वर्षांचें व **भाऊचें** अठरा वर्षांचें होतें. नांवा-प्रमाणें ही शामशबल जोडी पाहून मोरोबा तर खुष झाले. किर्लोस्करमंडळीला गाणारें स्त्रीपात्र मिळवून देणें हें त्यावेळीं "पैजेचा विडा उचलून देण्या" इतकें दुर्घट काम होतें. आपखुषीनें नाटकाच्या धंद्याकरितां आपलीं मुलें देणारे जुन्या लोकांत त्यावेळीं कोणी नव्हते; परंतु किर्लोस्कर मंडळीनें दोन वर्षांत मिळ-विलेला लौकीक **बापू**बोवांचें व त्यांच्या मुलांचें मन वळविण्यास बराच कारणीभूत झाला.

प्रथमतः **आप्पाराव** हे पुण्यांत नाटक पाहण्या-करितां आले. पुण्यांत किर्लोस्करांचे फक्त शाकुंतल नाटकाचेच खेळ चालले होते. ते पाहून **आप्पाराव** यांसही वाटलें कीं, आपल्या गुणांचा प्रभाव दाखविण्याला

ही जागा योग्य आहे खरी. **आप्पारावांस** बडोद्यांत इंजिनीयर खात्यांत नोकरी होती. तरी गाण्याचाही अभ्यास त्यांनीं चांगला केला होता. तसेंच तबला वाजविण्यांत हे कुशल आहेत. सामन्याचा गडी बरोबरीचा असला ह्मणजे त्याशीं खेळणाराला जसें दुप्पट अवसान येतें, त्याप्रमाणें, **मोरोबा, बाळकोबा,** यांच्या बरोबरच्या पहिल्या मैफलींतच **आप्पारावांनीं** आपली छाप चांगली बसविली. या वेळेपर्यंत अशी समज होती कीं, **आप्पाराव** हे स्त्रीपात्राच्या कामाकरितां येणार आहेत; परंतु त्यांनींच होऊन सांगितलें कीं, मी नोकरीचा मनुष्य आहें. तेव्हां माझ्यापेक्षां माझा धाकटा भाऊ तुह्मास अधिक उपयोगीं पडेल, व त्याला मी बडोद्यास गेलों ह्मणजे वडिलांचा रुकार घेऊन पाठवून देतों. असें ह्मणून ते परत गेले. ही गोष्ट १८८२ च्या आगष्टमध्यें घडली; व त्याप्रमाणें भाऊराव हे मुंबईस मंडळी असतांना सपटंबर महिन्याच्या २० व्या तारखेस मंडळींत प्रविष्ट झाले. येथून किर्लोस्कर-मंडळीच्या दुसऱ्या मन्वंतरास सुरवात झाली व प्रस्तुत चरित्रनायकाच्या चरित्रास आरंभ झाला.

## जन्मवृत्त.


इंग्लिश चरित्रकारांना सामान्य स्थितींतून एखादा मनुष्य उदयास आला ह्मणजे, त्याचें जन्मवृत्त देतांना त्याच्या कुळाचा, सात आठ शतकांपूर्वींच्या एखाद्या मोठ्या कुळाशीं बादरायण संबंध जोडून

आपल्या चरित्रनायकाला मोठेपणा देण्याची फार हौस असते. विशेषतः **वुइल्यम दी कॉंकरर,** याच्याशीं त्याचा कोठें संबंध जोडतां आला तर त्या चरित्र-कारांना फारच आनंद वाटत असतो. तसा शोध **भाऊरावां**च्या कुळवृत्तासंबंधानें कोठें लागत नाहीं. व तो करण्याचें कारणही नाहीं; कारण आमच्या इकडच्या मोठेपणाच्या कल्पना पाश्चात्य कल्पनेहून कांहींशा भिन्न आहेत. आमच्या इकडे स्वपराक्रमानें मनुष्य उदयास आला ह्मणजे, तो जन्मतःच थोर कुळांत उत्पन्न झालेल्या मनुष्याच्या बरोबरीचा होऊं शकतो. **रामशास्त्री** प्रभुणे, **होळकर, शिंदे,** यांचे जन्म जरी शागृत, धनगर व हुजरेपणांत झाले होते, तरी आपल्या बुद्धिवैभवानें, मर्दुमकीनें व नेकीनें ते थोरपदास चढून **पेशव्यां**सारख्या प्रभूलाही वंद्य व पूज्य झाले होते. '**गुणिषु नच लिंगं नच वयः**' याची अन्वर्थकता आमच्याकडे चांगली प्रत्ययास येते.


**कोल्हटकर** यांचें घराणें साधें व बाळबोध असून त्यांचें मूळ राहणें **रत्नागिरी** जिल्ह्यांत **संगमेश्वर** तालुक्यांत **मागजव** गांवीं असे. परंतु **भाऊरावां**चे आजे **बडोद्या**स आले ते कायमचेच राहिले. गाय-कवाडींतून यांना प्रथम कथेकरितां २०० रुपये सालीना तनखा होता; परंतु तो पुढें कमी होत होत अलीकडे मुळींच कांहीं मिळेनासें झालें होतें. फक्त कथेवरच या कुटुंबाचा पुढें निर्वाह असे. **भाऊराव** हे पांच भावंडांपैकीं दुसरे असून मुलांपैकीं दुसरे मुलगे

होत. यांचा जन्म शके १७८४ फाल्गुन शुद्ध १४ गुरुवारीं रात्रीं रोहिणी नक्षत्रावर झाला होता. त्यांची जन्म व राशी कुंडली खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

**जन्मलग्न कुंडली.**




**राशि कुंडली.**




यांचें शिक्षण मराठी व गुजराथी कारकुनी करण्याइतकें झालें होतें. शिवाय गवईशिक्षण थोडेसें यांना चांगल्या गुरूकडून मिळालें होतें. यावेळीं तमाशाचेंही प्राबल्य **बडोद्यास** फार असे. त्यामुळें ऐकून ऐकून चांगल्या लावण्याही यांना येत असत. गांवांत **आप्पा** व **भाऊची** जोडी आपल्या गाण्यानें प्रसिद्ध झाली होती;

व यांच्या गुणामुळें अल्पवयांतच यांना नोकऱ्याही मिळाल्या. **आप्पारावाला** इंजिनियर कचेरींत व **भाऊरावाला** पोलिस कमिशनरचे कचेरींत अनुक्रमें २१ व १८ व्या वर्षी कारकुनीची नोकरी लागली. नोकरी करीत असतां आपल्या अंगच्या सौंदर्य व सुस्वर आवाज या दोन गुणांवर आपला अभ्युदय होईल व नाटककलेंत व संगीतांत आपल्यामुळें एक महत्वाचा फेरफार होईल ही कल्पनाही त्या वेळीं **भाऊरावां**च्या किंवा त्यांच्या वाडिलांच्या मनांत नव्हती. परंतु त्यांच्या जन्मकाळच्या ग्रहांची उच्चदशा येण्याबरोबर कोणीकडे **बडोदें** व कोणीकडे **पुणें** असतांना त्यांना त्या ग्रहांनीं इकडे धाडून दिलें. व वर सांगितल्याप्रमाणें हे **मुंबई**स आले.

## मंडळींत प्रवेश.

मंडळीचे खेळ फक्त शाकुंतल नाटकाचे **मुंबई**च्या गेइटी नाटकगृहांत होत होते. यावेळीं मंडळीच्या लोकप्रियतेची परमावधि झाली होती. कै० **डा० अण्णासाहेब कुंटे** बी. ए., एम्. डी., **महादेव चिमणाजी आपटे** एम्. ए., एल्. एल्. बी; **गणेश रामचंद्र किर्लोस्कर** एम्. ए., एल् एल् बी.; **विनायक महादेव पंडित** बी. ए, एल् एल्. बी.; रा० रा० **शंकर मोरो रानडे** बी. ए.; कै० **विनायक भास्कर चौबळ** बी. ए.; रा० रा० **गंगाराम बापसोबा रेळे** बी. ए., एल् एल्. बी. अशांसारखी बडी बडी मंडळी व्यवस्थापक व द्वाररक्षक असत. तसेंच

कै० **तेलंग** व **शांताराम नारायण** यांच्यासारखी मंडळी प्रोत्साहन देण्याला नाटकगृहांत हजर असत. एकदां तिकिटें खपून गेल्यावर दोन दोन रुपये देऊनही नाटकगृहांत नुसता प्रवेश होण्याची मारामार पडे. यावेळीं उणीव जी एक गाणाऱ्या स्त्रीपात्राचीच असे, तीही सुदैवानें दूर झाली. मंडळींत प्रवेश झाल्यापासून सुमारें आठ दिवसांतच पहिली भूमिका **भाऊराव** यांनीं शाकुंतल नाटकांतील नटीची केली. या दिवशीं प्रेक्षकसमाजही नाटकगृहांत इतका भरला होता व मंडळीस प्राप्तीही[1] अशी जब्बर झाली कीं त्यापूर्वीं व त्यानंतर त्या नाटकगृहांत कोणत्याच नाटकमंडळीस इतकी गर्दी व अशी प्राप्ति झाली नव्हती व नाहीं.

**भाऊरावां**चा आवाज जसा मधुर तशींच आंगलोट, वर्ण, चेहेरा वगैरे सौंदर्याचीं अंगें मोहक होतीं. त्यामुळें त्यांचें नटीचें पहिलें,

"**आज मज सहज आला उल्हास**"

हें पद झाल्याबरोबरच, सुत्रधारानें

"**तुझ्या मधुर गानाच्या नादें वेडावुनि हा गेला**"

म्हटल्याप्रमाणें प्रेक्षकांचीही खरोखरच तशी स्थिति झाली. सभाजन चित्रांत रेखल्याप्रमाणें आनंदानें तटस्थ बसले व ज्याप्रमाणें मारुतीनें जन्मतःच एकदम सूर्यमंडळापर्यंत उड्डाण केलें असें म्हणतात त्याप्रमाणें **भाऊरावांनीं** एक रात्रच सोंग घेतल्याबरोबर सर्वतोमुखीं आपलें नांव करून टाकलें. **मुंबईहून** मंडळी–**श्रीमंत सयाजीराव**

---

१ या खेपेला खेळाचें उत्पन्न १५०० रुपये झालें !

**गायकवाड** यांच्या बोलावण्यावरून **बडोद्यास** गेली. **भाऊराव**ही बरोबर गेले होते. परंतु तेथें त्यांचें घर असल्यामुळें वडील मातोश्रीसमक्ष वेष घेणें हें त्यांस प्रशस्त वाटलें नाहीं. व तो निश्चय त्यांनीं शेवटपर्यंत पाळला. वडलांच्याच संमतीनें जरी ते नाटकांत आले होते तरी पुत्रधर्माला अनुसरून त्यांची मर्यादा त्यांनीं शेवटपर्यंत पाळली. वडील, मातोश्री आणि कुटुंब यांच्या दृष्टीस त्यांचा स्त्रीवेष पडलाच नाहीं. वडील होते तोंपर्यंत त्यांनीं मंडळी बडोद्यास नेली नव्हती. व मंडळीबरोबर आपलें कुटुंब घेण्याची त्यांनीं जरी वहिवाट ठेविली होती तरी किर्लोस्करांचें नाटक **भाऊरावांच्या** कुटुंबांनीं पाहिलें नाहीं इतकेंच नव्हे, तर नाटक पाहण्याकरितां शंभर दोनशें कोसांवरून लोक येत असत व नाटकगृह आणि मंडळीचें बिऱ्हाड कित्येक वेळां एके ठिकाणींच असण्याचाही प्रसंग येत असे, तरी नाटक पाहण्याची आतुरता **भाऊरावांच्या** कुटुंबांनीं केव्हांच दर्शविली नाहीं. शेवटीं **भाऊरावांचें** कोणतेंच सोंग व किर्लोसकरांचें नाटक यांपैकीं कांहींच त्यांच्या दृष्टीस पडलें नाहीं तें नाहींच. ही गोष्ट ह्यांच्या चरित्रांत सांगण्यासारखी आहे ह्मणून सांगितली.

## संगीत सौभद्र.

**अण्णासाहेब** किर्लोस्कर या वेळेपर्यंत सरकारी नौकर होते. परंतु **भाऊराव** मंडळींत आल्याबरोबर एक वर्षाची रजा घेऊन गांवोगांवीं फिरून यावें हा विचार त्यांच्या मनांत आला. **बडोद्याहून पुण्यास** आल्यावर संगीत सौभद्र बसविण्यास सुरुवात झाली. संगीत सौभद्राची रचना

जवळ असलेल्या पात्रांना अनुरूप अशीच केली असल्यामुळें तें नाटक इतकें लोकप्रिय झालें कीं, त्या नाटकांत नाटक-दृष्टीनें किंवा ग्रंथ ह्या दृष्टीनें कांहीं दोष आहेत कीं नाहींत हें पाहण्याचें भानच कोणास राहिलें नाहीं व जसें एखाद्या दैविक कृतीकडे दोषदृष्टीनें कोणी पहात नाहीं, त्याप्रमाणें सौभद्र नाटक निर्दोष होऊन बसलें आहे. रा० **वाघोलीकरांचें** अर्जुनाचें काम, **बाळकोबा नाटेकरांचें** नारदाचें व कृष्णाचें काम, कै. **अण्णा-साहेबांचें** बलरामाचें काम व **भाऊरावांचें** सुभद्रेचें काम हीं कामें इतकीं कांहीं अप्रतिम होत असत कीं, त्यांच्या नंतर इतर नाटकमंडळी व प्रत्यक्ष किर्लोस्कर मंडळी जरी सौभद्र नाटक करीत आहे तरी या भूमिकांची बरोबरी होत नाहीं.

याच सुमारास **कोल्हापूरप्रकरणासंबंधीं** संकटांत सांपड-लेले कै० **आगरकर** व रा० रा० **टिळक** यांच्या सन्मानार्थ डेक्कन कालेजमध्यें मेजवानी झाली त्या प्रसंगाला किर्लोसकर मंडळीसही पाचारण होतें. त्या दिवशीं पंक्तींत श्लोक ह्मणण्याची पाळी **भाऊरावावर** आली तेंव्हां,

**" देवी ह्मणे अनार्या "**

ही आर्या म्हणतांना सुमारें पंधरा मिनिटें त्यांनीं जेवतांना मंडळीचे हात खोळंबविले होते. अल्पवय, सभाधीटपणा, सौंदर्य आणि मधुर आवाज इतक्यांची जोड मिळाल्यामुळें **भाऊरावांची** प्रसिद्धी पुण्यांत सौभद्राचा पहिला प्रयोग होण्यापूर्वींच झाली होती. सन १८८२ च्या आक्टोबर महिन्यांत सौभद्र नाटकाच्या तीन अंकाचा प्रयोग पुण्यास

झाला. तो झाल्याबरोबर सर्व शहरात **भाऊ** हें नांव आबालवृद्धांच्या तोंडीं होऊन बसलें. सौभद्र नाटकांत सूत्रधाराची प्रस्तावना होऊन,

**" झाली ज्याची उपवर दुहिता "**

या नटीच्या पदाला सुरुवात झाल्याबरोबरच रंगदेवता नटून बसल्याप्रमाणें भास होऊन नाटकगृह आनंदमय होऊन जात असे. **भाऊराव** मंडळींत आल्यापासून सुमारें दीड महिन्यांतच सुभद्रेची भूमिका **पुण्याच्या** त्यावेळच्या खऱ्या रसिक प्रेक्षकांपुढें पूर्ण अभिनयशुद्ध करून दाखविण्यांत, **भाऊरावांच्या** अल्पवयाच्या बुद्धीची विलक्षण तरतरी तर दिसून येतेच; परंतु त्याबरोबरच त्यांस शिक्षण देणारे कै० **अण्णासाहेब** किर्लोसकर व रा. रा. **गोविंद बल्लाळ देवल** यांचीही कुशलता दिसून येते. सुभद्रेची " व्यर्थ मी जन्मलें थोरकुळीं " " अरसिक किति हा शेला " " बघुनि उपवना " हीं पद्यें लहान मोठ्या स्त्रीपुरुषांच्या तोंडीं झालीं. गाण्याच्या मैफलींतून व वाजंत्र्याच्या वाद्यांतून, संगीताचीं व सुभद्रेचीं पदें निघूं लागलीं व पूर्वीच्या गाण्याची एकदेशीय शास्त्रीय पद्धत जी फक्त तज्ञ लोकांचेंच रंजन करीत असे, तिच्यांत संगीत नाटक निघाल्यापासून–त्यांतून सौभद्र नाटक लोकप्रिय झाल्यापासून–संगीत पदांचा मिलाफ होऊन गाण्याच्या कामांत अजाण व सुजाण अशा दोन्हीं वर्गांचें मन रिझविणारी गाण्याची नवी पद्धत सुरू झाली.

संगीत सौभद्राचे प्रयोग **पुण्यास** झाल्याबरोबर **भाऊरावाची** प्रसिद्धी झाली हें मागें सांगितलेंच आहे. ती

इतकी पसरत चालली कीं, त्या प्रसिद्धीच्यो प्रसाराबरोबर **भाऊरावांच्या** नांवाचाही विस्तार होत चालला. दोन अक्षरीं साधें ऊकारांत नांव जें ' भाऊ ' त्याचें 'भावड्या' झालें. इंग्लिश लोकांत नांवाचा संक्षेप करून नांव देण्याची चाल आहे. तशी आपल्याकडे त्याची वृद्धि किंवा विपर्यास करण्याची बरीच चाल आहे. रामाचें राम्या, नारायणाचें नाऱ्या, त्याचप्रमाणें भाऊचें भावड्या झालें व तें इतकें प्रचारांत आलें कीं, सरकारानें ज्यांना बहुमानानें रावबहादूर, रावसाहेब इत्यादि पदव्या दिल्या असतील, त्यांच्या सुद्धां पदव्यांचा लिहितांना किंवा बोलतांना उपयोग करण्याचें विसरून रहात असेल. परंतु " भावड्या " या नांवाचें **भाऊरावा**संबंधानें कोठेंही विषय निघाला असतां चुकून सुद्धां " भाऊ " हें नांव निघत नसे. इतकेंच नव्हे तर हें नांव इतकें व्याकरणांतील शब्दाप्रमाणें शुद्ध होऊन बसलें कीं, महाराष्ट्रभाषेंतील शब्दसौष्टव माहीत नसणाऱ्यांना " भावड्या " हें नांव विशेषनामांपैकींच एक आहे असें वाटून ते **भाऊरावा**शीं बोलतांना किंवा पत्रव्यवहार करतांना " भावडेराव " " भावड्यासाहेब " अशा संबोधनाचा उपयोग करूं लागले ! अशा तऱ्हेचा नांवाचा विपर्यास करणें हा प्रेमातिशयाचा भाग आहे, किंवा आपल्यांतील चालीरीतीच्या दांडगेपणाचा भाग आहे हें पाहण्याचें काम येथें नाहीं. सांगण्याचा मुद्दा हाच कीं, **भाऊराव** त्यावेळीं जर पहिल्याच कारकुनीच्या किंवा अशाच दुसऱ्या एखाद्या कामावर असते तर नुसते भाऊ

या नांवांवर राहिले असते. ते लोकांचें [illegible] मल्या तऱ्हेचें मनरंजन करूं लागल्यापासून " भावड्या " या नांवानें प्रसिद्धीस आले !

मुंबईवैभवांत यासंबंधानें पुढील उद्गार आले आहेत:—

" आपल्या देशांतील प्राचीन नाट्यकलेच्या इतिहासाकडे नजर दिली तर या कलेची केवढी महती होती हें स्पष्ट दिसून येतें. तसेंच सांप्रतकालीं पाश्चात्य देशांत चांगल्या नटांना व पियानिस्टांना ( पेटी वाजविणारांना ) " नाईट " च्या पदव्या मिळतात आणि आमचे नट " भावड्या " " गण्या " या नांवानें प्रसिद्धी पावतात ! यावरून आमच्या इकडे अजून नाटक पाहण्यायोग्य प्रेक्षकसमुदायच तयार झाला नाहीं असें ह्मणणें भाग पडतें.

मुं० वै० १८९६.

असो, संगीत सौभद्राच्या तीन अंकांचे प्रयोग **पुणें** व **मुंबईस** बरेच झाले. ते तीनच अंक इतके अवर्णनीय झाले व त्यांतील भूमिकाही इतक्या उत्तम होत होत्या कीं, कालिदासानें ह्मटल्याप्रमाणें—

" **अन्योन्यशोभाजननाद्बभूव**
**साधारणो भूषणभूष्यभावः ॥** "

" परस्परांची परस्परास शोभा प्राप्त झाल्यामुळें भूषणत्व व भूष्यत्व हे धर्म दोहोंस साधारण झाले. "

नाटकाच्या उत्तमपणामुळें पात्रें अधिक चांगलीं वाटूं लागलीं किंवा पात्रांच्या अद्वितीयपणामुळें नाटक अधिक लोकप्रिय झालें याचा निर्णय करणें कठिण वाटूं लागलें.

रा० **मोरोबांच्या** अर्जुनाच्या कामाचा आवेश व मनोहर लकब इचें वर्णन करावें, कां के० **अण्णासाहेबांच्या** बलरामाच्या पात्राचा भारदस्तपणा व त्यांचा एकप्रकारचा ठोसरच पण जव्हारीदार आवाज याचें वर्णन करावें, कां **बाळकोबा नाटेकरांच्या** नारदाच्या व कृष्णाच्या कामाच्या वेळच्या मधुर आलापांचें वर्णन करावें, कां भाऊरावाच्या कर्णमधुर, अंतःकरण गार करणाऱ्या व चित्तवृत्ति तटस्थ करणाऱ्या आवाजाचें वर्णन करावें हेंच समजण्याची प्रेक्षकांना मारामार पडूं लागली. एकापेक्षां दुसरा अंक सरस, दुसऱ्यापेक्षां तिसरा अंक अधिक सरस असा प्रकार झाल्यामुळें तिन्ही अंकांपेक्षां अधिक चांगलें तें काय दाखवावयाचें किंवा करावयाचें अशी किर्लोस्करांसही फिकीर वाटूं लागली. त्यामुळें सौभद्र नाटक सुमारें चार पांच महिने पुरें व्हावयाचें राहिलें होतें. परंतु किर्लोस्करांनीं आपल्या अलौकिक बुद्धीनें पुढचेही दोन्ही अंक असे बहारदारीचे करून सोडले कीं, एकंदर नाटकांत सरस निरस ही निवडानिवड करण्याला जागाच कोठें ठेवली नाहीं ह्मटलें तरी चालेल. चौथ्या अंकांत

" **असतांना यतिसंनिध किंचित सुख वाटतें** "

आणि

" **मज बहुताचि ही आशा होती वहिनी ।** "

हीं सुभद्रेच्या तोंडचीं दोन पदें, प्रेक्षकांची तिसऱ्या अंकांत सुभद्रेच्या अभावीं झालेली निराशा नाहिंशी करण्याकरितां मुद्दाम घातलीं आहेत तरी त्यांत सहजपणा इतका साधला आहे कीं, प्रेक्षकांच्या अंतःकरणाची तल्लीनता

त्यापासून कायमच रहात असे. पांचव्या अंकांत किर्लो-स्करांनीं आपल्या करामतीचा जो कळस केला आहे तो सुभद्रेच्या भूमिकेला भाऊराव नसते तर झाला असता कीं नाहीं याची शंका आहे. त्या अंकांत अर्जुनसुभद्रेच्या भाषणांत निरनिराळ्या विषयांचा उपक्रम करतांना,

**" नच दृष्टिस पडती ते सज्जन उदय पावतां कली "**

या अर्जुनाच्या पदांतील अर्थ प्रेक्षकांच्या मनावर प्रसन्न-तेची छाया पुढें उभी करीत आहे तोंच प्रभातकालच्या वर्णनसमयाचें—

**पुष्पपरागसुगंधित शीतल अति मंद चरे वन-वायु हा ॥ निखिल तरूंतिल पाक्षि उठोनी शब्द कारिति किती मंजु हा ॥ पुष्प० ॥ निबिडकुं-जमुखिं मोरमयुरी नटुनि थटुनि नाचति हे ॥ हरिण उडति बहु शशक धांवती गिरिवरि डोलत नाग हा ॥ पुष्प० ॥**

हें सुभद्रेचें आलाप परिपूरित पद्य ऐकून प्रेक्षकस-मूहानें तुडुंब भरलेलें नाटकगृह नागाप्रमाणें डोलत असे.

त्याप्रमाणें रैवतक पर्वतावरून खालीं समुद्रतीरीं दिसणारा स्त्रीपुरुषांचा समाज पाहून किर्लोस्करांनीं सुभ द्रेच्या तोंडीं घातलेलें

**गिरिवर हा सौदागिर आणि सिंधुपथें नौका भरुनी ॥ पुरुषयुवतीचीं चित्रें मांडी विकण्या-स्तव वनबाजारीं ॥ बघुनि वाटतें मन्मनीं या स-मयीं कीं ॥ बघु० ॥ भूपालंकृत पौरजनीं ॥ बघु० ॥**

व त्यावर अर्जुनानें

**त्या चित्रांतुनि सुंदर पुतळी निवडुनि मी करिं घेवोनी ॥ जात तया संनिध पुसाया मोल किती वद रे म्हणुनी ॥ वधुनि वाटतें० ॥**

हें पद म्हणून वरील रूपकाची पूर्तता केली आहे. तीच **भाऊरावां**च्या सुभद्रेच्या भूमिकेसंबंधानेंही तंतोतंत लागू पडत होती म्हणण्यास काय हरकत आहे? सन १८८३ सालापासून १८९७ सालपर्यंत चौदा वर्षांत **भाऊराव** सुभद्रेची भूमिका करीत असतांना सौभद्र नाटकाच्या एकंदर सुमारें ५०० आवृत्त्या रंग-भूमीवर झाल्या असतील व सुभद्रेच्या एकेक पदाच्या पुनः पुनः म्हणण्याच्या किती तरी आवृत्त्या झाल्या असतील! परंतु त्या नाटकाचा नवेपणा **भाऊरावां**कडे ती भूमिका असेपर्यंत कधींच नाहींसा झाला नव्हता.*

---

* सौभद्र पुस्तकाच्या प्रकाशकानीं दुसऱ्या व पुढील आवृत्तीच्या प्रस्तावनेंत पुढील उद्गार काढले आहेत.

" संगीत शाकुंतलाप्रमाणें हेंही नाटक विद्वान् व रसिक-जनांच्या पसंतीस उतरलें आहे किंवा नाहीं याची प्रतीति प्रत्यक्षानुभवावरून हजारों लोकांना मिळाली आहे व मिळत आहे. पुण्यासारख्या ठिकाणीं पंधरा पंधरा वीस वीस प्रयोग होऊन देखील अजून प्रयोगदिदृक्षूंच्या झुंडीच्या झुंडी थिएटरच्या दारावर प्रयोगाच्या रात्रीं येऊन थडकतातच. संगीत शाकुंतलापेक्षांही ह्या नाटकांत ग्रंथकर्त्यांच्या कवित्वशक्तीचें तेज विशेष चमकतें. रा० रा० अण्णासाहेबांच्या कल्पनाचातुर्याचा झांक यांत बरीच दिसून येत आहे; पात्रांच्या अनुरोधानें या नाटकांतील विषयाची योजना झाल्यानें या नाटकाचा प्रयोग

उत्तम चित्रकार एखाद्या मनोविकाराचें उत्तम चित्र चित्रांत वठवून देईल; उत्तम ग्रंथकार एखाद्या प्रसंगाचें मूर्तिमंत चित्र पुढें उभें करील; किंवा उत्तम वक्ता आपल्या भाषणाच्या आवेशानें श्रोत्यांच्या ठिकाणीं पाहिजे तर वीरश्री उत्पन्न करील, किंवा त्यांच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा काढील, किंवा हसवून हसवून त्यांच्या मुरकुंडया पाडील; परंतु भाऊरावांच्या आवाजाचें चित्र कोणत्याही चित्रकाराला, ग्रंथकाराला, किंवा वक्त्याला काढतां येणें दुःसाध्य आहे. त्यांचें चित्र कल्पनेनेंच काढलें पाहिजे. त्यांचीं पद्यें कदाचित् फोनोग्राफ यंत्रांतून ऐकावयास मिळतील. परंतु त्यांच्या आवाजाचें वर्णन करावयाचें ह्मणजे ज्यांनीं ज्यांनीं त्यांना गातांना

---

उत्तम वठतो, व त्यांतील रसाचा आस्वाद कितीही घेतला तरी वीट आणीत नाहीं, या गोष्टी साधारणतः सर्वांना मान्य आहेत.

सुभद्राहरण हें चरित्र आमच्या स्त्रीपुरुषसमाजाच्या प्रीतींतलें आहे; त्यांत रा० रा० अण्णासाहेबांनीं तें " पुनर्बुभुक्षाकरणीं " आपल्या कल्पनाशक्तीनें नवीन गोष्टीचा मालमसाला घालून " तिखटचि केलें. " मग तें लोकांना कां प्रिय होऊं नये ? सुभद्रेचीं करुणरसप्रधान पद्यें आबालवृद्धांच्या तोंडून, तालसुराच्या नियमांवर विशेषसा जुलूम न होतां ऐकूं येऊं लागलीं आहेत; तेव्हां हें एक नवीनच करमणुकीचें साधन रा० रा० किर्लोस्करांच्या कृपेनें आह्मांस मिळालें याबद्दल त्यांचे उपकार मानणें वाजवी आहे. संगीत वगैरे जनमनआल्हादनाचीं जीं साधनें त्यांचा आजपर्यंत असभ्यतेशीं नित्य संबंध जडल्यासारखें दिसत होतें, तीं पुनः शुद्ध होऊन सभ्य समाजाला लाभतील असें दिसत आहे. "

ऐकलें असेल, त्यांच्या तोंडून, त्यावेळेस किंवा आतां त्यांची आठवण होऊन निघणारे " अहाहा ! " या उद्गारापलीकडे करणें शक्य नाहीं. तें वर्णन करण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे–

To gild refined gold,
To paint the lily,
To throw a perfume on the violet;
To smooth the ice, or add another hue,
Unto the rainbow, or with taper-light
To seek the beauteous eye of heaven, to garnish
Is wasteful and ridiculous excess.

या शेक्सपीयरच्या उक्तीप्रमाणें निरर्थक आणि हास्यास्पद होणार आहे.

## संगीत शाकुंतल.

संगीत सौभद्र बसल्यावर, शाकुंतल नाटकांतिल संगीतपणा एका बाजूनेंच असल्यामुळें जें व्यंग त्यांत दिसत होतें तें शकुंतलेच्या पात्रांत पद्यें घालून नाहींसें करून टाकिलें व त्यामुळें सौभद्राप्रमाणेंच हेंही नाटक अधिक रंगदार होऊं लागलें व हीं दोन नाटकें तयार झाल्यावर मंडळी, मुंबई, सोलापूर, ठाणें, इंदूर, नगर, इत्यादि ठिकाणीं फिरून आली. द्रव्याश्रय, लोकाश्रय, आणि राजाश्रय मंडळीनें मुबलक संपादन केला. मानमान्यताही चांगली मिळविली. श्रीमंतमहाराज **बाळा**साहेब **होळकर** युवराज असतांनां १८८३ सालीं **मुंबईस** आले होते त्यावेळीं त्यांनीं मुद्दाम शाकुंतल नाटकाचा प्रयोग

पाहिला होता. इंदुरास मंडळी गेल्यावर **अण्णा**साहेबांच्या विद्वत्तेमुळें व **भाऊ**रावांच्या गुणामुळें उभयतांवर त्यांची इतकी बहाल मर्जी बसली कीं, असलीं दोनींही रत्नें संग्रहीं असावींत असें त्यांस वाटूं लागलें;* परंतु लोकरंजनार्थ ज्यांना ईश्वरानें जन्मास घातलें, ते समुद्राच्या लाटांप्रमाणेंच वरचेवर कमी जास्ती होणाऱ्या राजकीय मर्जीवर विश्वासून न बसतां लोकसेवाच त्यांना दैवत वाटूं लागली; व लोकांनाही किर्लोस्करांच्या नाटकांतील गायकपात्रें ह्मणजे मनरंजनाच्या देवता आहेत असें वाटूं लागलें, यांत आश्चर्य नाहीं.

वरील गांवें फिरून येईपर्यंत किर्लोस्करांनीं आपल्या मंडळीची व्यवस्थित संस्था बनविली नव्हती. खर्च व राहणी सर्व सरदारी थाटाची ठेवली होती. परंतु पुढें मंडळी कायमची करावयाचें ठरल्याबरोबर पनवेल येथील सावकार **विठोबा खंडाप्पा गुळवे** यांच्या साह्यानें तेथेंच एकंदर व्यवस्था ठरविली व त्या व्यवस्थेंत **भाऊराव** हे क्रमानें तिसरे भागीदार झाले.

## रामराज्यवियोग.

किर्लोस्करांच्या दोन्ही नाटकांपेक्षां वरील नाटकाचें महत्व विशेष आहे. व तें महत्व मुख्यत्वें **भाऊरावां**मुळें आहे. कारण, **अण्णासाहेब** अल्पायुषी झाल्यामुळें जसें त्या नाटकांत व्यंग कायम राहिलें आहे, तसें पुढील

---

* कै० अण्णासाहेब व भाऊराव यांस अनुक्रमें साठ व पसतीस रुपये दरमहा बरेच दिवस इंदुरच्या दरबारांतून मिळत असे.

अंक शेवटास नेण्यास योग्य पात्राचा अभाव हेंही कारण त्या व्यंगाला झालें होतें. तरी अशा अपूर्ण स्थितींत तें नाटक जें लोकप्रिय झालें त्याला कारण केवळ **भाऊरावच** होत. यांच्याकडे त्या नाटकांत जी भूमिका होती ती करण्याचें त्यांनीं सोडल्यापासून रामराज्याचे प्रयोग करण्याचें सोडून देणें भाग पडलें. शकुंतला, सुभद्रा आणि मंथरा या तिन्ही भूमिकांत तीन प्रकारचा विशेषपणा आहे. शकुंतला आश्रमांत वाढलेली—

**"नाहीं कोणीही हुंगीलें । ऐसें तें वा पुष्पचि फुललें"**

या उक्तीप्रमाणें अजाण मुलगी, तेव्हां तिचा साधेपणाच दिसावयाचा; सुभद्रा म्हणजे राजकन्या असून तिच्या अंतःकरणांत प्रीतीचें बीज लहानपणापासूनच पेरलें गेल्यामुळें तज्जन्य विकाराच्या क्रिया तिच्या प्रत्येक बोलण्याचालण्यांत दिसावयाच्या. आणि मंथरा म्हणजे दासी खरी, परंतु कारस्थानी आणि दुष्ट. ही शेवटची भूमिका दोन्ही भूमिकांपेक्षां अगदीं भिन्न असे. पहिल्या दोन्ही भूमिका **भाऊरावा**कडून स्वाभाविक किंवा समजून होत असतील, परंतु मंथरेच्या भूमिकेचें महत्व व खरें रहस्य समजून ती भूमिका **भाऊरावा**कडून होत असे. आरंभीं रामराज्यवियोग नाटक त्याच्या अपुरेपणामुळें लोकांस विशेषसें प्रिय नव्हतें, परंतु **भाऊरावां**ची भूमिका जशी जशी अधिक लोकांपुढें येऊं लागली तसें तसें लोकांना तें नाटक अधिकच आवडूं लागलें व पुढेंही, एक दोन नवीन बसविलेलीं नाटकें दुर्बोधपणामुळें जीं प्रथम विरस वाटत होतीं तीं **भाऊरावांच्या** विशेष गायन व अभिनय-

ग्रंथ संग्रहालय
नं.

कौशल्यामुळेंच लोकप्रिय झालीं ह्मणण्यास चिंता नाहीं. मंथरेच्या निरनिराळ्या पदांत निरनिराळे रस आहेत, ते **भाऊराव** आपल्या क्षणोक्षणीं मृदु व कठोर होणाऱ्या स्वरांनीं ह्या नाटकांत श्रोत्यांच्या व प्रेक्षकांच्या अंतःकरणावर मूर्तिमंत ठसवीत असत.

**सुटला पितृदिशेचा वारा,**
**झांकी मेघ नभःपथ सारा ।**

हें भयानकरसाचें पद,

**रामासि अनुकूल असती त्यांचे**
**पाडिन दांत तरीच खरी मी ।**

हें रौद्ररसाचें पद,

**नृपममता रामावरती प्राणाहुनि बहु आहे ती ।**

त्याप्रमाणेंच:

**मन माझें भडकुनि गेलें आली भ्रांती चित्तासी ।**

हें करुणरसाचें पद,

**सुकुमार असुनि तूं फार केवढी छाती ।**

हें वत्सलरसाचें पद व नंतर कैकईजवळचीं:

**उद्यां बघ जातें ॥ नृपसिंहासन रामातें ॥**
**रामपदीं जरी नृपपद गेलें**
**खचित तुझें तें दैवाचि फुटलें ।**

इत्यादि कैकयीचा मत्सराग्नि पेटविणारीं रौद्ररसात्मक पदें—व शेवटचें:

**सफलेच्छा ती करिन मुराची ॥ आली मत्करिं तनु कैकयिची ॥ चढली कमान कीं या कलिची ॥ शिवलि बरें झालें ॥ आतां ॥ नृपमानस-दुर्गा भंगाया वज्रचि करिं आलें ॥ आतां ॥ १ ॥ पेटवितो मत्सराग्नि सारा ॥ ओतुनि विकल्प-सुतैलधारा ॥ सहजचि भूपतिचित्तागारा ॥ समजा भटकविलें ॥ आतां ॥ २ ॥ आतां रामा कैसा होतो ॥ अभिषेक उद्यां हें मी बघतों ॥ कलिसत्ता कैसी दाखवितों ॥ धैर्य मला चढलें ॥ आतां ॥ ३ ॥**

हें वीररस परिपूर्ण पद, इत्यादि पदें **भाऊरावांच्या** अंगच्या खऱ्या गुणांची त्यावेळीं साक्ष देत असत. हीं पदें ह्मणतांना **भाऊरावांनीं** केव्हां केव्हां प्रेक्षकांच्या नेत्रांतून आनंदाश्रु आणले आहेत; केव्हां केव्हां त्यांच्या शरीरावर रोमांच उभे केले आहेत व केव्हां केव्हां त्यांच्यांत आवेश उत्पन्न केला आहे. सन १८९५ सालच्या नोव्हेंबर १७ च्या नेटिव्ह ओपिनियनच्या अंकांत पत्रव्यवहारांत **भाऊरावांच्या** मंथरेच्या कामासंबंधानें पुढील उद्गार आहेतः " मंथरेच्या पात्राची तडफ व आवेशयुक्त गायन हें किती वेळां ऐकलें तरी पुन्हां पुन्हां ऐकण्याची ज्यास इच्छा होत नाहीं असा मनुष्य विरळाच." उत्तम आवाज ही जरी ईश्वराची देणगी आहे तरी **भाऊरावांनीं** तिचा योग्यवेळीं योग्यच उपयोग केला आहे. किर्लोस्कर आणखी कांहीं दिवस

असते तर, रामराज्यवियोग पूर्ण होऊन त्यांच्या कृतीचा अधिक गौरव झाला असता. **भाऊरावां**कडे त्यांत भरताची भूमिका देण्याचा त्यांचा विचार होता. कारण, त्या वयांतच पुरुषपात्राचें काम करण्याचीही योग्यता आपल्या अंगांत आहे असें त्यांनीं त्याच वेळेस शाकुंतल नाटकांत कण्वाचें काम करून लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें होतें.

मंडळीचे तीन प्रयोग तयार झाल्यावर मंडळी नाशिक, नागपूर वगैरे ठिकाणीं फिरून पुण्यास आली. संगीत नाटक प्रथमच तिकडे गेल्यामुळें अद्भुत वाटूं लागलें. नाशकास प्रसिद्ध **कृष्णानंद सरस्वती** यांनीं **अण्णासाहेबां**चें अलौकिक बुद्धिचातुर्य व **मोरोबा, भाऊराव** यांची गायनकुशलता पाहून त्यांस पुढील मानपत्रिका अर्पण केली होती:—

"जय सच्चिदानंद

श्रीमत् परमहंस कृष्णानंद सरस्वतीप्रणित नारायणस्मरण,

प्रियशिष्यांतरगणप्रिय राजश्री बळवंतराव अण्णा किर्लोस्कर यांशीं उत्तरोत्तर आनंदाभिवृद्धि मनोरथसिद्धिपूर्वक करीत. शके १८०६ तारणनाम संवत्सरे माहे पौष वद्य ३ रोज मंदवासर. आपलें स्वकृत संगीत शाकुंतल, संगीत सौभद्र, व संगीत रामायण हे तीन प्रयोग पाहून अत्यंत संतुष्ट होऊन तुह्मास **रसमूर्ति अभिनव** कालीदास अशी पदवी दिली आहे. आजपासून जेव्हां आह्मी तुम्हास पत्र लिहूं तेव्हां हलीं दिलेलें अभि॰धानपूर्वक पत्र लिहूं. आणि ज्या तुह्मी रसिक गुणज्ञ जनास हें विदित झाल्यानें ही गोष्ट मान्य करून तेही असेच व्यवहार ठेवतील, व तुमच्या जवळच्या मंडळीपैकीं रा॰ मोरोपंत

देव ( वाघुळकर ) व रा॰ भाऊराव कोल्हटकर या उभयतांस **प्रकृतरसपोषक संगीतकुशल** अशी पदवी दिली आहे. हैंही पाहून गुणीजन अवश्य संतुष्ट होऊन असेच या शब्दाचा व्यवहार करतील. ही आनंदोद्गारपत्रिका तुम्हांस दिली आहे कळावें.

इतिनारायण स्मरण. ”

---

## अण्णासाहेबांचा मृत्यू.

सन १८८५ सालच्या सप्टेंबर महिन्यांत मंडळीनें फिरून आल्यावर पुण्यांत विश्रांति घेतली. त्यासालीं पुण्यांत अतोनातच पैसा मिळाला. शेवटचा प्रयोग **रामराज्य** होता. दशरथाच्या निधनाबरोबर त्याची भूमिका घेणारे **अण्णासाहेब**ही कायमचे रंगभूमीवरून अंतर्धान पावतील ही कल्पनाही त्यावेळीं कोणाची नसेल ! परंतु योगायोगच असा आला कीं, **अण्णासाहेब** दोन महिन्यांच्या विश्रांतीकारितां आपल्या गांवीं **गुर्लासूर** येथें गेले ते नवज्वराच्या आजारानें ता. २ रोजीं नवंबर महिन्यांत कैलासवासी झाले. शांत समुद्रांत सुरळीत चाललेलें तारूं जसें एकदम वादळ होऊन खडकावर आपटावें त्याप्रमाणें किर्लोस्कर मंडळी आपल्या भरभराटीच्या शिखरावर असतां **अण्णासाहेबां**च्या अकल्पित मरणानें तिची हिंमत खचून तिचे भावी मनोरथ जागच्याजागींच थिजून गेले. व मंडळी आतां नामशेष होते कीं काय, अशी भीति वाटूं लागली. परंतु मंडळींतील प्रमुख रा॰ **मोरोबा, भाऊराव,** व त्यावेळचे सेक्रेटरी रा॰ **त्रिंबक नारायण साठे** व मंडळीचे इतर हितचिंतक यांनीं नेट धरून मंडळीची पुन्हां जमवाजमव

केली. व पुन्हां पुण्यांत कांहीं प्रयोग* करून अण्णासाहेबांच्या स्मारकाकरितां म्हणून १८०० रु० त्यांच्या वडलांस अर्पण केले. व पुढें त्यांच्याबद्दलची कृतज्ञता दाखविण्याकरितां, त्यांनीं लावलेल्या वृक्षांचीं फळें, त्यांच्या अकालीं मृत्युमुळें त्यांस जरी घेतां आलीं नाहींत, तरी त्यांच्या कुटुंबास तरी मिळावीं म्हणून त्यांच्या नांवानें अडीच आणे भाग ठेवण्यांत आला. **अण्णासाहेब**

---

* अण्णासाहेब वारल्यानंतरच्या प्रथम प्रयोगाच्या दिवशीं रा० सा० गणेश जनार्दन आगाशे बी. ए., हल्लींचे पुणें हायस्कूलचे हेडमास्तर यांनीं अण्णासाहेबांच्या सन्मानार्थ पुढील कविता केल्या होत्या.

**श्री.**

**॥ पद ॥ ( अप्रमूर्ति०च्या चालीवर ).**

नमितों आधीं शिवसुत मग त्या बलवंतपदकमळें ॥
जन्म जेणें संगीतनाटका कविवर्यें दिधलें ॥ ध्रु० ॥
अभिनयवस्तू संगीताच्या माधुर्यें भरलें ॥
त्यायोगें दुग्धांत शर्करामिश्रण तें केलें ॥
नाट्यकौतुका अपूर्व दावुनि जनहृदया हरिलें ॥
भरतखंड हें यशें जयाच्या दुमदुमुनि गेलें ॥ १ ॥ न० ॥
भव्याकृति तें रूप जयाचें या रंगीं सजलें ॥
अभिनय ज्याचे प्रेक्षकचित्तीं कोंदणसे जडले ॥
नाट्यपरायण होउनि ज्यानें व्यवसाया त्यजिलें ॥
तनमनधन हें संगीताच्या पायीं वेंचियलें ॥ २ ॥ न० ॥
शाकुंतलिं कालिदासकाव्यामृत ज्यानें मथिलें ॥
सौभद्रीं संगीतकलेचें मार्दव साधियलें ॥
रघुपतिराज्य-वियोगीं प्रतिभागौरव दावियलें ॥
त्या सद्गुरुची कृपा अह्मांसी देवो मधुर फलें ॥ ३ ॥ न० ॥

वारल्यावर पुन्हां जी व्यवस्था करण्यांत आली, त्यांत मंडळीचे मालक क्रमानें रा० **मोरोबा वाघुलीकर, भाऊराव कोल्हटकर,** व **रामचंद्र विठ्ठल किंजवडेकर** हे झाले; व मंडळी पूर्वींप्रमाणें चालू झाली. पुढें १८९० सालापर्यंत मंडळी इकडे दक्षिण महाराष्ट्रांत हुबळीपर्यंत व इकडे उत्तर हिंदुस्थानांत ग्वाल्हेर व बनारसपर्यंत फिरून आली. एवढ्या अवकाशांत आणखी एक विक्रमोर्वशीय खेळ मंडळीनें बसविला. परंतु तो विशेषसा लोका-

---

**॥ पद ॥ ( सुंदरमुख० या चालीवर. )**

बलवंता रसिकसंघहृदयतोषणा ॥
सरस-ललित-नाट्य-गीत-काव्यपोषणा ॥ ध्रु० ॥
गुर्लोसुरवासिपांडुरंगनंदना ॥
किर्लोस्करप्रथितवंश-कीर्तिवर्धना ॥
वित्तविमुखसततगुप्तनिजयशोधना ॥
दयिता । कविता । वनिता ॥
स्तिमितरवा । जागिं विधवा । गतविधवा झालि निर्गुणा ॥१॥ ब०
पीनवक्ष मांसलतनु कटकभूषणा ॥
मंदहास्य मंजुवाक्य विकासितेक्षणा ॥
भव्याकृति धीरवृत्ति जनविमोहना ॥
बंधो । साधो । लाधो ॥
कुशलमति । तव सुकृति । विबुधमर्ता । सतत अर्हणा ॥ २ ॥ ब०
विदितसकलभरतोदितरसनिबंधना ॥
कालिदासकाव्यसुधामधुरिताननां ॥
कृतनवसंगीत-नाट्य-बंधयोजना ॥
जगतीं । सुकृती । प्रसृती ॥
नव रुचिची । भवसृतिची । तव कृतिची । होउ बहुगुणा ॥३॥ ब०

दरास पात्र झाला नाहीं. या वेळेपर्यंत मंडळीनें आपली इभ्रत पूर्ववत् कायम ठेवली. ती केवळ **मोरोबा**, **भाऊराव** व कांहीं अंशानें **बाळकोबा नाटेकर**, या त्रिवर्ग मंडळीच्या गुणांवर होती खरी; परंतु यापुढें ती कायम रहावयाची म्हणजे तिला **भाऊरावांचें**च विशेष साह्य पाहिजे होतें. कारण **मोरोबा** कायम होतेच, **बाळकोबांचें** वर्तन धरसोडीचें असे तरी त्या करितां मंडळीनें स्वतंत्र सोय केली होती. त्यामुळें मंडळी त्यांच्या शिवाय चालवून घेत असत; परंतु **भाऊरावा**शिवाय कोणताही भाग पार पडण्यासारखा नव्हता. मंडळींत आल्यापासून आठ वर्षें नाटकांतील नायिकेच्या भूमिका त्यांनीं करून तीं नाटकें लोकप्रिय करून ठेवलीं होतीं. त्यांच्या जाग्यावर आतां सामान्य मनुष्याची योजना करून लोकांचें रंजन कधींच झालें नसतें. त्यांच्या जाग्यावर त्यांच्याच तोडीचें मनुष्य पाहिजे होतें. परंतु तशीं मनुष्यें मिळविणें कांहीं कुंभाराचें काम नाहीं म्हणून तो पाहिजे तितकीं मडकीं घडवून देईल. किंवा चित्रकाराचें काम नाहीं म्हणून तो एखादें सुबक चित्र बनवून देईल. तें काम प्रत्यक्ष ईश्वरानेंच केलें पाहिजे होतें. व तें त्यानें **भाऊरावा**ची मूर्ति नाटका-करितांच घडवून एकवार केलें.

## विश्रांति घेण्याचा विचार.

नायिकेच्या कामाकरितां योग्य असा मुलगा मिळवि-ण्याचे जे उपाय होते ते थकल्यावर मंडळीनें कांहीं दिवस विश्रांति घेण्याचा विचार मनांत आणला व ज्या मार्मिक व रसज्ञ प्रेक्षकांच्या शिक्षणानें आपण एवढा लौकिक मिळ-

ळविला त्यांची अखेरची एकवार सेवा करून मग विश्रांत घ्यावी या विचारानें प्रथम मंडळी मुंबईस आली. किर्लोस्कर मंडळीचे प्रयोग आतां पाहण्यास मिळणार नाहींत. म्हणून होतील तितके आपले कर्ण तृप्त करून घ्यावेत या उद्देशानें मुंबई व पुणें येथील प्रेक्षकांनीं किर्लोस्कर मंडळीशीं जणूं कांहीं द्वंद्व चालविलें होतें. " शेवटचें सौभद्र " हें किती वेळां लावलें तरी त्याचा शेवट खरोखर लावण्यास मंडळीस फार प्रयास पडले; ती हकीकत सन १८९१ सालच्या मुंबईच्या नेटिव्ह ओपिनियन व पुण्याच्या ज्ञानप्रकाश पत्रांत वाचण्यासारखी आहे; तिचा कांहीं भाग खालीं पहाण्यास सांपडेल:

" कैलासवासी प्रसिद्ध नाट्यकलाविशारद अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या पश्चात् त्यानीं रचलेल्या लोकोत्तर तीन नाटकांचे प्रयोग करून दाखविणारी किर्लोस्कर संगीत मंडळी हल्लीं या शहरांतील रसिक जनांस आपली शेवटची भेट देण्याकरितां येथें आली आहे. परंतु या मंडळीच्या संबंधानें आज येथें दोन शब्द लिहिण्याचें कारण इतकेंच कीं आतां ती मंडळी दीर्घकालपर्यंत विश्रांति घेण्याच्या विचारांत आहे. ही मंडळी अशी विश्रांति कां घेत आहे याचें कारण चतुर व रसिक प्रेक्षकजनांच्या साहजिक लक्षांत येण्यासारखें आहे. या मंडळींत नायिकेची भूमिका घेणाऱ्या पात्राची आतां थोडथोडी उणीव भासूं लागली आहे व ती उणीव हल्लींचें नायिकेची भूमिका करणारें पात्र आपल्या कामामध्यें अगदीं अद्वितीय असल्यामुळें सहजीं भरून येण्यासारखी नाहीं. शिवाय आणखी एकदोन महत्वाच्या पात्रांच्या संबंधानें सुद्धां कांहींसा असाच प्रकार आहे तेव्हां ज्या पात्राचें अलौकिक गानानें व अभिनयानें

सर्व लोकांस मोहून मंडळीनें आपलें महाराष्ट्रांत नांव केलें त्या पात्रासंबंधानें कोणत्याही प्रकारें रंगभूमीवर यत्किंचितही कमीपणा दिसून येण्याचा संभव असल्यास तिकडे दुर्लक्ष करून आपला धंदा तसाच पुढें चालवावा, हें मंडळीस प्रशस्त न वाटून तिनें विश्रांति घेण्याचें मनांत आणिलें हें अगदीं योग्यच केलें असें कोण ह्मणणार नाहीं ?"

नेटिव्ह ओपिनियन ता. ४ सपटंबर १८९१.

"रा. रा. नेटिवओपिनियनकर्ते यांसः—

वि. वि. किर्लोस्कर नाटकमंडळीनें आजपर्यंत कोणत्या प्रकारें लोकांचें मनरंजन केलें, हें आतां सांगण्याची अवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. अपरिहार्य नैसर्गिक अडचणीमुळें ह्या मंडळींतील एक अद्वितीय पात्र आपल्या भूमिकेस अननुरूप होत चाललें आहे, सबब मंडळीस तत्सदृश दुसरें पात्र मिळेतोंपर्यंत विश्रांति घ्यावी लागत आहे, ही मोठी खेदाची गोष्ट आहे; परंतु इलाज नाहीं. ही उणीव लवकरच भरून येईल, अशी आशा बाळगून मनाचें समाधान केलें पाहिजे. तथापि प्रेक्षकसमुदायानें आपलें कर्तव्य विसरतां कामां नये. माझ्या मतें ह्या मंडळीच्या सरतेशेवटच्या दिवशीं सर्व प्रेक्षकसमुदायानें त्या अद्वितीय पात्राची करामत ध्यानांत आणून त्यास कांहींतरी चांगलें पारितोषिक द्यावें हें उचित दिसतें. अशानें आपलें गुणग्राहकत्व व्यक्त होईल इतकेंच नव्हे तर त्या पात्रासही समाधान वाटून मुंबईंतील प्रेक्षकसमुदायाची सदैवस्मृति राहील. ह्या संबंधानें कोणी खटपट केल्यास मी सामर्थ्यानुसार हातभार लावण्यास तयार आहें. ही सूचना निष्फळ होणार नाहीं अशी आशा बाळगून रजा घेतों.

आपला,

ता. ४ आक्टोबर १८९१.

गुणलुब्ध."

" गेल्या बुधवारीं या लोकप्रिय मंडळीनें संगीत रामराज्यवियोगाचा प्रयोग करून दाखविला. ही मंडळी आज इतके दिवस येथें आहे तरी बुधवारचे खेळास झालेल्या गर्दीवरून लोकांचें या मंडळीचे खेळ पाहण्याचें औत्सुक्य यत्किंचितही कमी झाल्यासारखें दिसत नाहीं; आणि असें होणें साहजीकच आहे. कारण, पूर्वीच सुचविल्याप्रमाणें या मंडळीनें दीर्घ विश्रांति घेतली म्हणजे कै० अण्णांनीं बुद्धिसर्वस्व खर्चून बसविलेले व हल्लींच्या अद्वितीय रंगभूमीवर आणिलेले खेळ केवळ स्मृतिगोचर होऊन कालसमुद्रांत गडप झाले म्हणजे पुन्हां दृष्टिगोचर किंवा श्रवणगोचर होण्याचा संभव आहे काय ? हाच विचार मनांत येऊन प्रेक्षकगण होईल तितकी मनीषा तृप्त करून घेण्याचा प्रयत्न करतात. "—नेटिव्ह ओपिनियन, ता० १८ आक्टोबर, १८९१.

---

" या अंकानंतरचा आमच्या पत्राचा अंक निघण्यापूर्वीच बहुधा येथील या मंडळीचे गुणग्राहकांपैकीं पुण्यांतील पत्रें वाचणारांस या मंडळीचे खेळांविषयीं फक्त वाचण्याची व पत्रें न वाचणारांस मागच्या शनिवारीं आपण या वेळेस सुभद्रेचें अमुक पद ऐकत होतों किंवा रुक्मिणीकृष्णाचा प्रणयकलह ऐकत होतों एवढें स्मरणच करण्याची पाळी येणार. नाटकाभिरुचीस एक प्रकारचें विशेष चांगलें वळण लागण्यास व त्यांत विशेषतः संगीताची गोडी लागण्यास या मंडळीनें महाराष्ट्रीयांची केवढी चाकरी बजावली आहे याविषयीं आह्मीं मागें एकदां लिहिलेंच आहे. ही मंडळी निघण्यापूर्वीं विद्यार्थीवर्गाच्या बाहेरील लोकांस गाणें ही एक फारच मनोहर परंतु अप्राप्य वस्तु आहे असें वाटत असे. यामुळें त्यांतील विशेष गानलुब्ध लोकांस आपली इच्छा आपल्या स्थितीस अयोग्य अशा साधनांनीं तृप्त करून घ्यावी लागत असे. 'विद्यार्थीवर्गाचें' गाणें शिक-

रिणी किंवा हरणीवृत्ताचे पलीकडे बहुतकरून कधींच ज्ञान नसे. यावरून आतां सर्व लोक गंधर्व, तानसेन, हद्दुखां झाले आहेत असें आमचें मत आहे असें कोणी समजूं नये. आमचे ह्मणणें एवढेंच आहे कीं, ही मंडळी अस्तित्वांत आल्यापासून कांहीं "शेले" मंडळी खेरीज करून प्रत्येकाजवळ आपल्या थकलेल्या डोक्यास किंवा शरीरास विश्रांति देण्यास बरीच सामुग्री झाली आहे. ... ... ... ... आह्मास आज येथें या मंडळीस एवढेंच सुचवावयाचें आहे कीं, ह्मांना हल्लीं ज्या कारणाकरितां विश्रांति घ्यावी लागत आहे ती दूर करण्याचा होईल तितका प्रयत्न करून लवकरच पुन: महाराष्ट्रीयांचें मनोरंजन करण्यास लागावें."

ने० ओ० ता० २१ आक्टोबर १८९१.

---

येथून मंडळी पुण्यास आली. येथें देखील मंडळीच्या उड्यावर उड्या नाटकाच्या दिवशीं पडूं लागल्या. ज्ञानप्रकाशांत किर्लोस्कर मंडळी विश्रांति घेणार ह्मणून पुढील उद्गार आहेत:

"सुमारें दोन महिने ही मंडळी मुंबईस होती, तेथें आपल्या मधुर संगीताच्या भेटीचा लाभ तेथील रसिकांस देऊन आतां ही मंडळी येथें आली आहे. ही मंडळी आतां दीर्घकाल विश्रांति घेणार आहे असें समजतें. या मंडळींत नायिकेची भूमिका घेणारें हल्लीं जें पात्र आहे त्या तोडीचें जर दुसरें मिळेल तर त्यास दरमहा पांचशें पासून हजार रुपयेपर्यंत* पगार देण्यास मंडळी तयार आहे असें ऐकतों.

---

* पांचशें रुपये पगार चांगला मुलगा मिळेल तर देण्याची जाहीरात मंडळीनें प्रसिद्ध केली होती. हजार रुपये ऐकीव माहितीवरून लिहिले असावेत असें वाटतें.

ही मंडळी येथें पंधरा दिवसांत आपले सर्व प्रयोग एकवार दाखवून विश्रांति घेणार असें समजतें. परंतु आमची पुणेंकर रसिक मंडळी एवढ्यानें तृप्त होईल असें वाटत नाहीं. कारण या मंडळीचा हा शेवटचा लाभ आहे. कै० अण्णासाहेब किर्लोस्करांचे मागें या मंडळीनीं आजपर्यंत चांगल्या प्रकारें टिकाव धरला याबद्दल त्यांची तारीफ लोकसमुहाकडून होत आहे."

ता. ५ नोवेंबर १८९१.

---

"किर्लोस्कर संगीत मंडळीनें गेल्या शनिवारीं आर्यभूषण नाटकगृहांत संगीत सौभद्र नाटकाचा प्रयोग करून दाखविला. या मंडळीची या शहरास शेवटची भेट असल्यामुळें गायनलुब्ध रसिक प्रेक्षकांची गर्दी फार झाली होती. सुभद्रेची भूमिका घेणारें पात्र वयानें मोठें झाल्यामुळें नवीन पात्र संपादन करण्याची जशी या मंडळीस अवश्यकता भासूं लागली आहे त्याप्रमाणें गाण्याच्या कामांत प्रख्यातीस आलेलें कृष्णाचें पात्रही निरुपायानें पेनशनांत काढण्याची अवश्यकता दिसत आहे. एकंदरीनें या मंडळींत नवेजुने फेरफार बरेच झाल्याशिवाय आपली पूर्ववत् छाप बसणें व महाराष्ट्रांतील जनांचें रंजन करण्यास आपण तयार होणें बरें नाहीं असे जे विचार या मंडळीच्या मनांत आले आहेत ते अगदीं योग्य आहेत. अर्जुन, सुभद्रा या पात्रांनीं गेले शनिवारीं बहार केली, व त्यांतूनही सुभद्रेच्या मधूर गायनानें तर प्रेक्षकसमूह सारखा डुलत होता, हें सांगण्यास नकोच. या पात्रासारखें गुणसंपन्न पात्र या मंडळीस मिळणें मोठें कठीण आहे."

ता० ९ नोवेंबर १८९१

---

## पुनः सफर.

पुण्यास खेळ होईपर्यंत पुढें स्वारी काढावयाची नाहीं हा **भाऊरावांचा** संकल्प होता. परंतु इतके दिवस जवळ बाळगलेल्या मंडळीची पुढें व्यवस्था काय करावयाची ही पंचाईत प्रमुख मंडळीस पडली. त्यामुळें **भाऊरावांसही** मंडळी निराश्रित टाकण्याचा निर्दयपणा पत्करावा किंवा आजपर्यंत चाललेला क्रम सोडून मनलज्जा संभाळावी हें कांहीं सुचेना. द्रव्येच्छेनें मनाविरुद्ध गोष्ट करण्याची अवश्यकता त्यांना नव्हती. परंतु शेवटीं मंडळीच्या व कांहीं सद्गृहस्थांच्या भिडेस पडून पूर्वक्रम आणखी कांहीं दिवस चालविण्याचा त्यांनीं निश्चय केला* व मंडळी पुनः सोलापूर बार्शीकडे निघाली.

**भाऊरावांनीं** आपला धंदा सोडला असता तर त्यांचें मोठें नुकसान झालें असतें असें नाहीं. परंतु लोकांचें मात्र एक अप्रतिम करमणुकीचें साधनस्थान नाहींसें झालें असतें. तेव्हां पुनः पहिला मार्ग अनुसरण्याची जी बुद्धि त्यांस झाली ती लोकांच्या नशिबानें झाली असें ह्मटलें पाहिजे. सन १८९२ सालीं सोलापूर येथें मंडळी असतांना तेथील प्रसिद्ध सावकार रा० रा० **मल्लिकार्जुन-आप्पा पसारे** यांच्या वतीनें वेद० सं० रा० रा०

---

* प्रोफेसर बाळाजी प्रभाकर मोडक व कै० डाक्तर अण्णा मोरेश्वर कुंटे यांनीं भाऊराव मंडळीसह कोल्हापुरास असतांना मंडळी मोडूं नका ह्मणून सांगितल्याचा उल्लेख भाऊरावाच्या रोजनीशींत आहे.

**चनवसाप्पा गुरुस्वामी चरमूर्ति** हे नाटक पाहण्यास आले होते. प्रयोग पाहून स्वामी फार खुष होऊन त्यांनीं तेथल्या तेथेंच **भाऊरावांवर** कांहीं श्लोक केले ते वरील ह्मणण्याची सत्यता चांगली दाखवितात. त्यांनीं श्लोक केले ते:—

**" दृष्टो न वेदवचसाखिलसाधुवाचा**
**कामः पुराणवचनान्नच तस्य पत्नी ॥**
**मत्वा बडोदिनगरे खलु भद्रमूर्ति**
**तं भाउराजमगजारमणः ससर्ज ॥ १ ॥**

**अर्थः**—अनेक सत्पुरुष, लोक व वेद पुराणांत मन्मथ आहे ह्मणून सांगतात; परंतु कोणी प्रत्यक्ष पाहिला नाहीं. ऐकण्यांतच आहे, असें ईश्वरानें समजून बडोदें संस्थानांत मन्मथास प्रत्यक्ष सर्व लोक पाहूं द्या ह्मणून शोभायमान शरीर असलेल्या **भाऊसाहेबांस** निर्माण केलें.

**किर्लूस्कराग्रजमहत्सुकृतं न वेद्मि**
**किंवा द्वितीयमदनस्य न वेद्मि पुण्यं ॥**
**सर्वावलोकनमहत्सुकृतं प्रसिद्धं**
**तस्माद्गिरीशरचनं किल भाउजन्म ॥ २ ॥**

**अर्थः**—किर्लोस्करांच्या नशिबानें हें नाटक चाललें आहे असें जें लोक ह्मणतात त्याप्रमाणें आह्मी कांहीं ह्मणत नाहीं. अथवा **भाऊसाहेबांच्या** नशिबानें मंडळी चालली आहे असेंही आह्मी ह्मणत नाहीं. तर सर्व लोकांची पाहण्याची पुण्याई असल्यामुळें असल्या

मंडळीचे मदतीस **भाऊसाहेबांस** निर्माण केलें असें आह्मी ह्मणतों.

**न मन्मथश्चेत्खलु भाऊराजः**
**क रूपगाने सरसाच वाणी ॥**
**रमा रति र्वा निशि वीक्षितव्या**
**रूपंसुधातुल्यवचः सदैव ॥ ३ ॥**

**अर्थः**—जर **भाऊसाहेब** मन्मथ होत नाहींत तर उत्तम रूप, गायन, रसवाणी, लक्ष्मी व रती कोठून येत होतीं ? व यांजपाशीं लक्ष्मी व रति कोठें आहेत ? ह्मणून विचारल्यास रात्रीं नाटकशाळेंत रति व लक्ष्मी यांचें वैभव दृष्टीस पडतें. ह्मणजे **भाऊसाहेब** स्त्रीवेषधारण करून गायन करतेवेळीं रतिदेवीसारखे हुबेहूब दिसतात; व **भाऊसाहेबां**चें नाटक पाहण्यास लक्ष्मीशिवाय कोणत्याही कामगार लोकांस सोडीत नाहींत, यावरून मन्मथ प्रत्यक्ष आहे असें कां ह्मणूं नये ? लक्ष्मी, सरस्वती व रतिदेवी ह्या कुलीन स्त्रिया असून परकीयांच्या ठिकाणीं कशासाठीं राहतील ? हे **भाऊसाहेब** प्रत्यक्ष मन्मथ आहेत ह्मणूनच लक्ष्मी, रति व सरस्वती यांचे ठायीं आहेत." या श्लोकांचा अर्थ पुष्कळ आहे, परंतु तो संक्षिप्त लिहिला आहे.

किर्लोस्कर मंडळीच्या संस्थेंत प्रसिद्ध रा. रा. **गोविंद बल्लाळ देवल** यांचाही बराच महत्वाचा भाग आहे. **अण्णासाहेबांचे** पश्चात् नांव घेण्यासारखे संगीत नाटककार हेच होऊं घातले होते. त्यांत श्रीमंत **बाळासाहेब महाराज होळकर** यांच्या इच्छेनुरूप बाणभट्टाच्या

कादंबरीवर रचलेलें शापसंभ्रम नाटक प्रसिद्ध झाल्यापासून यांची दिवसेंदिवस प्रसिद्धि चांगल्या कवींत झाली आहे. यांचें साह्य मंडळीच्या जन्मकालापासून परोपरीनें होतें; परंतु **अण्णासाहेबांच्या** पश्चात् तें जर अधिक रीतीनें न मिळतें तर मंडळीची भरभराटी इतकी कदाचितच झाली असती. कुशल नटाचें महत्व कवीवर अधिक अवलंबून किंवा, कवीचें महत्व नटावर अधिक अवलंबून याचा निर्णय लेखणीच्या एका टाकासरसा होणें नरी कठीण आहे तरी तूर्त एवढें खचित ह्मणतां येईल कीं, **भाऊरावांच्या** उदयाला रा. **देवलांचें** सर्व प्रकारानें परिश्रम बऱ्याच अंशानें कारणभूत झाले. शापसंभ्रम नाटकांतील पुंडरीकाची भूमिका किंवा शारदा नाटकांतील कोदंडाची भूमिका इतक्या निर्दोष रीतीनें रंगभूमीवर होण्याला रा. **देवलांचें** शिक्षण पुष्कळ उपयोगीं पडलें. **भाऊराव** नायकाची भूमिका करूं लागण्यापूर्वीं पुष्कळांची अशी समजूत होती कीं, सौभद्र, शाकुंतल, रामराज्य-वियोग इत्यादि नाटकांतील भूमिका करण्याच्या पुष्कळ दिवसांच्या अभ्यासामुळें, पुरुषवेषाला लागणारें गांभीर्य, आवेश, हावभाव त्यांना इतक्यांतच साधणार नाहींत; परंतु ती लोकांची कल्पना **भाऊरावांनीं** नव्या नाटकांत प्रथमदर्शनींच खोटी केली. हा रा. **देवलांच्याच** शिक्षणाचा कांहीं अंशीं परिणाम होय; व ही कल्पना खोटी झाल्यामुळें, **भाऊरावांच्या** स्त्रीवेषाशिवाय नाटकें लोकादरास पात्र होतील कीं नाहीं म्हणून जी शंका वाटत होती तिचें आपोआपच निरसन झालें.

लोकांची **भाऊरावांवर** किती मनोभावें भक्ति असे याचे दाखले पुष्कळ वेळां आले आहेत. मंडळी कऱ्हाड व येवलें येथें १८९३–९४ सालीं असतांना **भाऊरावांनीं** आजारीपणामुळें एके दिवशीं शाकुंतल नाटकांत सोंग घेण्याचा आळस केला. परंतु लोकांनीं एक अंक संपल्यावर पुढच्या अंकांत त्यांस सोंग घेण्याविषयीं दोन्ही ठिकाणीं भाग पाडलें.

मंडळी १८९४ सालीं पारोळें मुक्कामीं असतांना **भाऊराव** धुळ्यास तेथील डिस्ट्रिक्ट डे०कलेक्टर व मंडळीचे खरे अभिमानी व हितचिंतक रा. ब. **सिताराम दामोदर** यांस भेटण्यास गेले होते. धुळ्यास मंडळी कधींच गेली नव्हती, त्यामुळें **भाऊराव** यांस तेथें कोणींच पाहिलें नव्हतें व ऐकिलेंही नव्हतें. तरी त्यांचा लौकिक सर्वांस ऐकून ठाऊक होता. रा. ब. च्या घरीं त्या दिवशीं गाणें झालें तें ऐकण्याकरितां बंगल्याबाहेर सुमारें दोनशें तीनशें मनुष्यें जमलीं होतीं. त्यांनीं दुधाची तहान ताकावर भागवून घेतात त्याप्रमाणें **भाऊरावांचें** गाणें बंगल्याबाहेरून ऐकून आपले कान तृप्त करून घेतले.

## रा० बाळकृष्णबोवा नाटेकर.

सदर्हू प्रसिद्ध गुणी गृहस्थांचा संबंध किर्लोस्कर मंडळीशीं १८९४ सालापासून कायमचा सुटला. सुमारें तेरा वर्षें यांनीं जनमनरंजनाची कामगिरी चांगली केली. रा. **मोरोबा,** व **भाऊरावांप्रमाणेंच** संगीत नाटककलेचा उद्धार करण्याच्या कामांत हेही भागीदार होते. आणि जर यांच्या आवाजांत पुढें नें दुर्दैवानें अकल्पित व्यंग

उत्पन्न झालें तें झालें नसतें तर त्यांच्या अद्वितीय गुणांचा लाभ लोकांस आणखी कांहीं दिवस मिळाला असता. असो. **बाळकोबा** कमी झाल्यानें लोकांना खुष ठेवण्याची **भाऊरावांवरची** जबाबदारी आणखी एका अंशानें वाढली. आजपर्यंत जुन्या नाटकांवर, मंडळीचा लौकिक व लोकांची अभिरुचि या तिघांनींच कायम ठेवली होती. परंतु किर्लोस्करांच्याच " राज्यलक्ष्मीला वारवधुप्रमाणें जसा तरूण राजा प्रिय होतो तसा वृद्ध आवडत नाहीं. " या दशरथाच्या तोंडच्या उक्तीप्रमाणें, रंगसभेवरही जसा तरूण नट प्रिय होतो तसा वयस्क प्रिय होत नाहीं. अलीकडे तेच ते प्रयोग व तींच तीं पात्रें लोकांस कंटाळवाणीं वाटू लागलीं होतीं. गाण्याच्या दृष्टीनें जरी तीं पात्रें लोकांस हवींसीं वाटत, तरी प्रयोग-दृष्ट्या वयपरत्वें त्यांच्यासंबंधानें आक्षेप येत असत. शिवाय अलीकडे लोकांच्या अभिरुचीलाही निराळ्या प्रकारचें वळण लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. त्यामुळें किर्लोस्कर मंडळीलाही आपली दिशा बदलण्याची किंचित् अवश्यकता भासूं लागली. व त्याप्रमाणें नवीन नाटकें बसविण्याच्या उद्योगाला मंडळीनें सुरूवात केली.

## नवीं नाटकें.

मंडळीनें विश्रांति घेण्याचा आपला विचार रहित करून पुन: जेव्हां सफरीस सुरूवात करण्याचें ठरविलें, तेव्हां **भाऊरावांनीं** नवीन नाटकांत स्त्रीवेष घ्यावयाचा नाहीं ही अट ठेविली. त्यामुळें शापसंभ्रम नाटकांतील नायकाची भूमिका **भाऊरावांकडे** आली. व ती ते पुंडरीक

या पात्राच्या चंचल व कामुक वृत्तीला अनुरूप अशी करीत असत. **भाऊराव** नवीन नाटकांत नायकाच्या भूमिका करूं लागल्यापासून किर्लोस्करांचीं नवीन नाटकें, " कालिदास ( किंवा बलवत् ) मुख्य कविकृतिपक्वान्नाला सेवून विटलेल्या रसिक जनाला पुनर्बुभुक्षित करण्यास " एक प्रकारचीं " तिखट "च झालीं ह्मणण्यास चिंता नाहीं. मंडळीनें पुढें मग अनुक्रमें मृच्छकटिक, वीरतनय, शारदा हीं नवीन नाटकें बसविलीं. व त्यांत **भाऊरावांकडे** चारुदत्त, शूरसेन, कोदंड यांच्या भूमिका असत. शाप-संभ्रम व वीरतनय नाटकांच्या संविधानकाच्या व कवितांच्या दुर्बोधपणामुळें, दोन्ही नाटकांच्या प्रयोगावर व कांहीं ग्रंथांवर आरंभीं अनुकूलप्रतिकूल टीका बऱ्याच आल्या व वर्तमानपत्रांत तर वादरणें माजून राहिलीं. परंतु " चहाच्या पेल्यांतलें वादळ " जसें चहा थंड झाल्याबरोबर थांबतें त्याप्रमाणें **भाऊरावांच्या** गाण्याच्या एकदां कर्णमधुर लकेऱ्या सुरू झाल्या ह्मणजे पत्रांतले-वाद जागच्याजागीं राहून नाटकगृहांत लोकांच्या उड्यावर उड्या पडत असत. यावरून चांगल्या कवींचीही नाटकें विशेष लोकप्रिय होण्यास तीं लोकमान्य व चांगल्या नटांकडूनच रंगभूमीवर आलीं पाहिजेत हें उघड होतें. **शेक्सपियरचीं** नाटकें **ग्यारिकनें** जशीं उदयास आणलीं किंवा **अण्णासाहेबांनीं** शाकुंतल जसें पुढें आणलें त्याचप्रमाणें **भाऊराव** व **मोरोबा** यांच्याच विशेष गुणांमुळें किर्लोस्करांचें नांव पुढें कायम राहिलें ह्मणण्यास चिंता नाहीं.

असो. मंडळीजवळ शापसंभ्रम, मृच्छकटिक आणि वीरतनय या नव्या नाटकांची भरती झाल्यापासून पहिलीं नाटकें कमी कमीच होत असत. १८९३ सालीं शापसंभ्रमाचे तीन अंकच प्रथम बसविले होते, ते १८९४ त पुरे सात अंक होऊं लागले. नंतर १८९५ त मृच्छकटिक व १८९६ सालीं वीरतनय बसविल्यावर १८९७ सालच्या जून महिन्यांत **भाऊरावांनीं** स्त्रीवेष घेण्याचें सोडून दिलें. त्यापुढें सौभद्र व शाकुंतल नाटकें रूपांतरानें मधून मधून ज्या ठिकाणीं पूर्वीं तीं पाहण्यांत आलीं नसतील अशा ठिकाणीं होत असत. परंतु रामराज्य फक्त दोनच वेळां करून दाखविण्यांत आलें. या नाटकासारखें करुणरसप्रधान नाटक केवळ एका पात्राच्या अभावीं मागें पडलें यावरून **भाऊरावांच्या** भूमिकेचें महत्व त्या नाटकांत किती अधिक होतें व चांगल्या नटांच्या साह्यानें प्रसंगविशेषीं कवींच्या बुद्धिचातुर्याचें चीज अधिक कसें होतें याचें **भाऊराव** हें एक उदाहरण होते. तसेंच यावरून **भाऊराव** ह्मणजे कवींच्या कल्पना शक्तीला स्फूर्ति आणणारी एक शक्ति होती असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

## रा० मोरोबा वाघुलीकर.

**भाऊरावांकडे** नायकाचीं कामें आल्यावर रा० **मोरोबांनीं** विश्रांति घेण्याचा विचार केला व त्याप्रमाणें त्यांनीं १८९७ च्या जूनच्या अखेरीस अर्जुनाच्या वेषाचीं साहित्यें जीं—" मोडुनि दंडा फेकुनि देईन भिकार भगवीं वस्त्रें " या शब्दांनीं ते रंगभूमीवर म्हणत असत—तीं

खरोखरींच कायमचीं सोडून दिलीं. सुमारें सतरा वर्षें त्यांनीं मंडळीची कामगिरी व लोकांच्या मनरंजनाचें काम मोठ्या एकनिष्ठपणानें व उत्तम रीतीनें केलें. यांचा स्वभाव अगदीं साधा व एकमार्गी असल्यामुळें मंडळींचें गाडें सुरळीत चालत होतें. अगदीं सामान्य स्थितींत असून केवळ आपल्या अंगच्या गुणानें लोकमान्य झालेले व आपल्या धंद्यालाही ज्यांनीं मान्यता आणली असे **मोरोबा** हे एक आहेत. सारखीं तेरा वर्षें शाकुंतल सौभद्राच्या प्रयोगाचींच पारायणें रंगभूमीवर होत असत यावरून यांच्या गुणांची तारीफ निराळी करायला नको. यांनीं फक्त दुष्यंत, अर्जुन, व विक्रमोर्वशीय नाटकांत पुरूरवा या तीन मुख्य भूमिका फार केल्या आहेत. रामराज्यांत वसिष्ठ कधीं कधीं होत असत. व इतर नाटकांतून सूत्रधार होत असत; परंतु दुष्यंत व अर्जुनाच्या भूमिका अजून लोकांच्या पुढें मूर्तिमंत उभ्या आहेत. वयपरत्वें मनाचा कल परमार्थप्राप्तीकडे लागल्याबरोबर स्वार्थाकडे नजर न देतां, यांनीं आपली सर्व जबाबदारी **भाऊराव** व **रामभाऊ किंजवडेकर** या उभयतांवर टाकून स्वस्थ " हरि हरि " म्हणण्याच्या उद्देशानें वर सांगितल्याप्रमाणें हे घरीं राहिले. व या उभयतांनींही त्यांच्या इतक्या दिवसांच्या श्रमाचा त्यांस विश्रांतीच्या दिवसांत मोबदला मिळावा अशी चांगली व्यवस्था केली आहे. हे कै० **अण्णासाहेबांस** अगदीं देवाप्रमाणें भजतात अशी त्यांच्यावर यांची भक्ति आहे. नाटकाच्या धंद्यांत व्यवस्थित राहूनही नांवलौकिक, व द्रव्य संपादन करतां

येतें याचें **मोरोबांनीं** आपल्या वर्तणुकीनें उदाहरण घालून दिलें आहे. नाटकाच्या इतिहासांत **मोरोबांनीं** आपलें नांव कायमचें केलें आहे. संगीत नाटकाचा मूळ पाया यांच्यावरच उभारला होता; व यांनीं आपल्यावरचा भार अशा तऱ्हेनें संभाळला होता कीं, तो कधींच डळमळूं दिला नाहीं व शेवटीं तो भार हलका करतांना ज्यांच्या शिरावर टाकण्याची योजना केली तेही गृहस्थ असे होते कीं, जशी एखादी, कुशल शिल्पकारानें एकाच खांबावर उभारलेली इमारत सुंदर दिसावी, त्याप्रमाणें किर्लोस्कर मंडळीचीही इमारत एकाच गृहस्थाच्या शिरावर येऊन पडली तरी तिचें सौंदर्य, व वैभव त्यांनीं आपल्या हयातीपर्यंत कमी होऊं दिलें नाहीं.

असो. **मोरोबा** मंडळी सोडून राहिल्यानें **भाऊराव** व **रामभाऊ** यांना किती वाईट वाटलें हें पुढील पत्रावरून व्यक्त होत आहे:

"रा॰ रा॰ **मोरो बापूजी वाघुलीकर** यांसीं. **लक्ष्मण बापूजी उर्फ भाऊराव कोल्हटकर** व **रामचंद्र विठ्ठल किजवडेकर** यांचे कृतानेक शि॰ सा॰ न॰ वि॰ वि॰. आपण व आह्मीं मिळोन कै॰ अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे पश्चात् आज सुमोर बारा वर्षें सुयंत्रित रीतीनें चालविलेली मंडळी आपण आतां सोडून गेलां आहां, त्याबद्दल आम्हास अतिशय वाईट वाटत आहे. अण्णासाहेब जिवंत असतांना या मंडळीचा जो लौकिक होता तो आजपर्यंत तसाच कायम आहे असें आह्मीच ह्मणतों असें नाहीं, तर सर्व लोक म्हणत आहेत. हा लौकिक असाच कायम होण्याला आपणच कारण आहां ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे आपला मंडळीशीं असलेला संबंध आपण तोडून

टाकावा याबद्दल आम्हाला विशेषच वाईट वाटत आहे. आणखी कांहीं दिवस आपण मंडळींत राहिलां असतां तर आम्हाला फार मोठा फायदा झाला असता. परंतु आपलें उतारवय झाल्यामुळें ईश्वरसेवेंत काळ घालविण्याचा जो आपण स्तुत्य विचार मनांत आणला आहे त्याचे आड येण्याची आमची इच्छा नाहीं. परंतु आपलें खरें दैवत अण्णासाहेब हे होत. तरी त्यांना आपण विसरून ईशस्तवन करणें कधींही स्तुत्य होणार नाहीं. असो. आपला एकमेकांचा फार दिवसांचा स्नेह व एकमेकांवर परस्परांचें प्रेम हें लक्षांत घेतलें म्हणजे आपण आजपर्यंत केलेल्या श्रमांचा अंशतः तरी मोबदला करण्याचें आमचें कर्तव्यकर्म आहे असें आम्ही समजतों. ... ... ... ... ...
... ... ...आपण ईशस्तवनांत सुद्धां कै० अण्णासाहेबांचें स्मरण व त्यांच्या संस्थेची उत्तरोत्तर बढती होऊन ती दीर्घायुषी होण्याची प्रार्थना करण्यास विसरू नये, ही विनंति."

ता० ७ नोवेंबर १८९७.

**लक्ष्मण बापूजी कोल्हटकर.**
**रामचंद्र विठ्ठल किंजवडेकर.**

वरील उताऱ्यावरून या तिघां चालकांचा एकोपा व परस्परांवर प्रेम किती होतें हें उघड दिसणार आहे.

---

## नवी रचना.

नाटकांत स्त्रीवेषाचीं कामें मुलांकडून करवावीं किंवा स्त्रियांकडूनच करवावीं हा एक वादग्रस्त विषय आहे. इंग्लिश लोकांत मुलांकडून करविणें गौण समजतात व आमच्यांत स्त्रियांकडून करविणें गौण समजतात. हा प्रश्न

विविक्षित समाजस्थितीवर अवलंबून आहे.* परंतु खुल्या मनानें अभिनय आणि रसोत्पत्तीचीं कामें जितकीं पुरुष जातीकडून चांगलीं केलीं जातात तितकीं स्त्रियांकडून होत नाहींत. त्या कामाला स्त्रीजातीचे नैसर्गिक लज्जाविनयादि गुण बरेच आडवे येतात असा निदान आपल्याकडचा अनुभव आहे. तरी पुरुषांकडून सुद्धां तीं कामें वयपरत्वें मोकळ्या मनानें होत नाहींत, याचा अनुभव भाऊरावांच्या संबंधानें बराच येत असे. १८९२ सालापासून १८९७ सालपर्यंत त्यांनीं शाकुंतल, सौभद्र इत्यादि नाटकांत कामें केलीं तीं ते जुलमानें करीत असत. लोकांची जर त्यांच्याशिवाय तीं नाटकें पाहण्याची तयारी असती तर त्यांनीं त्या नाटकांतील कामें तेव्हांच सोडलीं असतीं. परंतु जवळ नवीन सामुग्री झाल्याशिवाय तीं नाटकें सोडतां येईनात. त्यामुळें निरुपायानें त्यांस केवळ संस्थेचा हितानहितसंबंध ध्यानांत आणून मनाविरुद्ध

---

* **एडमंड रसेल** नांवाचा एक उत्तम नट गेल्या जून महिन्यांत मुंबईस आला होता; त्यानें चांगल्या स्त्रिया नाटकांत कामें करूं लागल्याशिवाय आमची नाट्यकला ऊर्जितदशेस यावयाची नाहीं असें आपलें मत दिलें आहे. आमच्यांतीलही एका विद्वान, पोक्त व विचारी अशा गृहस्थाचें असेंच मत आहे कीं, आमच्याकडे जर कुलीन स्त्रियांना या कलेचा उपयोग करून घेतां येईल, तर या कलेचें महत्व वाढून प्रसंगानें निकृष्टदशेस पोंचणाऱ्या स्त्रियांना एक नवा उद्योग लावून दिल्यासारखें होईल. परंतु आमची समाजपद्धति व नीतिमत्ता या गोष्टीला अद्याप तयार झाली नाहीं, असेही त्यांनीं उद्गार काढले.

गोष्टी करणें भाग पडत होतें. या त्यांच्या मनाच्या मोठे-
पणाचा मोबदला दोघां इतर मालकांनीं त्यांच्या भागा-
शिवाय स्वतंत्र रीतीनें दिला होता. हें त्यांनीं उचित
तेंच केलें हेंही येथें सांगणें उचितच आहे.

असो. **मोरोबा** घरीं राहिल्यानंतर **भाऊराव** पहिल्या नंबरचे व **रामचंद्र विठ्ठल किंजवडेकर** हे दुसऱ्या नंबरचे भागीदार झाले. लोक **भाऊरावांना** ओळखीत असत, किंवा त्यांची किंमत करीत असत, ती त्यांच्या गुणावरून करीत असत. ते पहिल्या नंबरचे किंवा दुसऱ्या नंबरचे भागीदार ह्मणून करीत नसत. परंतु या गोष्टी त्यांच्या चरित्रापुरत्याच ह्मणून द्यावयाच्या, यापेक्षां त्यांचें महत्व नाहीं. १८९६ सालीं प्रथम प्लेगला सुरुवात झाली व १८९७ सालीं दुष्काळ पडला. पुनः १९०० सालीं पडला. हीं पांच वर्षें हिंदुस्थानाला सर्व तऱ्हेनें अनिष्टच गेलीं. त्यामुळें बुद्धिबळाच्या डावांत जसें प्रतिपक्षाचा मारा व शह चुकवून आपलें घर कायम करावयाचें असतें, त्याप्रमाणें प्लेग, क्वारंटाईन व दुष्काळ यांचे मारे चुकवून मंडळीला आपलें ठाणें कोठें तरी देण्याला प्रयास पडत असत. नाटकासारख्या करमणुकीच्या, लोकाश्रयावर अवलंबून असणाऱ्या संस्था लोकांत स्वस्थपणा असला तरच चालण्यासारख्या असतात. तरी देखील अशा दिवसांत किर्लोस्कर मंडळीवर लोकांची भक्ति पहिल्याप्रमाणेंच होती. मंडळीचे हातखंडे खेळ सौभद्र व रामराज्यवियोग **मोरोबा** नसल्यामुळें व **भाऊरावांनीं** त्या प्रयोगांत काम करावयाचें सोडल्यामुळें

मागें पडलें. व आतां मंडळीची नव्या खेळांवरच भिस्त होती; परंतु **भाऊरावांनीं** तेही खेळ तसेच लोकप्रिय करून ठेवले होते.

मंडळीच्या व्यवस्थेंत जी नवी रचना झाली, तिच्यांत कै० **अण्णासाहेब** किर्लोस्करांचें कायमचें कांहीं तरी स्मारक असावें असा विचार प्रथमच मंडळीच्या मनांत आल्यानें त्याकरितां कायमचा फंड होण्याची सार्वजनिक-दृष्ट्या महत्वाची अशी व्यवस्था करण्यांत आली.हा विचार यापूर्वींच व्हावयास पाहिजे होता; परंतु तिकडे मंडळीचें लक्ष गेलेंच नाहीं. नाहीं तर स्वल्प आयासानें किर्लोस्कर मंडळीच्या नांवाचें **पुण्या**सारख्या ठिकाणीं एखादें नाटकगृह सहज उभारलें गेलें असतें. **भाऊराव** हयात असते तर या विचाराची पूर्तता लवकरच होण्याचा संभव आला असता. परंतु त्यांच्या मरणानें पुनः तें काम लांबणीवर पडलें.

सन १८९८ सालीं मंडळी बडोद्यास गेली. **भाऊराव** यांच्या कारकीर्दींत मंडळीची ही प्रथमच खेप होती. सुमारें सोळा वर्षांत बडोद्याच्या पहिल्या स्थितींत आणि आतांच्या स्थितींत महदंतर पडलें होतें. पंचवटींत रामचंद्राला जसी वनवासाच्या वेळीं पाहिलेल्या पाण्याच्या झऱ्यांचे व झाडझुडपांचे–नंतर मोठमोठे उदकांचे प्रवाह व वृक्ष झालेले पाहून भ्रांति पडली, त्याचप्रमाणें किर्लोस्कर मंडळीलाही पूर्वींच्या गलिच्छपणाच्या जागीं स्वच्छता, लहान लहान रस्त्यांच्या ठिकाणीं मोठे राजरस्ते, नवीं राजमंदिरें, भव्य उद्यानें व इमारती, तसेंच लोकांच्या जुन्या

रीतिरिवाजांत अर्वाचीन आचारविचारांची सरमेसळ पाहून किंचित् भ्रांति पडली. बडोद्याशीं **भाऊरावांचा** संबंध लक्षांत आणला ह्मणजे व तेथें फार वर्षांनीं मंडळी आली आहे ही गोष्ट लक्षांत आणली ह्मणजे तेथें त्यांची मानमान्यता व गौरव **पुण्या** व **मुंबई**सारख्या प्रसिद्ध शहरीं व इतर शहरीं जो होत असे, त्या मानानें अधिक होईल अशी कल्पना होती. परंतु तसा प्रकार तेथें विशेष घडून आला नाहीं. व ' पिकतें तेथें विकत नाहीं ' या ह्मणीची सत्यता तेथेंच विशेष दिसून आली. राजदरबारीं तीन प्रयोग झाले, रीतीप्रमाणें बिदागी मिळाली. प्रयोग पाहून खुष झाल्याबद्दलचे उद्गारही त्या त्या प्रसंगीं श्री० **महाराजांनीं** काढले व किर्लोस्कर संगीत संस्थेच्या घटकावयवांतील मुख्य जीवन **भाऊराव** हे आपल्याच कृपाछत्राखालीं राहणाऱ्या प्रजेपैकीं एक आहेत हीही गोष्ट **महाराजांस** कळली होती. परंतु हिंदुस्थानांतील एक प्रसिद्ध व अद्वितीय नट या दृष्टीनें **महाराजांकडून** **भाऊरावांचा** जो विशेष प्रकारचा गौरव व्हावयास पाहिजे होता, त्याला अवसरच सांपडला नाहीं असें ह्मणावें लागतें. कारण, गुणी व विद्वान् लोकांचा **महाराजांकडून** बहुमान होत असल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. मागें सांगितलेला **एडमंड रसेल** नांवाचा इंग्लिश नट बडोद्यासही गेला होता व तेथें राजकीय पाहुण्याप्रमाणें त्याचा मानमरातब ठेवण्यांत आला होता असें कळतें. यावरून **महाराज** गुणाचे चहाते आहेत हें सिद्ध होतें. परंतु त्यावेळीं कदाचित् मातोश्री श्रीमती

जमनाबाईसाहेबांच्या आजारीपणामुळें भाऊरावांची भेट वगैरे होण्याची राहिली असावी असा तर्क होतो.

---

## शारदा नाटक.

भाऊरावांच्या कारकीर्दींत हें शेवटचें नाटक होय. सुमारें पंधरा महिने या नाटकांत त्यांनीं काम केलें. सामाजिक सद्यःस्थितीचें चित्र नाटकरूपानें लोकांपुढें आणून त्याचा लोकांच्या मनावर परिणाम होण्यासारखें जर एखादें नाटक आजपर्यंत पुढें आलें असेल तर त्यांत शारदा नाटक हें पहिलें आहे. यांतील कोदंडाची भूमिका ही महत्वाची आहे. व ती भाऊरावांकडे असल्यानें या नाटकाची लोकप्रियता अधिकच वाढली म्हणण्यास चिंता नाहीं. कोदंडाचीं,

**जो भेद विधीनें स्त्रीपुरुषीं केला,**

.. .... ........ ........ .....

**जरी करिन सकल खलकार्य विफल,**

.... ...... ...... .... .... ........

**जागृत ठेवा लग्नाची ही स्मृति सारी,**

...... .... ........ .. ...... ....

इत्यादि अर्थबोध उत्पन्न करणारीं, त्याचप्रमाणें,

**मज गमे ऐसा जनक तो मांग साचा,**

.... .... .... ...... .. .... ......

**श्वानाहुनि अति नीच तुम्हीरे**

स्वार्थी मांजरसे टपलां,

...... ........ ......

तूं पापी खलकषाय निंद्य जगीं तुज काय,

.. .... ........... .... .... .... ....

इत्यादि रौद्ररसात्मक क्रोध उत्पन्न करणारीं पदें **भाऊरावां**च्या तोंडून ऐकून संगीत हें लोकरंजनाकरितांच केवळ नसून लोकशिक्षणाकडेही त्याचा उपयोग करितां येईल हें लोकांच्या चांगलें निदर्शनास आलें. संगीत शारदा नाटकानें जितकी जरठकुमारीविवाहाच्यासंबंधानें लोकांत चळवळ उत्पन्न झाली, तिच्या चतुर्थांशही त्यापूर्वीं अनेक ज्या चळवळी यासंबंधानें झाल्या त्यापासून झाली नसेल. पुढील लेख या ह्मणण्याची चांगली साक्ष देतील:

" सामाजिक बऱ्यावाईट स्थितीचें व चळवळींचें हुबेहूब चित्र नाटकरूपानें मांडण्याची ही नवीनच टूम रा० देवल व किर्लोस्कर नाटकमंडळी या दोघांनीं प्रचारांत आणण्याचें श्रेय आज प्रथमच संपादन केलें आहे. आणि त्याबद्दल त्या दोघांच्याही— मुख्यत्वें देवल यांच्या—कल्पकतेबद्दल व धैर्याबद्दल त्यांचे धन्यवाद गाणें जरूर आहे. "

नेटिव्ह ओपि० १८९९.

"..............In spite of its modest programme, therefore, we think that the शारदा marks an important event in the history not only of our dramatic Marathi literature such as it is, but also of social reform ; and we hope that it will find a

prominent place in the annual review which the apostle of social reform—the (now late lamented) Hon. Mr. Justice Ranade will take of the year's progress at the ensuing National Social Conference. In this connection, it would be unjust to ignore the claims of the Kirloskar Sangit Dramatic Company who put the शारदा on the Stage. Surely it is a happy combination that such an epoch-making drama should be produced on the Stage by such a popular and renowned band of singers and actors as the Kirloskar Sangit Dramatic Company."

इंदुप्रकाश १८९९.

---

## श्रीमंत शिंदेसरकारचें निमंत्रण.

मंडळी इंदुरास असतांना—**शिंदेसरकारचा** दौरा फिरत फिरत आपल्या उज्जनी प्रांतांत आला होता. त्यावेळेस मंडळीस तेथें मुद्दाम बोलावून दोन खेळ करवून व दोन हजार रुपये बिदागी देऊन, आम्ही ग्वालेरीस परत गेलों ह्मणजे तेथें जरूर या असें **महाराजांनीं** निमंत्रण देऊन ठेवलें होतें. सन १८८७ सालीं मंडळी एकवार ग्वाल्हेरीस गेली होती, परंतु त्या वेळीं **महाराज** अल्पवयी असल्यामुळें, मंडळीस राजाश्रय जसा मिळावा तसा मिळाला नव्हता; व गांवांतही तेथील लोकांना

हिंदुस्थानी गाण्याचा फाजील अभिमान असल्यामुळें महाराष्ट्र संगीताची गोडी जशी लागावी तशी लागली नव्हती. त्यामुळें तेथें त्या खेपेस लोकाश्रयही मुळींच मिळाला नव्हता म्हटलें तरी चालेल. तेव्हां या खेपेस गांवांत खेळ न करितां महाराजांपुरतेच प्रयोग करून परत यावयाचें या संकल्पानें मंडळी सन १९०० सालच्या आक्टोबर महिन्यांत तेथें गेली. सुमारें तेरा वर्षांनंतर मंडळी तेथें गेलेली—त्यांतून राजाश्रयानें—शिवाय लोकांतही अलीकडे संगीताची अभिरुचि बरीच वाढली होती, त्यामुळें संगीत नाटकें पहाण्याविषयीं लोकांस इतकी आतुरता झाली कीं, आपला पूर्व संकल्प कायम ठेवण्याकरितां महाराजांच्या आज्ञेप्रमाणें गांवांत मंडळी जर प्रयोग न करती तर सर्व लोकांची निराशाच झाली असती. सुमारें चार महिने मंडळी तेथें होती तोंपर्यंत **महाराजांनीं** तिची बरदास्त राजकीय पाहुण्यांप्रमाणें ठेवली होती. "राजा बोले दळ हाले" या म्हणीप्रमाणें **महाराजांची** मेहेरनजर असलेल्या मंडळीवर गांवांतले सरदार, मानकरी व प्रजा यांचेंही प्रेम बसणें स्वाभाविकच आहे. त्यांत विशेषतः **श्रीमंत सरदार संभाजीराव बाबासाहेब आंग्रे** व **श्रीमंत आप्पासाहेब सितोळे अंकलीकर** यांचा मंडळीस विशेष आश्रय असे. जी ग्वाल्हेर गाण्याचें केवळ आगर त्याठिकाणीं संगीतानें इतकें वेड लावलें त्याचें श्रेय किर्लोस्करमंडळी व मुख्यत्वें **भाऊराव** यांस आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

असो. श्रीमंत **महाराजांनीं** मंडळीचे प्रत्येक खेळ पाहून मंडळीस सात हजार रुपये बिदागी दिली. सरदारांकडूनही **भाऊराव** व मंडळीस पोषाख वगैरे बरेच मिळाले व येथून मंडळी पुण्याकडे येण्यास निघाली.

ग्वाल्हेरची सफर किर्लोस्कर मंडळीस पैशाच्या दृष्टीनें फायदेशीर झाली खरी; परंतु येथून **भाऊरावांची** प्रकृति विशेष बिघडत चालल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं; व त्यांना कांहीं दिवस तरी पूर्ण विश्रांति देण्याची अवश्यकता भासूं लागली. त्यामुळें पुण्यास घाईनेंच चार प्रयोग केवळ लोकाग्रहावरून करून मंडळीनें विश्रांति घेतली. ता० १७ मार्च सन १९०० रोजीं आर्यभूषण नाटकगृहांत **भाऊराव कोदंडाच्या** रूपानें शेवटचे रंगभूमीवर दिसले. व त्या दिवशीं त्यांनीं,

**विश्रामं लभतामिदंच शिथिलं ज्याबंधमस्मद्धनुः**

या कालीदासाच्या वचनाप्रमाणें किंवा,

**विश्रांती या धनुला येवो, शिथिल रज्जु करुनी ।**

या कै० **अण्णा**साहेबांच्या पद्यार्धाप्रमाणें **भाऊरावांनीं** सुमारें अठरा वर्षें ज्या सुस्वर आलापरज्जूंनीं लोकांचीं अंतःकरणें लोहचुंबकाप्रमाणें आकर्षण करून ठेवलीं होतीं ते शिथिल करून त्या अंतःकरणांना इतस्ततः फिरण्यास मोकळीक दिली ! त्या दिवशीं **भाऊराव** पडद्यांत गेले नाहींत तर संगीत कमलांतील मकरंद आटला, गायनलोलुप जनांचें आरामस्थल नाहींसें झालें व नाट्यकलेची रंगदेवता कायमची अदृश्य झाली ह्मटलें तरी चालेल !

---

## भाऊरावांच्या संबंधानें लोकमत.

" The Kirloskar Sangit Company performed on Wednesday last the मृच्छकटिक adopted to Marathi by the famous dramatist Mr. Deval of Poona from the original Sanskrit. The opera being in the hands of the well-known Company it is needless to say was well performed. The hero चारुदत्त did his part exceedingly well. As a native opera singer he is unrivalled not only in Bombay but throughout the presidency "

*Times of India,* 20 *Nov.* 1896.

" ... ... संगीत शारदा नाटक चांगलें असून किर्लोस्कर नाटक मंडळीसारख्या गायनकुशल व नाट्यपटु नाटकमंडळीनें तें करावयास हातीं घेतल्यामळें त्याचा प्रयोग फारच प्रेक्षणीय होत असतो. कोदंडाची भूमिका घेणारे पात्राचा आवाज ह्मणजे तर ईश्वरी देणगीच आहे ह्मणून त्याचें कामाचें उत्तमत्वाविषयीं लिहावयास नको. "—मुंबईवैभव, ता० १० जुलई १८९९.

मुंबई येथें मंडळीनें, गुजराथ व काठेवाडकडील कच्छनळीया गांवच्या दुष्काळामुळें मरणाऱ्या गुरांच्या रक्षणासाठीं ता० ६ जुलै १८९९ सालीं वीरतनय खेळ करून सुमारें २५०० रुपये दिले. त्यावेळीं **सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर** यांच्या हस्तें **भाऊरावांस** एक मानपत्र मिळालें. त्याचा सारांश असा होता:—

"...आपल्या कंपनीचे उत्पादक कैलासवासी अण्णासाहेब किर्लोस्कर यांनीं आपल्या अतुल बुद्धिचातुर्यानें मराठीभाषेमध्यें संगीत

नाटकें रचून त्यांचे प्रयोग रंगभूमीवर करून दाखविण्याचा प्रथम प्रघात पाडिल्यापासून त्यांच्या शाकुंतल, सौभद्र, रामराज्यवियोग आणखी त्यांचे पट्टशिष्य रा॰ रा॰ देवल ह्यांच्या विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक, शापसंभ्रम, शारदा आणि तसेच आधुनिक नवीन नाटककार रा॰ रा॰ कोल्हटकर यांचें वीरतनय वगैरे सर्वमान्य संगीत नाटकें आपल्या कंपनीकडून एकामागून एक पुढें आणिलीं जाऊन त्यांच्या योगानें मराठी वाङ्मयांत अत्यंत चटकदार व उत्तम नाटकग्रंथांची किती भर पडली आहे, महाराष्ट्रीय नाटक-कलेचें स्वरूप आपल्यासारखे गॅरिकच्या तोडीचे नट तयार होऊन किती तरी उज्वल झालें आहे, आणखी लोकांचें किती मनोरंजन झालें आहे त्याचें यथार्थ वर्णन करणें आमच्या शक्तीचे बाहेर आहे. कैलासवासी अण्णासाहेबांच्या मागेंही आपले कंपनीचा लौकिक आपल्या व आपले मंडळीच्या मनोहर गायनकलेनें व नाट्यपटुत्वानें आपण कायम राखून पहिल्या प्रतीच्या मराठी संगीत नाटककारांना पुढें आणून वाढविलाही आहे त्याबद्दल आम्ही आपलें मनःपूर्वक फार फार अभिनंदन करीत आहों. असा आपल्याला आपले सरस गुणांप्रमाणें लोकाश्रय नामी मिळत असतां आपण धर्मादायाच्या व लोककल्याणाच्या कामींही आपलें लक्ष चांगल्या प्रकारचें ठेवून गोरक्षण, कॉंग्रेस, पंढरपूरचा पूल बांधण्याचें काम, श्रीक्षेत्र आळंदी येथील ज्ञानेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार, पुण्याची नेटिव्ह जनरल लायब्ररी व कोल्हापूरचा सुप्रसिद्ध खटला वगैरे कामांसाठीं असेच धर्मार्थ प्रयोग करून आर्यजननीचे पहिल्या प्रतीचे संगीत नाटककार अशा नात्यानें असलेलें आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें बजाविलें आहे याबद्दल आपली धन्यता मानावी तितकी थोडीच होईल. आतां ह्यापुढेंही आपले कंपनीचा आपल्या सर्वोत्कृष्ट गायनकुशलतेनें व नाट्यपटुत्वानें असाच अधिकाधिक उदय होत जाऊन निर-

निराळे कविवरांची सरस संगीत मराठी नाटकें लोकांच्या पुढें यावीं आणि त्यांच्या योगानें लोकांचें मनोरंजन असेंच उत्तम रीतीनें होत जाऊन आपल्या व आपले कंपनीच्या कीर्तीचा परिमल सर्वत्र पसरून रहावा आणखी ईश्वरानें आपणाला व आपले मंडळीस सर्वदा सुखी ठेवून आपले हातून धर्मादायाच्या व लोककल्याणाच्या कामांना अशीच मदत वारंवार देववीत असावें इतकीच आमची त्याला मनोभावानें प्रार्थना आहे. ”

---

“ किर्लोस्कर संगीत नाटकमंडळीनें वीरतनय हा आपला खेळ गेइटी नाटकगृहामध्यें ता० ६ रोजीं रात्रीं करून दाखविला. झालेलें सर्व उत्पन्न ह्मणजे तीन हजार रुपये कच्छनळीया गांवच्या गाई वगैरे जनावरांच्या रक्षणार्थ ह्या दुष्काळाच्या वेळीं दिलें. आणि ह्या त्यांच्या औदार्याच्या अभिनंदनार्थ त्याच ठिकाणीं थिएटरमध्यें ना० भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या अध्यक्षतेखालीं किर्लोस्कर मंडळीचे मालक रा० रा० लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊसाहेब कोल्हटकर यांस शेट हंसराजजी लालजी, शेट मथुरादास रजवी इत्यादि प्रमुख मंडळीनें मानपत्र दिलें. त्यांत रा० रा० कोल्हटकर यांस “ ग्यारिकच्या तोडीचें ” म्हटलें आहे. त्यास भर घालून आम्ही त्यांस सर हेन्री ऐर्व्हिंग म्हणजे सध्यां सगळ्या इंग्लंडांत गाजत आहेत त्यांच्या तोडीचे ह्मणतों. आणखी पुन्हां त्यांचें अभिनंदन करून असें म्हणतों कीं, रा० रा० कोल्हटकर, मुजुमदार इत्यादि प्रमुखांनीं या मंडळीचें काम अशाच रीतीनें पुढें चालवावें. महाराष्ट्रभाषेच्या पुष्टीस देवल सारख्यांच्या सहाय्यानें चांगली भर घालावी आणि शारदा नाटकासारखीं नाटकें रंगभूमीवर करून आमच्या सामाजिक सुधारणेच्या उद्योगास साहाय्य करावें. हें त्यांस आणि त्यांच्या मंडळीस अत्यंत भूषणावह होणार आहे.......... ”

इंदुप्रकाश—१९ आ० १८९९

---

" Bombay

Mazagaon Po.

8-10-1899.

........................................ ..................

" I was really much pleased to see the performance which is but a masterpiece of the kind and justly fitted to the present tendency of money-monger old parents. The play really depicts a vivid picture, how greedy money-worshiper is dead to the life-long interests of his lovely daughter of tender age. The play teaches a good lesson and I wish every gentleman with family should make it a point to witness the performance at least once.

" I am glad to see also the prestige—the Company has tacitly maintained by your most skilful dicipline and arrangement.

" The hero party Mr. Bhau Saheb is an exceptional acquisition to the Company. God bless him !

" Please do not attribute this to any effusion but I cannot refrain myself from expressing these sentiments when they are spontanious and sincere.

" I wish every success to the Company under your able control.

With best wishes .
Yours very Sinely
T. F. Ramjee. "

---

वरील पत्र एका अनोळखी गृहस्थानें प्रस्तुत चरित्रलेखकास पाठविलें होतें. याचा पूर्वार्ध चरित्रलेखकाच्या वृथा स्तुतीनें भरलेला असून चरित्राशीं अनुलक्षून नसल्यामुळें येथें दिला नाहीं. वरील उताऱ्यांतही तसा भाग थोडा आला आहेच. परंतु शारदा नाटकासंबंधानें व मंडळीसंबंधानें यांत खऱ्या अंतःकरणानें निघालेले उद्गार विचार करण्यासारखे व वाचण्यासारखे आहेत. ह्मणूनच या पत्राचे उत्तरार्धास येथें स्थळ दिलें. यांत आत्मश्लाघेचा हेतू दिसल्यास वाचक क्षमा करतील.

हल्लीं इंग्लंडमध्यें कांचेच्या कारखान्यांत शिकत असलेले. रा० रा० **निळकंठराव वागले** यांची इच्छा पारिस प्रदर्शनाच्या वेळीं **भाऊरावांनीं** तिकडे येऊन आपली प्रसिद्धि वाढवावी अशी होती. म्हणून त्यांनीं मुद्दाम पुढील पत्र मंडळी ग्वाल्हेरीस असतांना प्रस्तुत चरित्रलेखकास पाठविलें होतें.

' NORTHBROOK SOCIETY,
IMPERIAL INSTITUTE,
LONDON S. W.,
3 *Nov*. 1899.

" Dear Sir,

You will kindly excuse me for taking the liberty of addressing to you these few

lines. I came here as a Sir Mangaldas Fellow of the Bombay University in March last and since that time had good many opportunities to study the arts of this country and among others especially the music. I was very fond of music in India. I was the same here and I find that the best admired piece of music in this country is such that no musician ( गवय्या ) of real merit could care to hear in India. I do not mean to say that it is inferior in every way. Far from it. You will see the voice cultivated to such a pitch of softness and variety that you cannot but be charmed with it. But of science and intellect there is very little. It was thus one of my cherished desires to make these people who call Indian music, barbarian and savage, appreciate the merits of it, which if they once do I am sure, they will stick and cultivate, learn and advance the cause of Indian music. Any body undertaking this task not only will do some service to his country but advance the cause of science. The तान or मेढ which was quite a mystery to these people upto now has recently disclosed its true beauties to them. The

opinion they entertain of Indian music as savage is quite justified by the fact that a few Indians who came here without knowing what a राग or ताल is, suppose themselves as Indian musicians and thus very often create a bad impression on the minds of the people. Very recently, I may state, I had attended, through the kindness of the Secretary of State for India a play—" Shakuntala " acted in English in which some Indians took part. The interesting feature of this play was the singing of the verse स्वसुखनिरभिलाष: &c. verse I in act V and by an Indian in Sanskrit, who was announced to be a great musician. This gentleman was Mr......from Ahmedabad Let me tell you in brief when he sang that verse, I and my friend Mr. Paranjpe,the senior wrangler, who was with me, had to hide our fases through shame and every one in the house said how primary—meaning savage–was the Indian Music. Oh ! how outrageous ! To me who has heard men like Rahimatkhan, such remarks cannot but be outrageous. In order to prevent these things, I proposed to the committee of the Paris-exhibition appointed by the India office and

with whom I am very much connected, to order a party of musicians at the time of the exhibition. They very unwillingly but through my pressure consented to my making inquiries in the matter, when I wrote to Mr. Maugeshrao Telang of Bombay whom you or Bhaurao might be knowing, whether he would consent to come here, if all his expenses only are paid ; but to my great disappointment he replied he would not come except for a pay not less than Rs. 150 per month, and this reply came to me after about three months delay. Naturally therefore the authorities at the India office,.............. omitted that part of the scheme I proposed and wrote to me curtly that this is an undertaking for one of the Native Princes to take. So every thing has blown to the wind and I am where I was, in connection with my object. Now to approach the Native States you know is worse than leather-hunting in the India jungles. As a last resource therefore I thought it proper to address you in the matter.

" I need not tell you what a valuable opportunity the Paris exhibition will afford to people of real merit. Irrespective of

any other thing I would strongly recommend every Indian and who can afford to do that to pay a visit to Europe at the time. As second opportunity of this sort, we need not expect in our life; so, if your Bhaurao will make up his mind to pay Europe a visit at the time, I am sure it will not be, in any point of view a bad thing for him. I am sure he is able enough to do it on his own behalf. The concession given by the India office has been withdrawn and every man who comes here must trust to his own legs in point of expenses. Nevertheless, I promise to leave no stone unturned to make his visit if he comes here, profitable to him. There are thousands of ways of doing these things. I may approach the music Halls to make some arrangements for his performances, the details of which I will write to you on hearing from you as to how Mr. Bhaurao is disposed to take the scheme. I hope you will kindly oblige me by reading the whole letter to him and favouring me with a reply. The trip—supposing he cannot make any money—will cost him abcut Rs. 2000 for him alone; but for this he will not only see the

Paris-exhibition but he may be brought in contact with all English actors of fame and I am sure he will be very popular in England, in every society and in every circle. He will come in contact with the whole of Western civilization and as English people are very fond of music he will, I am sure, find his way in the highest circles and may be, he might push himself even before the Queen. A reply as early as possible will greatly oblige.

Hoping to be excused for the troubles and with best regards to yourself and Bhauraa.

Yours faithtully,

N. B. WAGLE.

I send this letter to Gwalior as per your advertisement in Kesari."

---

वरील पत्रावरून रा० वागळे यांची भाऊरावांबद्दल पूज्यबुद्धि तर व्यक्त होतेच, परंतु तिच्याबरोबर त्यांच्या मनाची कळकळही अधिक दिसून येते. हे कसे बाणेदार व निग्रही आहेत हें त्यांनीं आपल्या वर्तनानें दाखविल्याचें सर्वप्रसिद्ध आहेच.

भाऊरावांसारखा मनुष्य इंग्लंडमध्यें जाण्यायोग्य होता, यांत शंका नाहीं. परंतु तेथें त्यांनीं एकटें जाऊन कांहीं उपयोग झाला नसता. बरोबर उपयोगाला लाग-

णारीं चारपांच माणसें न्यावयाचीं व तेथील गायन व नाट्यकलेची बरोबर माहिती करून घ्यावयाची ह्मणजे निदान दोन तीन महिने तरी तेथें घालविले पाहिजे होते. व एवढा खर्च करावयाचा ह्मणजे **भाऊरावांची** आज-पर्यंतची प्राप्ति त्या कामांत खर्ची घालायाला पाहिजे होती. ही गोष्ट राजाश्रयानेंच घडून यावयाची. ह्मणून नेटिव्ह संस्थानिकांजवळ या संबंधानें विनंति करून त्यांच्याकडून कांहीं मदत झाली तर पुढें मागें जाण्याचा त्यांचा विचार होता. परंतु पुढें—

**मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्र चिंतयेत्**

या वचनाप्रमाणें त्यांचा विलायतेला जाण्याचा विचार जागच्या जागींच राहून ईश्वरीसंकेतालाच त्यांना मान द्यावा लागला.

---

## कांहीं विशेष गोष्टी.

**भाऊरावांनीं** आपल्या गोड आवाजानें लोकांचें रंजन केलें त्यापेक्षां नाटकाच्या दृष्टीनें त्यांनीं विशेष काय केलें, हा प्रश्न स्वाभाविक उत्पन्न होतो. चांगला आवाज असणें ही ईश्वरी देणगी असल्यामुळें तिचें श्रेय ईश्वराकडे जातें; व नाटकांत ज्या ज्या भूमिका ते करीत असत, त्या करतांना जेथें तेथें त्यांना प्रेक्षकांकडून टाळ्यांचा वर्षाव होत असे, त्याचा भाग अंशतः तरी कवीकडे जातो. याप्रमाणें त्यांच्या गुणांची विशेष चिकित्सा कर-तांना कदाचित् दोन गुणांची अशा रीतीनें वाटणी होईल. **भाऊरावांपेक्षां** चांगलेही गाणारे असतील परंतु संगीतां-

with whom I am very much connected, to order a party of musicians at the time of the exhibition. They very unwillingly but through my pressure consented to my making inquiries in the matter, when I wrote to Mr. Maugeshrao Telang of Bombay whom you or Bhaurao might be knowing, whether he would consent to come here, if all his expenses only are paid ; but to my great disappointment he replied he would not come except for a pay not less than Rs. 150 per month, and this reply came to me after about three months delay. Naturally therefore the authorities at the India office,.............. omitted that part of the scheme I proposed and wrote to me curtly that this is an undertaking for one of the Native Princes, to take. So every thing has blown to the wind and I am where I was, in connection with my object. Now to approach the Native States you know is worse than leather-hunting in the India jungles. As a last resource therefore I thought it proper to address you in the matter.

" I need not tell you what a valuable opportunity the Paris exhibition will afford to people of real merit. Irrespective of

any other thing I would strongly recommend every Indian and who can afford to do that to pay a visit to Europe at the time. As second oppoitunity of this sort, we need not expect in our life; so, if your Bhaurao will make up his mind to pay Europe a visit at the time, I am sure it will not be, in any point of view a bad thing for him. I am sure he is able enough to do it on his own behalf. The concession given by the India office has been withdrawn and every man who comes here must trust to his own legs in point of expenses. Nevertheless, I promise to leave no stone unturned to make his visit if he comes here, profitable to him. There are thousands of ways of doing these things. I may approach the music Halls to make some arrangements for his performances, the details of which I will write to you on hearing from you as to how Mr. Bhaurao is disposed to take the scheme. I hope you will kindly oblige me by reading the whole letter to him and favouring me with a reply. The trip–supposing he cannot make any money–will cost him abcut Rs. 2000 for him alone; but for this he will not only see the

Paris-exhibition but he may be brought in contact with all English actors of fame and I am sure he will be very popular in England, in every society and in every circle. He will come in contact with the whole of Western civilization and as English people are very fond of music he will, I am sure, find his way in the highest circles and may be, he might push himself even before the Queen. A reply as early as possible will greatly oblige.

Hoping to be excused for the troubles and with best regards to yourself and Bhaurao.

Yours faithfully,

N. B. WAGLE.

I send this letter to Gwalior as per your advertisement in Kesari. "

---

वरील पत्रावरून रा० **वागळे** यांची **भाऊरावांबद्दल** पूज्यबुद्धि तर व्यक्त होतेच, परंतु तिच्याबरोबर त्यांच्या मनाची कळकळही अधिक दिसून येते. हे कसे बाणेदार व निग्रही आहेत हें त्यांनीं आपल्या वर्तनानें दाखविल्याचें सर्वप्रसिद्ध आहेच.

**भाऊरावां**सारखा मनुष्य **इंग्लंड**मध्यें जाण्यायोग्य होता, यांत शंका नाहीं. परंतु तेथें त्यांनीं एकटें जाऊन कांहीं उपयोग झाला नसता. बरोबर उपयोगाला लाग-

णारीं चारपांच माणसें न्यावयाचीं व तेथील गायन व नाट्यकलेची बरोबर माहिती करून घ्यावयाची ह्मणजे निदान दोन तीन महिने तरी तेथें घालविले पाहिजे होते. व एवढा खर्च करावयाचा ह्मणजे **भाऊरावांची** आज-पर्यंतची प्राप्ति त्या कामांत खर्चीं घालायाला पाहिजे होती. ही गोष्ट राजाश्रयानेंच घडून यावयाची. ह्मणून नेटिव्ह संस्थानिकांजवळ या संबंधानें विनंति करून त्यांच्याकडून कांहीं मदत झाली तर पुढें मागें जाण्याचा त्यांचा विचार होता. परंतु पुढें—

**मनसा चिंतितं कार्थं दैवमन्यत्र चिंतयेत्**

या वचनाप्रमाणें त्यांचा विलायतेला जाण्याचा विचार जागच्या जागींच राहून ईश्वरीसंकेतालाच त्यांना मान द्यावा लागला.

---

## कांहीं विशेष गोष्टी.

**भाऊरावांनीं** आपल्या गोड आवाजानें लोकांचें रंजन केलें त्यापेक्षां नाटकाच्या दृष्टीनें त्यांनीं विशेष काय केलें, हा प्रश्न स्वाभाविक उत्पन्न होतो. चांगला आवाज असणें ही ईश्वरी देणगी असल्यामुळें तिचें श्रेय ईश्वराकडे जातें; व नाटकांत ज्या ज्या भूमिका ते करीत असत, त्या करतांना जेथें तेथें त्यांना प्रेक्षकांकडून टाळ्यांचा वर्षाव होत असे, त्याचा भाग अंशतः तरी कवीकडे जातो. याप्रमाणें त्यांच्या गुणांची विशेष चिकित्सा कर-तांना कदाचित् दोन गुणांची अशा रीतीनें वाटणी होईल. **भाऊरावां**पेक्षां चांगलेही गाणारे असतील परंतु संगीतां-

मध्यें त्यांच्याकडे अग्रगण्यत्व जें आलें होतें त्याचें कारण त्यांचा गाण्याचा भारदस्तपणा, डौल व पद्धति यांच्यांत एक प्रकारचा जो मोहकपणा असे व ज्यांचें अनुकरण करण्याचा प्रत्येक गाणारा प्रयत्न करीत असतो हें होय. हे गुण इतरांस अद्याप साध्य झाले नाहींत. तसेंच किर्लो-स्करांनीं जशी नाटकाच्या इतिहासांत एकदम क्रांति घडवून आणून पूर्वींची पौराणिक व गद्य नाटकें नीरस करून टाकलीं; त्याप्रमाणेंच **भाऊरावांनींही** आपल्या गाण्यानें लोकांच्या चंचल व चवचाल अभिरूचीला शेवटपर्यंत आपल्या कह्यांत ठेवलें. त्यांनीं जें विशेष केलें तें हेंच. हे जर विशेष गुण त्यांच्यांत नसते तर त्यांची प्रसिद्धीही इतकी झाली नसती. त्यांचें एक गायनच कर्णमधुर होतें असें नाहीं, तर त्यांच्या भाषणांतही एक प्रकारचें माधुर्य असे. तसेंच वीरतनय नाटकांतलें शुंभ-सेनाजवळचें शूरसेनाचें भाषण व शारदा नाटकांत भुजंगनाथाची कोदंडानें केलेली निर्भत्सना हीं त्यांचीं वीरश्रीचीं भाषणें प्रेक्षकांच्या मनोवृत्ति जागृत करीत असत. **इंग्लंडमध्यें ग्यारिकचें** ज्या नाटकगृहांत सोंग होत असे त्या नाटकगृहांत त्या दिवशीं इतकी गर्दी जमत असे कीं, त्या गर्दीपासून एकप्रकारचा लोकांत ज्वर उत्पन्न होई व त्यामुळें "ग्यारिकफीव्हर" हें नांवच त्या ज्वराला पडलें होतें, अशी एक आख्यायिका आहे. किर्लोस्कर मंडळीच्या नाटकगृहांत अशा तऱ्हेची नेहेमींच गर्दी असे, तरी पण सुदैवानें तशाप्रकारचा **भाऊराव** यांच्यापासून लोकांना ताप वगैरे कधींच आला नाहीं. उलट भाऊरावांच्या

गाण्यापासून प्रेक्षकांच्या मनावर हर्ष व आनंदाचे जे तरंग उत्पन्न होत असत, ते पुन्हां नाटकगृहाकडे जाण्याला त्यांच्या मनाची प्रवृत्ति करीत असत यांत शंका नाहीं.

दुसरी एक गोष्ट त्यांच्यांत विशेष असे ती ही कीं, धंद्याचें खरें महत्व समजून ते वागत असत. रंगभूमीवर असतांना मनाचा उत्साह कायम ठेवण्याची हातोटी त्यांना फार चांगली साधली होती. हजारों लोक जमले तरी ज्या उत्सुकतेनें आपली कामगिरी बजवावयाची त्याच उत्सुकतेनें नाटकगृहांत अगदीं कमी जरी लोक असले तरी ते बजावीत असत, हा त्यांचा मनोधर्म असे. सामान्य नटाच्या ठिकाणीं हा रहात नाहीं. कांहीं तर इतके पराधीन असतात कीं, त्यांच्या मनाची समता अगदीं क्षुल्लक कारणानें बिघडते, व त्याचा परिणाम रंगभूमीवर ते दाखवितात. भाऊरावावर दोन वेळां असे प्रसंग आले होते कीं, ऐन प्रयोगाच्याच दिवशीं त्यांचीं मुलें बाळपणीं होणाऱ्या रोगांनीं मृत्युमुखीं पडावीं; परंतु त्यांनीं प्रयोगाच्या वेळीं स्वतःचा दुःखवेग आवरून कामें जशीं करावयाचीं तशीं केलीं आहेत.

स्वतःच्या मोठेपणापेक्षां ते धंद्याचा मोठेपणा अधिक समजत असत. नाटकाचा पेशा स्वीकारल्यापासून खाजगी रीतीनें गाण्याचें त्यांनीं अगदीं सोडून दिलें होतें. स्वतःच्या फायद्याकरितां ते जर आपल्या गुणाचा विक्रय मांडते तर दोन दोनशें रुपये दरमहा त्यांनीं सहज कमविला असता. परंतु त्यापासून आपल्या धंद्याचें महत्व कमी होईल अशा समजुतीनें त्यांनीं व रा० **मोरोबांनीं** देखील खाजगी

रीतीनें गाण्याची पद्धत ठेवलीच नव्हती. श्रीमंत **कोल्हापुरचे महाराज,** कै० श्रीमती **जमनाबाईसाहेब गायकवाड,** श्रीमंत **बाळासाहेब होळकर** यांचेकडे भेटीस जात असत तेव्हां, किंवा त्यांच्याकडून बोलावणें आलें असतां जात असत तेव्हां पुष्कळ वेळां गाण्याचा प्रसंग त्यांना आला होता; परंतु त्याचा त्यांनीं स्वतःकरितां मोबदला कधींच घेतला नाहीं. मंडळीचा प्रत्यक्ष रीतीनें फायदा होईल त्यांत पर्यायानें आपला आहेच असें समजून ते थोर लोकांशीं वागत असत.

त्यांच्या स्वतःच्याविरुद्ध वर्तमानपत्रांत कधीं टीका येत असत. वर्तमानपत्रांतल्या टीकांपैकीं बऱ्याच दुराग्रहमूलक, कधीं द्वेषमूलक व कधीं खऱ्याही असत. कारण वर्तमानपत्रांतील टीका बहुतकरून नाटकमंडळीची सुधारणा करण्याच्या उद्देशानें किंवा त्यांतील पात्रांचें गुणावगुण विवेचन करण्याच्या उद्देशानें फारच थोड्या लिहिलेल्या आढळतात. टीकाकारांचा मुख्य उद्देश आपल्या कुत्सित भाषासरणीनें व कोटिक्रमानें स्वतःच्याच लेखाला चवाठ्यावर आणण्याचा नेहमीं दिसत असतो. वास्तविक टीका करणारांचा उद्देश कांहीं तरी पात्रांना त्यापासून शिक्षण प्राप्त होईल असा असला पाहिजे; परंतु अनुभव असा नजरेस येतो कीं, जणू टीकाकार हे नाटकमंडळीच्या मागें ज्या अनेक उपाधि आहेत त्यांपैकींच एक आहेत.

**हेलनफासिट** नांवाच्या एका इंग्लिश नटीनें आपले नाटकांतले अनुभव प्रसिद्ध केले आहेत. त्यांत टीकाकारासंबंधानें तिचे वरच्यासारखेच उद्गार आहेत. ती ह्मणतेः—

"Fortunately for me, the critics then, as now, did not all agree. I was not allowed to see the news-papers; but unkind criticisms are sure to find their way to one some-how, through one channel or another, and to make their sting felt. A critic, to be of use,—and give a lesson worth learning, should point out first what is good—for no work worth speaking of at all can be without some good—then the faults specified can be listened to in a patient and proper spirit."

असो, **भाऊरावांनीं** असल्या टीकांचा कधींच विषाद मानला नाहीं. इतकेंच नव्हे तर खरे दोष काढणारांचे त्यांनीं प्रत्यक्ष आभार मानले आहेत. पुण्याच्या व मुंबईच्या प्रेक्षकांबद्दल त्यांची विशेष पूज्यबुद्धि असे. खरा मार्मिकपणा या दोनच ठिकाणीं आहे अशी त्यांची समजूत होती. लोकांनीं आपल्या नुसत्या आवाजावरूनच आपल्यास चांगलें ह्मणावें अशी त्यांची बिलकुल इच्छा नव्हती, तर आपली करामत पाहून आपल्यास चांगलें ह्मणावें असा त्यांचा सदोदित प्रयत्न असे.

ईश्वरानें त्यांस आवाजाची देणगी दिली होती ती इतकी मजबूत असे कीं, सबंध अठरा वर्षांत आवाज बसला अशी एक दिवस देखील तक्रार त्यांनीं केली नाहीं. कांहीं लोकांची समजूत असे कीं, ते आपला आवाज चांगला राखण्याकरितां औषधोपचाराची योजना

करीत असत. परंतु ही समजूत निव्वळ खोडसाळपणाची होती. असल्या कृत्रिम उपायांची त्यांना कधींच जरूर पडली नाहीं. त्यांचे आवाज चांगले राखण्याचे उपाय म्हणजे प्रयोगाचे दिवशीं एक आहारीं व शुचिर्भूत राहणें हा जो भरतशास्त्रप्रणित मार्ग तो ते शब्दशः पाळीत असत.

**भाऊरावां**च्या संबंधानें लिहितांना **सयाजीविजय** पत्रांतल्या **पुण्या**च्या बातमीदारानें एकंदर संगीत नाटकांची संगतवार हकीकत, त्या संबंधानें लोकांच्या मनावर झालेला परिणाम, संगीतकलेंत व गायनविद्येंत झालेला फेरफार यांचें चांगलें विवरण केलें आहे. तें पत्र त्यांच्या चरित्रांत स्थळ देण्या योग्य आहे म्हणून जसेंच्या तसें दिलें आहेः—

## " संगीत नाटकें.

[ आमच्या पुणेंकर बातमीदाराकडून. ]

**पुणें** ता. ८-३-१९०१.

अलीकडे संगीत नाटकें पैशापासरी झाल्यामुळें म्हणा, त्यांच्याबद्दल कोणास फारसें महत्व वाटणार नाहीं हें खरें आहे. परंतु संगीत नाटकांच्या पहिल्या पहिल्या दिवसांत त्यांचें प्रस्थ किती माजलें होतें, हें जुन्या वर्तमानपत्रांच्या फायली चाळणारास तेंव्हांच दिसून येतें. **अण्णा किर्लोस्करां**चे मंडळीनें थोडक्याच काळांत किती पैसा मिळविला यावरूनही हें लक्षांत येणार आहे. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीवरून दहा दहा वीस वीस कोसांवरून लोक **अण्णांचें** नाटक पहाण्यास येऊन

रुपयाच्या तिकीटास पांच रुपये देऊन, नाटकाची रात्र उभ्यानें घालवून व प्रसंगविशेषीं तिकीट न मिळाल्यानें हिरमुसलेलें तोंड करून परत तितकी मजल चालत गेलेल्या गृहस्थांच्या गोष्टी मीं ऐकलेल्या आहेत. कुलीन-स्त्रियांनीं हट्ट करून नवऱ्याचे पेटींतून पैसे काढून, गरी-बांच्या बायकांनीं फणी, करंडे व फण्या गहाण टाकून व विधवांनीं गळ्यांत घातलेलीं कानकोर्णीं विकून, **अण्णांचें** नाटक पाहण्यास जाण्याकरितां पैसे उत्पन्न केल्याच्या गोष्टी अनेक ऐकिवांत आहेत. साधारण पैशांचे कामीं हात जड असणाऱ्या गृहस्थांच्याही या नाटकांचे कामीं नाड्या बऱ्याच हलक्या झाल्या; व गरीबांनीं एक दिवसा-ची उपासमार—एक नाटक पाहण्याकरितां अनेकवेळां—सोसलेली आहे. परंतु हा सर्व प्रकार केवळ **अण्णांचे** नवीन टुमीमुळेंच झाला होता असें नाहीं. तर **अण्णांचे** मंडळीचे अंगीं गुणच तसा होता. **अण्णांचें** नाटक पाहण्यास फक्त गृहस्थच जात असें नाहीं, तर धंदेवाले प्रसिद्ध गवयीही जात असत. व **भावड्या** ह्मणजे प्रति-गंधर्व आहे असे धन्यवाद त्यांच्या तोंडून निघालेले मीं स्वतः ऐकलेले आहेत. नाटकगृहांत तर हे धन्यवाद पावलोंपावलीं ऐकण्यास सांपडत. उन्हाळ्यांत संध्याका-ळचे वेळीं उकडत असतां मध्येंच एखादी गार वाऱ्याची झुळुक आली असतां किंवा अंगास वाळ्याचें अत्तर चोंपडलेला एखादा चैनी गृहस्थ आपल्या जवळून झपकन् गेला असतां, आपल्या शरीरास व घ्राणेंद्रियास अनिर्वचनीय सुख होऊन आपल्या तोंडून ‘ अहाहा ! ’

असा जो एकदम उद्गार निघतो, अशाच तऱ्हेचे उद्गार **भाऊरावांची** एखादी उत्कृष्ट तान कानीं पडतांच सर्व प्रेक्षकगणांचे तोंडून निघालेला कोणी ऐकलेला नाहीं ? आपल्या गांवीं **किर्लोस्कराचें** नाटक यावयाचें आहे, असें ऐकतांच पंचागांत न सांपडणारा असा एखादा नवीन सणच उपस्थित झाला आहे किंवा काय असें लोकांस वाटावें. असो, अशा रीतीनें **किर्लोस्कर** मंडळीनें महाराष्ट्रांतील लोकांस एकाकाळीं अगदीं वेड लावून सोडलेलें होतें. अर्थात् या काळीं संगीत नाटकांबद्दल एकच मत होतें, व तें असें कीं, संगीत नाटक ही फार उत्तम व उपयुक्त संस्था आहे. परंतु क्रमाक्रमानें संगीत नाटकमंडळ्या पुष्कळ झाल्या, व अर्थातच त्यामध्यें चांगल्यावाईट पात्रांची भेसळ होऊं लागली, व यामुळें संगीताची वाईट बाजू लोकांचे नजरेपुढें येऊं लागली. किर्लोस्करांची मंडळी सर्वच मोठी शास्त्रीयपद्धतीनें गाणारी होती असें नाहीं, परंतु त्यांचे कंठ व इतर झोकनोक इतका उत्तम होता कीं, त्यांचे खालीं त्यांचे गाणें शुद्ध कीं अशुद्ध हें पाहण्यास लोकांस सवडच सांपडत नसे. शिवाय कोणत्याही संस्थेचा एकदम उत्कर्ष होण्यास त्यांत चांगल्या व्यक्तींचा एकसमयावच्छेदेंकरून समावेश व्हावा लागतो. यास उदाहरण न्यू इंग्लिशस्कूलचेंच कां घ्याना ? न्यू इंग्लिशस्कूल इतकें लोकप्रिय झालें त्यास कारण, रा. **चिपळूणकर, टिळक, आगरकर, आपटे** हे सर्व एकदम एके ठिकाणीं जमले हें होय. हेच गृहस्थ पृथक्

पृथक् **वेळीं,** व निरनिराळ्या संस्थांत असते तर त्यांचीही इतकी **कीर्ति** झाली नसती व **न्यू स्कूल**चीही झाली नसती. त्याचप्रमाणें **नाटेकर** किंवा **भाऊराव** किंवा **मोरोबा** ही मंडळी फुटून निरनिराळ्या नाटकमंडळींत असती तरीही त्यांचें इतकें तेज पडलें नसतें व संगीत नाटक ही संस्था इतकी लोकप्रिय झाली नसती. असो, **किर्लोस्करा**नंतर **डोंगरे, ललितकलोत्सव** मंडळी, **किर्लोस्करानुयायी, पाटणकर, गोविंदकर, माणिकप्रसाद, नाट्यकलोत्तेजक** वगैरे अनेक मंडळ्या झाल्या, परंतु कदाचित् **डोंगऱ्यां**खेरीज करून या मंडळ्यामध्यें **अण्णा किर्लोस्करां**चे योग्यतेचा व बुद्धीचा एकही सूत्रचालक नव्हता, व **भाऊरावां**सारखें एकही पात्र नव्हतें. शिवाय कालगतीनें अस्सलीची नेहमीं नक्कल व प्रतिनक्कल होत जात असते. व या नकलेमध्यें व प्रतिनकलेमध्यें गुणापेक्षां दोषांची छाया अर्थात् अधिकाधिक प्रतिबिंबित होत जाऊन शेवटीं मूळ गुणांचें रूप पालटतें व तो दोषरूपी होऊन लोकांचे अनादरास प्राप्त होतो. हीच गोष्ट संगीत नाटकाची झाली आहे. **अण्णा किर्लोसकरांनीं** प्रथमतः रागबाद व संभावित गाण्याचे पद्धतींत थोडासा फरक केला. ह्मणजे ख्याल, टप्पा सोडून देऊन किंबहुना ठुंबरीही सोडून देऊन, निव्वळ पदांवर मजल आणून सोडली; व त्यांच्या पात्रांस शास्त्रीय शिक्षण चांगलें मिळालें नसल्यामुळें शुद्धाशुद्धाची सरमिसळ होऊन व प्राकृत जनास जें विशेष गोड लागेल त्या पद्धतीचा स्वीकार करून, नवीन संगीताचा पाया

रचला. परंतु हा दोष पुढें पुढें फारच विकोपास गेला. खुद्द **किर्लोस्करांचे** मरणानंतर त्यांचे नांवावर चाल-णाऱ्या मंडळींतही गाण्याचे कामीं अशिक्षितपणा व स्वेच्छाचारप्रियता हीं बेसुमार वाढलीं, व आपल्या साम-न्यास टिकण्यास कोणी नाहीं असें वाटून **भाऊराव** वगैरे मंडळीसुद्धां वाटेल तसें गाऊं लागली. याचा प्रत्यय लोकांस येऊन चुकला व १८९८ सालीं **किर्लोस्कर** मंडळी **पुण्यास** असतां आजपर्यंत कधीं कोणी न ऐकलेली टीका, एका गृहस्थानें **केसरी** पत्रांत पत्रद्वारा उघड करून प्रतिकूळ असें लोकमत प्रगट केलें. या टीकेचा मंडळीस विषाद वाटला. परंतु पूर्वी आपल्या खऱ्या गुणांचे शक्तीवर जनमनावर जें आपण साम्राज्य केलें तें हळूंहळूं कमी होत चाललें आहे, व तसें होणें बरोबर नाहीं हें **भाऊरावा**दि मंडळीस त्यांचें त्यांसच पुढें उमजूं लागलें. परंतु त्यांचे अंगीं खिळ-लेला दोष दुरूस्त होण्यासारखा नव्हता, व अशा रीतीनें **भाऊरावां**चे मृत्यूनें खरोखर शेवटचा ‘ संगीत नायक ’ नाहींसा झाला. त्यांचे मागें बऱ्याच संगीत नाटक मंडळ्या चालू आहेत, परंतु त्यांतील पात्रांस ‘ संगीत नायक ’ होण्याची बिलकुल आशा नाहीं व यास्तव आपल्या अशा-स्त्रीय व अरसभरित गाण्यानें जनरुचि जास्त बिघडवून टाकण्यापेक्षां ते ‘ मूकनायक ’ च होतील तर फार बरें. असो.

संगीत नाटकांचे गुणदोष पाहतांना प्रथम ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, त्यांतील गाण्यांत उत्तम शास्त्रीय

पद्धति ठेवतां येणार नाहीं. ह्मणजे उत्तम गवयी एकएक चीज एकाच रागांत अर्धा अर्धा तासभर सुद्धां गाऊं शकतो; एवढेंच नव्हे तर किंबहुना ती तितका वेळ गाइली तरच रागाचें खरें व पूर्ण स्वरूप व तसेंच गवयाच्या ज्ञानाचें व गळ्याचें खरें कसब हें व्यक्त करितां येणें शक्य आहे. परंतु संगीत नाटकांत असें होणें शक्य नाहीं. कारण, संगीत नाटक फार तर चार साडेचार तास चालावयाचें, व तेवढ्यांत पांच चार पात्रांस मिळून ४०-५० पद्यें ह्मणणें भाग पडतें. त्याअर्थी गवयाचे पद्धतीनें संगीत पात्रांस गाणें शक्य नाहीं. तथापि, कोणच्याही पद्यांत रागाचें शुद्ध व शास्त्रसिद्ध स्वरूप ठेवणें व पात्रांची योग्यता संभाळून गाण्यांत जितका प्रौढपणा आणितां येईल तितका आणणें, व ताना घेणें त्या शास्त्रीय नियमास धरून घेणें, इतक्या गोष्टींबद्दलची खबरदारी राखिली असतां संगीत हें शास्त्रीयज्ञानी गवयांसही प्रिय होईल. वास्तविक गवयी गाण्यांतही क्रमाक्रमानें फेरबदल होत चालला आहे. म्हणजे पूर्वीं गाणें ह्मटलें ह्मणजे धृपद, ख्याल, टप्पा व फार झालें तर ठुंबरी इथपर्यंत त्यांची मजल असे, ती आतां गज्जल, पद, चतरंग व लावणी येथपर्यंत मजल आली आहे! तर अशा स्थितींत शास्त्रीय स्वरूप ठेवून व फक्त आलाप कमी करून व वेळ कमी करून जर संगीताची रचना होईल तर फारशी हानी न होतां नवीन पद्धतींतील जो चटकदारपणा आहे, तो कायम राहील. परंतु अलीकडे संगीतांत जो बाष्कळपणा वाढलेला आहे, तो तर सर्वांशीं

कमी झालाच पाहिजे. हल्लींचें संगीत ह्मणजे सुधारकांत मागें एका गमत्या गृहस्थानें वर्णिलेल्याप्रमाणें कविता ‘ विटाळ्याची ’ झाली आहे, व सर्व संगीत लावणीपर झालें आहे. प्रस्तुतच्या स्थितींत संगीताबद्दल कोणी तिरस्कार दाखविला तर तो यथायोग्यच आहे, परंतु वर दर्शविलेल्या तत्वांवर जर संगीताची सुधारणा होईल तर गायनकलेची अभिरुचि लोकांस उत्पन्न करण्याचें एक मोठेंच साधन समाजास मिळालेंसें होईल. कारण, गवयी लोकांनींही हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, त्यांच्या आढ्यतेनें व त्यांच्या गर्विष्ट-पणानें आजपर्यंत गायन गुरुमुखाच्या कुलपकिल्लींत अटकावून ठेवलें होतें तें आतां बऱ्याच रीतीनें चवाठ्या-वर आलें आहे. व ते जर प्राकृत लोकांशीं मन मोकळें करून वागतील तर गायनाची फिरून कदाचित् भरभराट होईल. गायनकलेचे पूर्वींच्या वैभवाचे दिवस गेले हें खरें आहे. परंतु आपणांतली अशी कोणती कला आहे कीं, तिचे पूर्वींच्या वैभवाचे दिवस गेले नाहींत ? प्रस्तुतचा काल ह्मणजे पडक्या राजमंदिराचे जोत्यावर चालचलाऊ वाडा बांधण्याचा आहे. गवयी लोकांचा पूर्वींचा राजा-श्रय जाऊन त्यांस मध्यम व सुशिक्षित लोकांचा आश्रय पत्करणें भाग आहे, व अशा स्थितींत आपल्या जुन्या विद्येस किंचित् नवीन स्वरूप देऊन जर लोकप्रिय कर-ण्याचें गवयी लोक नाकारतील तर समाजाची तर हानी आहेच, परंतु त्यांचें व त्यांच्या विद्येचेंही कायमचें नुक-सान होणार आहे. ”

वरील पत्रांतला शेवटचा भाग संगीत नाटकमंडळ्यांनीं, गवयी लोकांनीं व संगीत ग्रंथकर्त्यांनीं विचार करण्यासारखा आहे. म्हणून, प्रकृत विषयाला अप्रस्तुत असूनही, येथें त्यास मुद्दाम स्थळ दिलें आहे.

---

## स्वभाव, मतें वगैरे.

**भाऊरावांचा** स्वभाव फार मनमिळाऊ असे. मंडळीचें धुरीणत्व त्यांचेकडे होतें, परंतु सर्व मंडळीशीं प्रेमानें वागण्याची त्यांची हातोटी होती. मंडळीचे तीन मालक खरे, परंतु मंडळी आणि मालक यांच्यांतला सेव्य-सेवकभाव कोणालाच ठाऊक नव्हता म्हटलें तरी चालेल. किर्लोस्कर मंडळींत वाखाणण्यासारखी गोष्ट होती ती हीच कीं, एका विचारानें ती संस्था तिघांनीं चालविली होती. दोन भागीदारांनीं काढलेलें दुकान वर्षभर सुरळीत चालण्याची मारामार पडते; परंतु ही संस्था तिघांच्या मालकीखालीं अव्याहत सोळा वर्षे सारखी चालली होती. याचें मुख्य कारण हेंच कीं, एकानें केलेल्या व्यवस्थेंत दुसऱ्यानें ढवळाढवळ करावयाची नाहीं, हा त्यांचा नियम असे. खेरीज वरचेवर सल्ला मसलत विचारण्याला त्यांनीं आपल्यावर कोणी तरी वजनदार व कळकळीचे गृहस्थ अध्वर्यु नेमण्याची वहिवाट ठेविली होती. आरंभीं पनवेलीचे कै० **विठोबा खंडाप्पा गुळवे** व नंतर कै० **गणेश रामचंद्र किर्लोस्कर** एम्. ए., एल्. एल्. बी. हे होते. व ते वारल्यापासून डा० **गणेश कृष्ण गर्दे**. एल्. एम्. ॲंड् एस्. यांचेकडे मंडळीचा अध्वर्यु-

पणा आला आहे. पदरच्या मंडळीवर विश्वास टाकून काम करून घेण्याची त्यांची पद्धति असल्यामुळें मंडळींत प्रत्येक मनुष्यास स्वतःच्या जबाबदारीवर काम करण्याचा हुरूप येत असे. आपली बहादुरी फक्त रंगभूमीवर दाखविण्याचें आपलें काम आहे, असें ते समजत असल्यामुळें, घरांतील उठाठेवीकडे ते पहात नसत. ती व्यवस्था स्वतंत्र नेमलेल्या सेक्रेटरींवर सोंपविलेली असे. अशा तऱ्हेनें पूर्वींपासून मंडळीची अंतर्बाह्य अंगें व्यवस्थित बांधलीं गेलीं असल्यामुळें किर्लोस्कर मंडळीची संस्था दृढ होऊन बसली आहे.

**भाऊरावां**च्या स्वभावासंबंधानें वर सांगितलेंच आहे. त्यांना डामडौल, अहंपणा वगैरे बिलकुल आवडत नसे. ते हयात असतांना त्यांचें सचित्र चरित्र प्रसिद्ध करावें, अशी एका दोघां मासिक पुस्तककारांची इच्छा होती. परंतु आमच्या चांगल्या चांगल्या मासिक पुस्तककारांचेंही जीवन त्यांच्या आश्रयदात्यांच्या **सन्माननीय**—म्हणजे मोफत—आश्रयावर अवलंबून असल्यामुळें **भाऊरावां**च्या चित्राकरितां लागणारा खर्च करण्याचें त्यांस सामर्थ्य नव्हतें, त्यामुळें, **भाऊरावां**नीं स्वतःच्या खर्चानें आपलें चरित्र प्रसिद्ध करवावें अशी त्यांची खटपट चालली होती. पुस्तकाला मदत ह्मणून कांहीं मागण्यांत आलें असतें तर **भाऊरावां**नीं आपल्या शक्तीप्रमाणें कांहीं दिलें असतें. परंतु आपल्या खर्चानें आपलें चरित्र छापवून स्वतःभोंवतीं दिवा ओंवाळून घ्यावा यांत मला भूषण वाटत नाहीं असें म्हणून त्यांनीं ती गोष्ट नाकारली.

नाटकाच्या धंद्यामुळें अनेक लोकांशीं दळणवळण व संघट्टण होण्याचा जसा प्रसंग येतो तसा दुसऱ्या एखाद्या धंद्यामुळें कदाचितच येत असेल. बारीक रीतीनें पाहणाराला प्रकृतिवैचित्र्य व स्वभाववैचित्र्य यांचे अनेक जागीं मासले दृष्टीस पडतात. **भाऊरावां**च्या नाटकांतल्या आयुष्यक्रमांत त्यांना असे मासले कितीतरी दृष्टीस पडले आहेत ! नाटक पाहण्याच्याच हेतूनें स्नेह करणारे व **भाऊरावां**ची व आपली ओळख आहे हें लोकांस दाखविण्याच्या हेतूनें स्नेह करणारे व त्यांच्या खऱ्या गुणांवर लुब्ध होऊन त्यांच्याशीं स्नेह करणारे असे बरेच स्नेह्यांचे वर्ग त्यांच्या हयातींत झाले होते. या प्रत्येकाची योग्यता ओळखून त्यांशीं ते संबंध ठेवीत असत. त्यांच्याशीं संघट्टण नसणाऱ्यांना त्यांच्या स्वभावांत एक प्रकारची बेपर्वा आहे असें प्रथम वाटत असे. परंतु विशेष सहवासानें तीच त्यांची समजूत उलट होत असे. नाटकवाले ह्मणजे माणसांतून उठलेलीं माणसें अशी ज्यांची समजूत अशांशीं मात्र ते ताठ्यानें वागत असत व अशा समजुतीचे लोक थोडे आढळतात असें नाहीं. गारुडी, तमासगीर, जादुगार या दृष्टीनें केवळ नाटकमंडळीची किम्मत करून त्याप्रमाणें वागविणाराला ते अगदीं तुच्छ समजत असत व अशांशीं ते संबंधही ठेवीत नसत. स्वतःच्या धंद्याच्या मोठेपणाचा त्यांना फार अभिमान असे. इंग्रजी शिक्षणाचा त्यांना गंधही नव्हता. परंतु चार देश हिंडल्यानें, व नेहमीं सुशिक्षित व विद्वान लोकांशीं त्यांचा सहवास पडत असल्या कारणानें, त्यांच्या वागणुकींत, आचारविचारांत

व संभाषणांत अशिक्षितपणा कोठेंच दिसत नसे. आपल्या धंद्यासंबंधानें कोठेंही विषय निघाला तरी त्यांत आपलें मत ते बिनचूक देत असत.

नाटकमंडळी लोकांना वाईट प्रकारचें वळण लावतात असा नाटकमंडळ्यांवर नेहेमीं आक्षेप येत असतो. **भाऊरावांची** समजूत याच्या अगदीं उलट असे. लोकांची अभिरुचि बिघडत चालल्यामुळें नाटकवाल्यांनाच उलट वाईट वळण लागत चाललें आहे असें त्यांचें मत असे व तें कांहीं अंशीं खरेंही आहे. कारण, विचारसौंदर्य, रचनाचातुर्य, अर्थालंकार वगैरे काव्यांना शोभा देणाऱ्या गुणांची किंमत उकिरड्यावर टाकलेल्या रत्नाप्रमाणें वाटून, जेथें हिडिसपणा भरला आहे अशी काव्यरुचि व नाटकपद्धति लोकांस पसंत पडूं लागली तेथें फक्त नाटकवाल्यांवर दोषाचें खापर फोडण्यांत काय अर्थ आहे. ! *

---

*इंग्लंडमध्यें सुद्धां आलीकडे शेक्सपियरचीं नाटकें मागें पडून फार्सासारखे चुटके नाटकरूपानें पुढें येऊं लागले आहेत. एकोणिसाव्या शतकांत चांगला नाटककारही कोणी निपजला नाहीं, असें एका इंग्रजी वाङ्मयाच्या ग्रंथांत लिहिलेलें आढळतें. यावरून नाटकाबद्दल तिकडचीही अभिरुचि कशी बदलली आहे हें स्पष्ट दिसतें. **थेलमा** नांवाच्या एका कादंबरींतील पुढील उद्गार वाचण्यासारखे आहेत:—

"........Besides it is the fashion now a days to be *chiffonnicrs* in literature–to pick up rags of life and sort them in all their uncomeliness before the morbid eyes

भाऊरावांचा स्वभाव फार धिमा असे. १८९३ सालीं बडोद्यास त्यांनीं आपल्या स्नेह्याला चार हजार रुपये उसनवार दिले होते. ते तो अकस्मात् वारल्यामुळें बुडाले, व त्याच्या घरच्या मंडळीची वासना ते देण्याची नव्हती असें त्या मंडळींनीं त्याच्या पश्चात् जी मालमत्तेची लांबवालांबव केली त्यावरून म्हणावें लागतें. परंतु एवढी रकम एकदम बुडाली तरी त्याबद्दल त्यांना हळहळ वाटली नाहीं. पुन्हां मिळविण्याची माझ्यांत धमक आहे असें म्हणून त्यांनीं समाधान करून घेतलें. ते आपल्या स्नेह्यांना स्वतःच्या पैशानें द्रव्यद्वारा पुष्कळ वेळां मदत करीत असत.

मंडळींच्या पैशाचा व्यापाररीत्या कांहीं तरी उपयोग करीत असावा असें त्यांच्या पुष्कळ वेळां मनांत येई. परंतु व्यापाराची अस्थिरता, त्याप्रमाणेंच आंत एक, बाहेर एक असें दाखविण्याच्या त्यांतल्या निरनिराळ्या रीति, व सचोटी व एकोपा यांचा अभाव इत्यादि त्यांतल्या भानगडी समजून घेऊन फायदा झाला नाहीं तरी पतकरला, परंतु

---

of the public. What's the use of spending thought and care on the manufacture of a jewelled diadem, and offering it to the people on a velvet cushion, when they prefer an "*ollapodrida*" of castoff clothing, dried bones, and candle-ends? In brief, what would it avail to write as grandly as a Shakespeare or Scott, when society clamours for Zolu and others of his school?"

मंडळीची रक्कम सुरक्षित असावी अशा बुद्धीनें मंडळीच्या शिलकीच्या मोठमोठ्या रकमा बिनव्याजीं मागें सांगितलेल्या मंडळीच्या अध्वर्युपैकीं गृहस्थाजवळ ते ठेवीत असत.

पैसा कसा मिळेल ही त्यांना कधींच फिकीर वाटली नाहीं. पैसा मिळविण्याचें साधन आपल्या हातांत आहे असें ते गर्वानें ह्मणत असत. ह्मणून पैसा मिळविण्याकरितां एखाद्याच्या भिडेला पडून मनाविरुद्ध कोणतीही गोष्ट ते करीत नसत. संगीत सौभद्रांत पुन्हां त्यांनीं सुभद्रेची भूमिका करावी अशाबद्दल एक दोन ठिकाणीं मोठमोठ्यांचा आग्रह पडला होता. परंतु ती गोष्ट त्यांनीं कबूल केली नाहीं. व त्या वेळाला उत्पन्नही पूर्वींसारखें होत नव्हतें तरी त्यांनीं आपला बाणा सोडला नाहीं. किर्लोस्कर मंडळीचें अस्तित्व आपल्या एकट्यावरच असावें अशी त्यांची इच्छा नव्हती. आपल्याशिवाय नाटक पाहण्याची संवय लोकांना झाली पाहिजे. कारण कधीं तरी आपल्याशिवाय संस्था चाललीच पाहिजे. तेव्हां अगोदरपासूनच तशी संवय लावलेली बरी; केवळ लोकांच्या छंदानें चालून आपण पराधीन राहण्यानें संस्था शेवटपर्यंत चालणार नाहीं. ही त्यांची दूरदृष्टि विचार करण्यासारखी होती. कोत्या विचाराचे व स्वार्थदृष्टि लोकांचें पहाणें फक्त आपल्यापुरतेंच असतें. व अशाच लोकांचा भरणा या धंद्यांत फार असतो. आपल्यामुळें संस्था अडते आहे असें त्यांना समजलें कीं, आज या मंडळींत, उद्यां त्या मंडळींत असा प्रकार होऊन त्याचा ते फायदा घेत असतात. त्यामुळें त्यांच्या आयुष्यांतील

वर्षसंख्येपेक्षां त्यांच्या नाटकांचीच संख्या अधिक होते. व अशा लोकांमुळेंच धंद्याला एक प्रकारचा कमीपणा आला आहे. असे प्रकार किर्लोस्कर मंडळीच्या संस्थेंत, **भाऊराव** लहान होते तेव्हां व पुढें मालकांपैकीं झाले तेव्हांही झाले नाहींत, ही या संस्थेंत घेण्यासारखी गोष्ट समजली पाहिजे.

**भाऊरावां**च्या ठिकाणीं दया हा गुण विशेष होता. कोणी कसाही अपराध केला तरी नुसत्या शब्दापलीकडे त्यांनीं कोणाला शासन केलें नाहीं. नाटकाच्या धंद्यांतला मोठा दोष हा आहे कीं त्यांतलीं मुलें निरूपयोगीं झालीं, म्हणजे त्यांस पुढें निर्वाहाचें साधन नाहींसें होऊन त्यांचा सारा जन्म कष्टांत जातो. नाटकवालेही आपल्या कामाशिवाय त्यांच्या कल्याणाची परवा करीत नाहींत. अशी सर्वत्र स्थिति आढळून येते. परंतु **भाऊरावांनीं** निरूपयोगी झालेल्या मुलांचाही अन्य रीतीनें उपयोग करून त्यांचा दुसरीकडे अधिक फायदा दिसल्याशिवाय त्यांस सोडलें नाहीं. किर्लोस्कर मंडळींतील मनुष्य नाटकाच्या वाऱ्या करतांना आढळत नाहीं यांतलें बीज हेंच आहे.

---

## एक अत्यंत विचार करण्यासारखी गोष्ट.

येथपर्यंत **भाऊरावां**च्या चरित्रांतील महत्वाच्या गोष्टी, चरित्र या दृष्टीनें अवश्य तितक्या सांगितल्या आहेत. **भाऊरावां**चें चरित्र म्हणजे किर्लोस्कर मंडळीचा संक्षेपानें लहानसा इतिहास ह्मणण्यास हरकत नाहीं. **भाऊरावांनीं** अमुक वर्षीं अमुक केलें, तमक्या वर्षीं ते पाण्यांत किंवा

माडीवरून किंवा जिन्यावरून पडले अशा तऱ्हेनें भाकड-कथा देऊन त्यांचें चरित्र वाढविण्यापासून कांहीं फायदा नाहीं. ज्या कलेंत त्यांनीं नांव मिळविलें किंवा त्यांच्यामुळें ज्या कलेचें महत्व अधिक वाढलें, अशा ज्या गोष्टी त्यांचा विचार येथपर्यंत बहुतेक येऊन गेला आहे. आतां जी एक त्यांच्यासंबंधांची अत्यंत महत्वाची गोष्ट तिचा जर येथें विचार केला नाहीं, तर त्यांचें चरित्र म्हणजे एक " **भाऊरावां**च्या स्तुतिपाठाचें " पुस्तकच होऊन बसणार आहे. व्यक्तिशः **भाऊराव** जरी स्वतंत्र होते, तरी ज्या अर्थीं हजारों लोकांचें तें एक आवडतें रंजनस्थान होऊन बसलें होतें, त्याअर्थीं सार्वजनिकदृष्ट्या तें एक सार्वजनिक मत्ता—Public property—होती म्हण-ण्यास हरकत नाहीं. तेव्हां त्या दृष्टीनें **भाऊरावां**त अस-लेल्या गुणदोषांचा समसमान विचार सत्यापलाप न करतां लोकांपुढें मांडणें हें चरित्रलेखकाचें कर्तव्य आहे.

**जॉन्सन**नें म्हटलें आहे कीं, " एखादा चरित्रकार स्वतःच्या माहितीवरून चरित्र लिहून लोकांची इच्छा तृप्त करण्याची घाई करील तर स्वहित, चरित्रनायका-विषयींची भीति, त्याच्या विषयींची कृतज्ञता, किंवा त्याच्यावरील भक्ति इत्यादि विचार मनांत येऊन कदा-चित् सत्यापलापाकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति होण्याचें भय आहे. आपल्या मित्राचे दोष झांकणें हा आपला धर्म आहे असें समजणारे पुष्कळ आहेत; व त्यामुळें सर्व व्यक्ती एकसारख्या स्तुतिपाठांनीं मढविलेल्या आपण पहातों. मग ही चांगली कां ती चांगली हें ओळख-

ण्याची मारामार पडते. जरी मृताच्या स्मृतिविषयीं आपली पूज्य बुद्धि व्यक्त करणें हें आपलें कर्तव्य आहे तरी, ज्ञान सद्गुण, आणि सत्य यांनाच अधिक मान दिला पाहिजे."

ज्या एका गोष्टीचा आतां विचार करावयाचा आहे, तिचा विचार अर्थशास्त्र, वैद्यशास्त्र, राजकीय, सामाजिक व धार्मिक इत्यादि निरनिराळ्या दृष्टीनें मोठमोठ्या पंडितांनीं, ग्रंथकर्त्यांनीं, वक्त्यांनीं व शहाण्यासुर्त्या लोकांनीं केला आहे. त्या पुढें प्रस्तुत लेखकासारख्या यःकश्चित् मनुष्याच्या लेखाची किंमत ह्मणजे वणवा लागलेल्या ज्वाळांच्या भडक्यावर कारंजाचे तुषार टाकल्याप्रमाणें आहे. तेव्हां त्या गोष्टीचा विचार आकाशाला हात घालणाऱ्या प्रयत्नाच्या मोठ्या दृष्टीनें न करतां अगदीं सामान्य उद्देश मनांत धरून करूं म्हणजे झालें. **भाऊरावांच्या** अंगीं जडलेल्या दोषांपासून सार्वजनिक नुकसान कोणाचें नव्हतें. इतकेंच नव्हे, पण त्यांच्या आयुष्यक्रमांत त्यांना जडलेल्या दोषांचा परिणाम आपल्या धंद्यावर त्यांनीं कधींही होऊं दिला नाहीं. अनेक गुणी व प्रतिष्ठित धंदेवाले लोक इतके एखाद्या व्यसनाच्या आधीन झालेले आपण पहातों कीं, ज्या वेळेला त्यांच्या गुणाची आपणास किंमत असते, किंवा ज्या वेळेला त्यांच्यापासून आपलें कांहीं मोठें कार्य साधावयाचें असतें त्याच वेळेला त्यांचा कांहीं उपयोग नाहींसा होतो. नाटकगृहांच्या दरवाज्यावर लोकांच्या झुंडीच्या झुंडी याव्यात तर दरवाजे बंद, अशी स्थिति किती वेळां तरी आपल्या दृष्टीस पडते. तसा प्रकार **भाऊरावांच्या** संबंधानें कधींच झाला

नाहीं. नाटकाच्या धंद्याभोंवतीं निरनिराळ्या मोह पाडणाऱ्या शक्तींचा गराडा इतका पडलेला असतो कीं, त्यांतून सुटका करून घेणारांची शहामत व पाण्याच्या भोंवऱ्यांतून आपणास सोडवून घेणारांची शहामत सारखीच समजली पाहिजे.

संगतीवांचून कोणतेंही व्यसन जडत नाहीं. एकटाच मनुष्य बाजारांत जाऊन तें आपल्याला लावून घेईल असें कधीं होत नाहीं. दीक्षा देणारा प्रथम कोणी तरी लागतोच. व जें व्यसन प्रथम आपण अगदीं तुच्छ मानतों, त्याचीच एकदां चव पहावीशी वाटते. मग तें परिणामानें भयंकर आहे अशी जरी आपली खात्री असते तरी आपण त्याचा अंगीकारच करतों. याची सत्यता पुढील वाक्यांनीं बरोबर होते.

"Vice is a monster of so frightful mien,
As to be hated, needs but to be seen;
Yet seen too oft, familiar with her face.
We first endure, then pity, then embrace."

**भाऊरावां**सारख्या सर्वप्रिय मनुष्याच्या निरनिराळ्या भक्तजनांनीं त्यांची मनधरणी करण्याचे जे मार्ग धरले होते, त्यांत त्याचें उपाकरण हें असें कीं त्या योगानें **भाऊरावां**ची एकेक कला ग्रासली जात असे. जी वस्तु दुःख आणि विपत्ति यांना बुडविण्याकरितां—to drown the sorrow and miseries, ह्मणून स्वीकारावयाची अशी समजूत आहे तिनें आजपर्यंत कोणाचीं दुःखें तर बुडविलीं नाहींतच, परंतु कित्येकांचीं घरें बुडवून त्या-

ठिकाणीं विपत्तीचीं देवळें मात्र उभारलीं आहेत. " गोड फळालाच कीड लागलेली आपण नेहमीं पहातों " असें मूकनायक नाटकांत एक वाक्य आहे, याची सत्यता **भाऊरावां**च्या गोष्टींत बरोबर दिसून येते. त्यांची आराधना करणारा गांवोगांवीं जो परिवार मिळत असे, त्यांनीं ही जर गोष्ट ध्यानांत घेतली असतां कीं, नुसते **भाऊरावां**ना एकटे संतुष्ट करण्यांत त्यांच्यावर जे हजारों लोक फिदा आहेत त्यांचा असंतोष होत आहे तर ज्या मार्गानें ते **भाऊरावां**चीं खुषमस्करी करीत होते, त्याला बराच आळा पडला असतां. *

आपल्या समाजाला खिळलेल्या एखाद्या व्यसनाचा सर्वथैव प्रतिकार करण्याचे इलाज सर्व बाजूंनीं थकलेले तर आहेतच; परंतु त्यांतल्या त्यांत सौम्य व हितावह असा उपाय सुचतो तो हा कीं, व्यसनाधीन झालेल्या मनुष्यानें, आपल्या भोंवतीं मित्रमंडळीचा परिवार न जमवितां एकेकटयानें जर त्यांचें सेवन करण्याची संवय ठेविली तर नियमितपणा राहून पुष्कळ कार्यभाग होईल. हल्लींच्या स्थितीला इतकी गोष्ट झाली तरी पुरें आहे. सारख्यासारख्या मंडळींचें एके ठिकाणीं एकदां सत्र

---

*"Let me remember" Says Hale, "When I find myself inclined to pity a criminal, that there is likewise a pity due to the country." जान्सनच्या चरित्रांत या दोन ओळी वाचण्यांत आल्या. त्या एखाद्या गुणी मनुष्यास व्यसनांत गुंतविणारांनीं, उक्त अर्थानीं लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.

बसलें ह्मणजे तेथें जो बेसुमारपणाचा अतिरेक होतो, आकाशपाताळ एक होतें, व दिनदुनिया खात्रींत नसते, असे जे प्रकार होतात, त्यांना तरी वरील रीतीनें प्रतिबंध केल्यासारखें होईल. घरीं आपलें भोजन नेहमीं आपल्या आहारांत होऊन सुखावह होतें, तेंच चार मंडळींत गेल्यानें, आग्रहानें व अत्याग्रहानें, अधिक होऊन कधीं कधीं अपायकारकही होतें; असा आपला अनुभव आहे. तेव्हां याच्याहीपेक्षां अधिक स्थिति वरच्या ठिकाणीं होत असेल यांत आश्चर्य नाहीं. तेथें आपपरभाव नाहींसा होतो, लहानथोरपणा विसरला जातो, व

**ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी**

अशी वृत्ति बनून जाते. तर यासंबंधानें ज्याला आपलें व आपल्याबरोबर आपल्या मित्रमंडळीचें हित साधावयाचें असेल त्याला मार्ग हाच कीं, त्यानें एकेकट्यापुरता खुशाल धुडगूस घालीत बसावें.

आतां असें कोठें एकही शहर आढळत नाहीं कीं, त्यांत कमीजास्तप्रमाणानें, पाश्चात्यसुधारणादेवतांचा संचार झाला नाहीं. नुसत्या पानसुपारीच्या लौकिकी उपचाराबरोबर, उघडपणानें, किंवा गुप्तपणानें धूम्र व पेय इत्यादि साहित्यांचा शिरकाव झाला नाहीं असा एकही समारंभ पार पडत नाहीं. अशा परिस्थितींत **भाऊराव** जसे जसे अधिक लोकप्रिय होऊं लागले तसा तसा त्यांचा स्नेहवर्गही अधिक वाढूं लागला. व त्या परिस्थितीचा संस्कार **भाऊरावां**वर झाला यांत आश्चर्य नाहीं. त्यांतूनही **भाऊराव** निर्लेप बाहेर पडते तर त्यांची थोरवी अधि-

कच होती यांत शंका नाहीं. परंतु प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं मानसिक दुर्बलता ही असतेच; तिला **भाऊरावां**सारख्या स्नेहलुब्ध भिडस्त मनुष्यानें वश होणें स्वाभाविकच आहे. तेव्हां **भाऊराव** जर एखाद्या व्यसनाधीन झाले असतील तर त्याबद्दल ते जितके दोषास पात्र होतील तितकाच त्यांचा भक्तवर्ग पात्र होईल असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें.

प्रस्तुत चरित्रांत हें जरी बरेंच विषयांतर झालें आहे तरी या चरित्राच्या मुळाशीं, त्याप्रमाणेंच नाटकधंद्याशीं व एकंदर व्यवहारांतील बऱ्याच गोष्टींशीं या विषयाचा संबंध पोंचतो ह्मणून प्रसंगानुसार सुचलेले विचार येथें व्यक्त केले आहेत याबद्दल वाचक क्षमा करतील.

---

## भाऊरावांचें दुखणें.

दुखण्यांत पडण्यापूर्वी सुमारें दोनतीन वर्षें **भाऊरावांची** शक्ति क्षीण होत चालली होती. तरी त्यांनीं आपल्या कामांत कधीं कसूर केली नाहीं. उलट लोकरंजनाचें काम एकट्यावर पडल्यामुळें पहिल्यापेक्षांही अधिक परिश्रम त्यांना करावे लागत असत. त्या श्रमांचा परिणाम त्यांच्या शक्तीवर होत होत कायमचा होऊन ता० ३ मे १९०० पासून ते कायमचे पुणें मुक्कामीं बिछान्यावर आजारी पडले. त्या दिवसापासून त्यांची बरी होण्याची चिंता मंडळींना व सर्व लोकांना लागली. उदरासारखा रोग असाध्य आहे ही गोष्ट जरी सर्वांना ठाऊक होती, तरी महिन्यानें **भाऊराव** बरे होतील, दोन महिन्यांनीं बरे

होतील ही आशा धरून शेवटपर्यंत त्यांना बरें करण्याचे भगीरथ प्रयत्न चालले होते; कारण त्यांच्या एकटयांच्या दुखण्याबरोबर एका सर्वप्रिय संस्थेची इमारत ढासळूं पहात होती. त्यामुळें चोहोंकडून त्यांच्या प्रकृतीबद्दल सर्व दरजाच्या लोकांकडून सारखी चौकशी होत होती. ग्वाल्हेरचे **सरदार श्रीमंत आंग्रेसाहेब** व **श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरज संस्थानचे अधिपति** यांनीं तर फारच काळजी दाखविली होती. **भाऊरावां**च्या शिवाय किर्लोस्कर मंडळीचें अस्तित्व संपलें असें प्रत्येकजण भाकीत करूं लागला. हें भाकीत केवळ खोटें होतें असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण त्यावेळीं **भाऊराव**ांच्या जागीं येणारा मनुष्य कसा मिळेल व तो कितपत लोकप्रिय होईल याची जबरदस्त शंका होती. तरी त्यावेळीं कोणत्याही उपायानें किर्लोस्कर मंडळीचें नांव पुढें चालूं रहावें ही सर्व लोकांची उत्कट इच्छा दिसून आली.

**भाऊरावां**च्या दुखण्यांत त्यांच्याबद्दल वाईट बातम्या दूरवर पसरल्या होत्या. त्यामुळें त्यांच्याबद्दलचीं दुखवटयाचीं पत्रें व तारा त्यांच्या हयातींतच त्यांस वाचावयास सांपडत होत्या. आपल्या पश्चात् आपल्यासंबंधानें बाहेर पडणारें लोकमत आपल्या हयातींत कळणें हें जीवितांतील परमसुखाचा कळस नाहीं असें कोण ह्मणेल?

मध्यें एक दोन महिने त्यांच्या प्रकृतींत बराच गुण आला होता. त्या वेळीं त्यांनीं सर्व लोकांचे प्रसिद्धपणें आभार मानण्याकरितां जे उद्गार काढले होते त्याचा आशय असा होता:—

" माझ्या दुखण्यांत, माझे आप्त व इष्टमित्र व माझी मंडळी काळजींत आहे हें स्वाभाविकच आहे. परंतु कांहीं संस्थानिक व सरदार इत्यादि थोर लोकांनीं, तसेंच व्यापारी, डाक्टर व इतर माझ्या परिचयाच्या व अनोळखी गृहस्थांनीं, ठिकठिकाणाहून जी माझ्याबद्दल काळजी दाखविली, तिच्याबद्दल या सर्वांचा मी फार आभारी आहें, हें ह्मणणें जरी आत्मश्लाघेचें दिसत आहे, तरी या सर्वांचे प्रसिद्धपणें आभार मानल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. माझ्यासारख्या सामान्य मनुष्याबद्दल इतकी काळजी दाखविण्यासारखें माझ्या हातून कांहींच झालें नाहीं. मी आजपर्यंत जी थोडीबहुत लोकसेवा केली असेल तिचा मोबदला माझ्या किंमतीपेक्षां लोकांकडून मला वेळोवेळीं मिळाला आहे. तेव्हां हा मोठेपणा माझ्या दृष्टीनें माझा स्वतःचा नसून कै० **अण्णासाहेबांनीं** जी संस्था उत्पन्न केली आहे तिचा आहे. तिच्या बऱ्याकरितां व ती सतत चालावी या हेतूनें ही काळजी लोकांनीं दाखविली आहे अशीच माझी समजूत आहे. .. .. .. मला कळविण्याला आनंद वाटतो कीं, माझ्या मंडळीनें माझ्याशिवाय ही संस्था चालविण्याचा दृढनिश्चय केला आहे. व हल्लीं माझ्या जागीं ज्या गृहस्थांची योजना केली आहे तेही सुशिक्षित असून कामाला लायक असे आहेत. तरी आजपर्यंत सर्व लोकांनीं किर्लोस्कर मंडळी आपली असें समजून जसें तिच्यावर अंतःकरणपूर्वक प्रेम ठेवलें होतें, तसेंच पुढेंही ठेवून तिला प्रोत्साहन द्यावें इतकीच सर्वत्रांस माझी विनंती आहे. "

दुर्दैवानें वरील मजकूर प्रसिद्ध करण्याची वेळ आली नाहीं. तरी त्यांतील उद्गार किर्लोस्कर मंडळीच्या आश्रय-दात्या व हितचिंतक मंडळीस अवश्य कळविण्यासारखे आहेत.

**भाऊरावां**च्या दुखण्यासंबंधानें शक्य तितके उपाय केले, हवा पालटल्या, परंतु त्यांचा कांहीं परिणाम न होता काळपाश त्यांच्यावर शेवटीं पडलेच. कष्टप्रद दिवस घालविण्याला ते फार कंटाळले होते. वांचण्याची त्यांना आशा नव्हती. तरी आपले अंगचे गुण अद्याप आहेत कीं नाहींत हें शेवटपर्यंत ते पाहत होते. मरणाच्या दिवशीं सुद्धां स्वतःचा सूर त्यांनीं सहज लावून पाहिला. " माझा आवाज आहे कां गेला हें पाहिलें पाहिजे. कारण आवाज गेला असेल तर वांचून तरी काय उपयोग ? " असें ते म्हणाले. यावरून आपली किंमत कशावर आहे हें शेवटच्या दिवसापर्यंत ते ओळखून होते.

दुखण्यामध्यें त्यांच्या मनाला आपल्या मागें मंडळी कशी चालेल ही रात्रंदिवस काळजी लागली होती. जव-ळचा पोरावाळांचा परिवार, व ज्यांची नाटकावरच उप-जीविका अशा लोकांची स्थिति ध्यानांत येऊन त्यांचें अंतःकरण कळवळे. किर्लोस्कर मंडळींतल्या लोकांनीं दुसऱ्या नाटकांत जाऊन पोट भरावें हा विचार त्यांच्या मनांत जाचूं लागला. परंतु परमेश्वरकृपेनें त्यांच्या देख-तच त्यांच्या कामाला योग्य असा मनुष्य मिळाला, व मंडळीचा भार पूर्ववत् शिरावर घेण्याला त्यांचे इतक्या दिवसांचे भागीदार **रामचंद्र विठ्ठल किंजवडेकर** हे

तयार झाले. त्यामुळें त्यांची मंडळीसंबंधाची तरी काळजी त्या दुखण्यांत नाहींशी झाली होती.

मंडळीचें नांव तिच्या लोकांनींच त्यावेळीं राखलें ही गोष्ट फार महत्वाची आहे. सुमारें सहा महिने सर्व माणसें रिकामीं होतीं तीं केवळ अभिमानानेंच होतीं असें ह्मटलें पाहिजे, व ह्मणूनच **भाऊरावांना** आपल्या डोळ्यांदेखत मंडळीला पूर्वस्वरूपांत पाहण्याची तीन महिने तरी संधि सांपडली.

सुमारें नऊ महिने **भाऊरावांनीं** दुखण्यांत काढले. त्यांच्या पत्रिकेवरून तें वर्ष त्यांना अति कष्टप्रद होतें हे त्या विषयाची माहिती असणारांना दिसून येईल. शेवटीं त्यांच्या कष्टाची मुदत संपतांच त्यांनीं पुणें येथें ता. १३ फेब्रुवारी १९०१ बुधवार रोजीं रात्रीं आपली इहलोकची यात्रा संपविली !

त्यांचा उदयकाळ जसा चांगल्या चांगल्या लोकांच्या उदयकाळाबरोबर झाला, त्याप्रमाणें त्यांच्या मृत्यूचीही वेळा दोन लोकोत्तर माणसांच्या मृत्युकाळींच आली. **न्यायमूर्ति रानडे, महाराणी व्हिक्टोरिया** व **भाऊराव कोल्हटकर** यांचे महिन्यापंधरा दिवसांच्या अंतरानें झालेल्या मृत्यूमुळें **सरस्वतीच्या मंदिरांतला दीप, इंग्लंडच्या बलाढ्य राष्ट्राची राजलक्ष्मी** व **नाट्य-कलेचा हिरा** हीं अनुक्रमें एकदम नाहींशीं झालीं !

**भाऊरावांनीं** जातांना आपल्या मागें सोडलेल्या आपल्या मंडळीला पुढील निरोप सांगितला आहेः—

"Already am I worn with cares
and age,

And abandoning the ungrateful stage
But you, whom every Muse and Grace adorn,
Whom I foresee to better fortune born,
Be kind to my remains, and oh, defend
Against your judgment your departed friend,
Let not the insulting foe my fame pursue,
But guard those laurels which descend to you."

( Comic Dramatists of the Restoration. )

---

## वर्तमानपत्रांतले मृत्यूलेख.

**भाऊरावां**च्या मृत्यूसंबंधानें बहुतेक महाराष्ट्रांतील सर्व मराठी वर्तमानपत्रकारांनीं आपल्या पत्रांतून दुःख प्रदर्शित केलें आहे. त्यांतले कांहीं उत्तारे पुढें देतों:

**विद्याविलास.** कोल्हापूर, ता० १५ फे० १९०१.

" प्रसिद्ध किर्लोस्कर संगीतनाटकमंडळींतील मुख्य भूमिकेचें काम करणारे रा० **लक्ष्मण बापूजी** ऊर्फ **भाऊराव कोल्हटकर** यांस गेल्या बुधवारीं उत्तररात्रीं दोन वाजण्याच्या सुमारास पुणें येथें देवाज्ञा झाली, ही वार्ता कळविण्यास आह्मांस वाईट वाटतें. किर्लोस्कर मंडळीच्या प्रसिद्धीस **भाऊराव** हे मूलभूत होते ह्यांत शंका नाहीं. ह्यांच्या सारखी मधुरस्वराची भूमिका इतःपर दृष्टीस पडणें मुष्किलीचें आहे असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. दोन दोन तीन तीन दिवस सारखीं नाटकें झालीं

आणि त्यांत यांना एकसारखें जरी काम असलें, तथापि यांचा आवाज बसत नसे. यांचा स्वभावही मनमिळाऊ व उदार असे. यांची मृत्यूवार्ता ऐकून, यांच्या परिचित मंडळीस परम दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं. यांचें वय ३८ वर्षांचें होतें. ह्यांनीं सदरच्या मंडळींत १८ वर्षे काम केलें. "

---

**सयाजी विजय**. बडोदें ता० १६ फे० १९०१.

" **एका उत्तम संगीत नटाचा अस्त !**

कै० अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या पश्चात किर्लो-स्कर संगीत मंडळीस स्थायिकत्व आणून, **बळवंतराव नाटेकर** व **मोरोपंत वाघोलीकर** यांसारख्या धुरंधर जोडीदार पात्रांनीं अंग काढून घेतलें असतांही ज्यांनीं किर्लोस्कर संगीत मंडळीचें नांव सारखें राखून लोकप्रीति संपादन केली, त्या **भाऊराव कोल्हटकरा**चा गेल्या बुध-वारीं १० वाजतां पुणें मुक्कामीं अस्त झाल्याची खेदजनक बातमी आली आहे. **भाऊरावांच्या** मरणामुळें एका चांगल्या गायन व अभिनयनिपुण नटाची खोट पडली आहे यांत संशय नाहीं. कै. **अण्णा किर्लोस्करांनीं** मराठी नाट्यकलेस संगीताचें रूप देऊन जी विशेष सुधारणा केली, त्याचें अनुकरण आज सर्वत्र होऊन पूर्वींची पौराणिक नाटकें जाऊन आज ही सुधारलेली नाट्यप-द्धति प्रचारांत आली, ही साधारण महत्वाची गोष्ट नव्हे. त्या मूळ उत्पादक कंपनीचे आजचे चालक रा. **भाऊराव** हे गेल्यामुळें किर्लोस्कर कंपनीचें अतोनात नुकसान झालें

आहे व त्यांच्या कुटुंबावर तर दुःखाचाच डोंगर कोसळला आहे. तें दुःख सहन करण्यास परमेश्वर त्यांस सामर्थ्य देवो व **भाऊरावांच्या** आत्म्यास शांति मिळो."

---

**केसरी.** पुणें ता० १९ फे० १९०१.

" कै० **अण्णासाहेब किर्लोस्कर** यांनीं काढलेल्या संगीत मंडळींपैकीं शेवटचे प्रसिद्ध गृहस्थ रा. **भाऊराव कोल्हटकर** यांस नुकतीच येथें देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हांस दुःख वाटतें. नाटकास ज्यांच्या साह्यानें संगीताचें नवें स्वरूप किर्लोसकर यांनीं दिलें त्यांतच **भाऊरावांची** प्रमुखत्वानें गणना होती व आज बरींच वर्षें आपल्या मनमिळाऊ स्वभावानें यांनीं कंपनीचें सर्व काम चालविलें होतें. नाटकाचे धंद्यास किर्लोस्कर यांनीं प्रातिष्ठित, नवें व मनोरंजक रूप आणलें, व त्याची आठवण महाराष्ट्रांतील लोकांस तरी बरेच दिवस राहील यांत शंका नाहीं. अशाप्रकारें तयार झालेली कंपनी पुढें चालू ठेवण्याची व्यवस्था होईल अशी आम्हांस आशा आहे. **भाऊराव** यांनीं आपल्या मृत्युपत्रांत दोन तीन हजार रुपये सार्वजनिक कामाकरितां काढून ठेविले आहेत असें समजतें."

---

**ज्ञानचक्षु.** पुणें ता० २० फे० १९०१.

" अलीकडे वीस वर्षांत ज्यांच्यामुळें, करमणुकीची व मनोरंजनाची एक कला उदयास आली ते गृहस्थ म्हणजे किर्लोस्कर संगीत मंडळींतील प्रसिद्ध **भाऊराव**

**काल्हटकर** यांस गेल्या बुधवारीं रात्रीं ११॥ वाजतां येथें देवाज्ञा झाली हें कळविण्यास आह्मांस फार वाईट वाटतें. कै. **अण्णासाहेब किर्लोस्करांनीं** संगीत नाटकाची तऱ्हा प्रचारांत आणण्याकरितां जीं पात्रें त्या वेळेस पैदा केलीं त्यांपैकीं **भाऊराव** हें फार परिश्रमानें मिळविलेलें पात्र होय. हे आपल्या गुणांत अप्रतिम होते, व कै० किर्लोस्करांचा लौकिक वाढविण्यास व मंडळीची भरभराटी होण्यास हेच मुख्य कारणीभूत होते असे ह्मटल्यास चिंता नाहीं.”

**—काळ.** पुणें, ता० १ मार्च १९०१.

“ लास्ट ऑफ दि रोमन्स ” असें प्रसिद्ध रोमन गृहस्थ रिन्झी यांना ह्मणत असत. त्याप्रमाणें “ लास्ट ऑफ दि किर्लोस्कर्स ” हे शब्द यथार्थपणें कै० **भाऊराव कोल्हटकर** यांस लागू करण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यांच्या अंगचा गाण्याचा गुण अप्रतिम होता. असले लोक आमच्यांत फार दिवस टिकत नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. **भाऊराव** यांनीं संगीत नाटकाच्या कलेला आपल्या अलौकिक गुणांनीं उत्तम दशेला आणलें यांत शंका नाहीं. किर्लोस्कर मंडळीनें यांच्या वियोगानें उदास न होतां आपला उद्योग चालू ठेवावा ह्मणजे ईश्वर त्यांना यशस्वी करील.”

---

पुढील दोन पत्रव्यवहार **सयाजीविजय** पत्रांत प्रसिद्ध झालेले आहेत:—

" रा० रा० ' **सयाजीविजय** ' कर्ते यांस,

वि० वि० खालील चार ओळींस आपल्या येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

लिहिण्यानें कीं, आपल्या ता० १६ फेब्रुवारी १९०१ चे अंकांत " एका उत्तम संगति नटाचा अस्त " ह्या सदराखालीं आलेल्या अकालिक अशुभ वर्तमानानें कै० रा० भाऊराव यांचे सर्व कुटुंबावर तर दुःखाचा डोंगरच कोसळला आहे. परंतु गुणग्राही लोकांनाही त्यांच्या वियोगापासून दुःख झालें आहे. रा. भाऊरावांचें नांव ठाऊक नाहीं असा मनुष्य साऱ्या मुंबई इलाख्यांत सांपडणें कठीण. कै० अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे मागें आजपर्यंत किर्लोस्कर कंपनी नेकीनें चालविण्याचें सर्व श्रेय रा. भाऊराव यांसच दिलें पाहिजे. संगीत गाणें ह्मणून ज्यास आज ह्मणतां येईल तें रा. भाऊरावांनींच शोधून काढिलें आणि तेंही त्यांचे बरोबरच लयास गेलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. खरोखरच ते या संगीत गाण्याचा शोध लावण्याकरितां परमेश्वराजवळून कांहीं मुदत घेऊन या मृत्युलोकांत आले होते असें वाटतें. रा० भाऊराव यांनीं आरंभापासून जर शास्त्रोक्त गाण्याचा अभ्यास केला असता, तर आजमितीस त्यांचे तोडीचा एकही गवई सांपडतां कीं काय याची शंका आहे. असें रत्न येत्या ५० वर्षांत होईल कीं नाहीं याची वानवा आहे. त्यांचा शास्त्रोक्त रीतीनें गाण्याचा अभ्यास जरी नव्हता, तरी जेव्हां जेव्हां ते कांहीं ठळक ह्मणजे भैरवी, मांड, कालंगडा, सारंग, भूपकल्याण वगैरे राग गात असत, तेव्हां मोठमोठ्या गवय्यासही तोंडांत बोटें घालण्यास ते लावीत असत, असा माझा स्वतःचा अनुभव आहे. असलीं अप्रतिम माणसें या मृत्यु-लोकांत वारंवार येत नाहींत, आणि चुकून आल्यास ईश्वर त्यांना येथें फार राहूंही देत नाहीं असें खरें. त्यांच्या निरभि-

मानी व मनमिळाऊ स्वभावामुळें ते लोकांस फारच प्रिय झाले होते. जसें आजपर्यंत कै० अण्णासाहेबांचे किर्लोस्कर संगीत मंडळीचें नांव रा. भाऊरावांनीं सारखें राखिलें, तसेंच कै. रा भाऊरावांचे मागें किर्लोस्कर संगीत मंडळीचें नांव राखणारा मनुष्य मंडळीस मिळो, आणि भाऊरावांचे आत्म्यास ईश्वर शांति देवो. मुंबई, ता० २२-२-०१.

आपला,

**शिवराम सदाशिव मनोहर.**"

---

[ आमच्या पुणेंकर बातमीदाराकडून ]

पुणें. ता० ८-३-१९०१.

" प्रसिद्ध नाट्यकलानिपुण व गायक रा. भाऊराव कोल्हटकर यांस तीन आठवड्यांपूर्वी देवाज्ञा झाली ही बातमी आपल्या पत्रांतून प्रसिद्ध झालीच आहे. व सर्व लोकांस ही बातमी ऐकून वाईट वाटलें असेल यांत शंका नाहीं. येथील केसरी पत्रांत त्यांचे मृत्यूवर एक लहानसा पण चटकदार स्फुट लेख आला होता, व जरी भाऊरावानें आपल्या मृत्युपत्रानें २।३ हजार रुपये सार्वजनिक कृत्याकडे दिल्याचा केसरीकर्त्यांच्या मनावर विशेष ठसा झाल्यामुळें त्यांस मृत्युलेख लिहिण्याची इच्छा झाली असें कित्येक लोकांचें येथें ह्मणणें आहे, तथापि भाऊराव हा गृहस्थ आपल्या गुणांनीं इतका प्रिय झाला होता कीं, त्यानें सार्वजनिक कामाकडे पैसे दिले नसते तरीही केसरीमध्यें त्याचा मृत्युलेख येणें जरूर होतें. केसरीमराठाकर्ते व न्यूस्कूल मंडळी यांचा व कै० अण्णा किर्लोसकर यांचा पूर्वींचा फार ऋणानुबंध होता, व केसरीमध्यें किर्लोसकर मंडळीच्या नेहमीं जाहिराती आंतल्या बाजूस येतात, या गोष्टीवरून केसरीकारांस अण्णा

किर्लोसकरांच्या नाटकसंस्थेचा नेहमीं अभिमान असे व आहे ही गोष्ट कोणासही कळून येण्यासारखी आहे. असो. काळ-पत्रामध्येंही—एका गृहस्थानें पत्रद्वारें भाऊराव कोल्हटकरांची पुष्कळ स्तुति केली आहे. तात्पर्य. नाटककर्त्यांच्या नशिबीं नेहमीं जो सभ्यजनांकडून तिरस्कार मिळावयाचा ठालेला असतो, तो तिरस्कार भाऊरावांच्या वांट्यास आला नाहीं; व जर ते अगदीं निर्व्यसनी असते तर त्यांची याहून जास्त चहा झाली असती. तात्पर्य, त्यांचे आंगच्या गुणांमध्येंच इतकी जबर मोहनी भरली होती कीं, लोकांस त्यांस न चाहणें अशक्यच होतें असें म्हटलें तरी चालेल. भाऊराव कोल्हटकर हे बडोद्याकडचे असें मीं ऐकतों. त्यांचे वडील बंधूही चांगले गायक असून बडोद्यास नोकर आहेत असें म्हणतात. तात्पर्य-भाऊराव कोल्हटकरांचे मृत्यूनें बडोद्याच्या लोकांस फार वाईट वाटलें असेल यांत शंका नाहीं. परंतु आज जो माझ्या पत्रास हा विषय घेतलेला आहे तो स्थानिक किंबहुना भाऊराव कोल्हटकराचे व्यक्तीकडे लक्ष देऊन घेतलेला नाहीं. परंतु भाऊरावांचे मृत्यूनें, सुमारें वीस वर्षांमागें जी एक अभिनव ललितकलाप्रवर्तक संस्था अस्तित्वांत आली व जिनें सर्व महाराष्ट्रभरसेंच काय पण उत्तरेस उज्जनीपर्यंत आपलें नांव ज्याचे त्याचें तोंडीं केलें, त्या संस्थेचा एक आधार-स्तंभ व अखेरचा चालक नाहींसा होऊन "संगीत नाटक" हा विषय लोकांचे नजरेपुढें आज येऊन बसला आहे."

---

## भाऊरावांच्या मागें !

भाऊरावांच्या कुटुंबांत अपत्यसुख मुळींच नाहीं. बरीच संतति झाली होती, परंतु ती अल्पायुषी निपजली. मातोश्री, कुटुंब, दोन बंधु व दोन बहिणी हा त्यांच्या

मागें परिवार आहे. भाऊरावांचे वडील बंधु हे नोकर असून उत्तम गवई आहेत.

भाऊरावांनीं आपल्या धंद्यावर सुमारें सतरा वर्षांत पसतीस हजार रुपये कमविले असावेत. आपल्यापश्चात् आपल्यासंबंधानें कांहीं भानगड राहूं नये अशी त्यांनीं व्यवस्था लावली आहे. तसेंच आपल्या नांवचें कांहीं तरी स्मारक असावें ह्मणून दोन हजार रुपये व्यवस्थापत्रांत निराळे ठेवून त्यांची व्यवस्था तीन चांगल्या गृहस्थांवर सोंपविली आहे.

भाऊरावांच्या मरणानें आत्महितदृष्टीनें कोणाचा फायदा होईल किंवा तोटा होईल; परंतु ज्या कलेचा " धुरंधरपणा " आजपर्यंत भाऊरावांमुळें गाजला गेला तिचा विचार मनांत येऊन मात्र मोरोपंतांनीं वर्णन केल्या-प्रमाणें:—

**पडतांच भीष्म गेले सर्वांचेही पळांत आवांके।**
**नसतां धुरंधर वृषभ, बाळवृषभ रें करोनि आ वांके।**

अशी स्थिति होते.

---

## उपसंहार.

"Death openeth the gate to good fame and extinguisheth envy " असें बेकनचें वाक्य आहे. त्याप्रमाणें भाऊरावांच्या मरणानें, त्यांच्या कीर्तीचें द्वार मोकळें झालें आहे. त्यांना प्रतिस्पर्धि कोणी नव्हतेच, तेव्हां त्यांच्याशीं शत्रुत्वही कोणाचें नव्हतें. भाऊराव योद्धे नव्हते, किंवा राष्ट्रहित करणारे मुत्सद्दी नव्हते,

किंवा उत्तम कवि नव्हते; तेव्हां योद्ध्याच्या व मुत्सद्याच्या गोष्टी ऐकून उत्पन्न होणारी वीरश्री व आश्चर्य किंवा उत्तम कवीचें काव्य वाचून होणारा आनंद यांपैकीं कोणतेच मनोविकार **भाऊराव** यांचें चरित्र वाचून जागृत होणार नाहींत; हें जरी खरें आहे, तरी ज्यानें आपल्या अप्रतिम गुणांनीं नाट्यकलेचें स्वरूप एकदम पालटलें, त्याचें चरित्र त्या कलेच्या इतिहासांत निरर्थक ह्मणतां येत नाहीं. कवि, योद्धे व मुत्सद्दी यांचीं चरित्रें नसलीं तरी त्यांच्या कृति चिरकालिन असतात. शिवाजीचें व नानाफडनविसाचें चरित्र आतां वाचावयास मिळूं लागलें आहे. कालिदासाचा जन्म कोणत्या शतकांत झाला याचीच अजून शंका आहे तरी त्याची कृति अजरामर होऊन बसली आहे. तसा प्रकार नटांचा नाहीं. त्यांच्या कृतीची आठवण त्यांच्या पिढीपुरतीच. मग त्यांच्या संबंधानें परंपरेनें आख्यायिका ऐकत बसायच्या. निबंधमालेच्या "वक्तृत्व" निबंधांत यासंबंधानें बरोबर विचार केला आहे:—

" पहा कीं, एखाद्या उत्कृष्ट नटानें फार उत्तम अभिनय केला तर तो चिरकालिन करण्यास कांहीं तरी उपाय आहे काय ? तो जोंवर रंगभूमीवर आहे तोंवरच त्याचें कसब. शिल्पकारानें तयार केलेल्या वस्तु जशा पुष्कळ दिवस राहूं शकतील किंवा एखाद्या उत्तम कवीचें काव्य एकदां रचलें ह्मणजे तें जगत्प्रलयापर्यंत जसेंचें तसेंच ठेवतां येईल तशी गोष्ट वरील मनुष्याच्या कृतीविषयीं आहे काय ? फार फार झालें तर त्या नटाच्या हयातीपर्यंत तो लोकांस रंजवील, पण त्याचा अवतार एकदां

आटपला कीं पुढें त्याची करामत कशी होती आणि काय होती ती सांगतां येणेंही मुष्कील आहे. जी मूर्ति एकदां लोपली ती लोपली."

अगोदर आमची नाटयकला पाहिजे तितक्या स्थितीला अद्याप आली नाहीं. मग त्यांतल्या नटांच्या कृति चरित्राच्या रूपानें मागें राहतील असे नट आमच्यांत झाले नाहींत यांत आश्चर्य नाहीं. कदाचित प्रस्तुत चरित्रनायकासारखा एखादा नट चुकून उत्पन्न झालाच तर त्याचें चरित्र वाचणारे किती निघतील हें आतांच सांगतां येत नाहीं. **इंग्लंडांतील** प्रसिद्ध नट **ग्यारिक** याचें चरित्र ह्मणजे हजार पानांचा एक ग्रंथ आहे. त्याच्याच तोडीचे **भाऊराव** हे हिंदुस्थानातील पहिले नट होऊन गेले आहेत. व नटाचें असें चरित्र महाराष्ट्र भाषेंत हेंच पहिलें आहे. परंतु आमच्या महाराष्ट्रभाषाभक्तांना या अगदीं अल्प चरित्राचाही भार होईल कीं काय ही एक भीतीच आहे.

अशी जरी स्थिति आहे तरी **भाऊरावांच्या** चरित्रांत निदान नाटकाच्या धंद्यांतल्या लोकांना पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या आहेत. कीर्ति व नांव मिळणें याला ईश्वरी कृपा तर पाहिजेच, परंतु ती मिळविण्याकरितां प्रयत्न करणें हें प्रत्येक मनुष्याच्या हातचें आहे. **भाऊराव** नाटयकलेचें एक भूषण होऊन गेले, याचा अभिमान तो धंदा करणाराला अवश्य पाहिजे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, स्वतःच्या धंद्याचा अभिमान बाळगून धंदा करणारीं माणसें यांत किती सांपडतील याची शंका आहे. **भाऊरावांच्या**

गुणांची परीक्षा, त्यांना पाहणारे व ऐकणारे होते त्यांना जितकी झाली होती, तितकी त्यांच्या धंद्यांतल्या लोकांना झाली असेल कीं नाहीं, याचीही वानवा आहे. अशी जर स्थिति नसती तर आमच्या धंद्याची सुधारणा जी उलट दिशेनें चाललेली आपण पाहत आहों, ती सरळ दिशे-नेंच चाललेली आपण पाहिली असती. या धंद्यांतही नांव व प्रतिष्ठा मिळते हें **अण्णासाहेब,** त्यांचे वेळची मंडळी व **भाऊराव** यांच्या उदाहरणावरून दिसून येणार आहे. तो उद्देश प्रत्येकजण मनांत धरून धंदा करील तर धंद्याला उर्जित काळ येण्याला फार दिवस लागणार नाहींत.

किर्लोस्कर मंडळींशीं चंद्राचें रूपक चांगलें जमतें. तो पौर्णिमेला पूर्ण प्रकाशित असून नंतर त्याच्या कला जशा एकेक कमी होत जातात, त्याप्रमाणें **अण्णासाहेब, मोरोबा, बाळकोबा** व **भाऊराव** जय्यत असतांना, किर्लोस्कर मंडळी पूर्ण कलेच्या चंद्राप्रमाणें प्रकाशत होती; परंतु **अण्णासाहेबां**पासून तिची एकेक कला कमी होत होत **भाऊरावां**च्या मृत्यूनें सर्व कला अस्तंगत झाल्यासारखें झालें आहे ! त्या पुन्हां शुक्लपक्षाप्रमाणें वृद्धि-गत करण्याचें एकट्या **किर्लोस्कर संगीत मंडळीचेंच कर्तव्य आहे.**

**समाप्त.**

# भाऊरावावर आर्या--

सर्वांगसुंदरा ही कविकुलगुरु कालिदासकृति असली
प्राकृतजनां तथापि न ती वल्कलधारिणी तशी दिसली १
वसली सात्विक सदनीं जाल्या असुनी रजोगुणोपेता
वदली सुललित संस्कृत-वाणी नसुनीहि जाणता श्रोता २
लीलावती स्वभावें असुनि मिळेना कुणी गुणग्राही
लोप ह्मणूनि जियेच्या ललित गुणांचाहि होउनी राही ३
द्रवला बघुनि अशी ती कविकन्या पांडुरंगतनय कवी
दैवहि तिचें तयाची कांस धरायास आग्रहें सुचवी ४
लज्जावती तरी ती 'द्या मज पदरांत द्या' ह्मणे स्पष्ट
करवा रसिक जनांची भेट मला साहती न हे कष्ट ५
अण्णा ह्मणे 'मुली ये दे हा प्राचीन वेष सोडून
शुद्ध मराठिण होउनि घे रसिकांचाहि लोभ जोडून' ६
'हूं' ह्मणतांच तिला तो नेसविता होय पैठणी साडी
शिकवुनि बोल मराठी बोलाया, लक्ष्मणाकडे धाडी ७
अभिनव अभिनयलीला तिजकडुनी भाउराय तो करवी
नुरवी भगिनीक्लेशां रसिकजनांच्याहि कामना पुरवी ८
जो तो गुरुशिष्यांच्या कविकन्येच्याहि दर्शना जाय
जागा मिळे न लोकां ठेवाया रंगमंडपीं पाय ९
हा धन्य धन्य अण्णा कोणी तो भाउराय धन्य ह्मणे
एकापरीस दुसरा एक ह्मणे सरस होय खास गुणें १०
न बसे थाप डफावर नीरस होऊनि लावण्या बसल्या
हरिलें संगीतानें भाव तिथें नाच बैठकी कसल्या ११
घुंगुर तोडुनि टाकुनि खुंटीला लावुनी विणाटाळ
गणपति सरस्वतीसह बसले निश्चित बाळगोपाळ १२
अल्लल्ल् न पडे कर्णी मौन बकासुर हिडिंब आदरिती
रानोमाळ पलायन शूर्पणखा त्राटिका बकी करिती १३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

गाणीं मागें पडलीं सगुणा शांता अनी वनी तापी
ह्मणती मुरोनि पल्यांकृति सुभद्राशकुंतलालापीं १४
पदवीधरही झाले लुब्ध तिथें नायका मुलें कीय
ह्मणती सर्व अहा ही धन्य महाराष्ट्रभारतीमाय १५
निज भजनीं रत झाला सर्व महाराष्ट्रदेश पाहून
इष्ट मराठी भाषा अन्य ह्मणे मज नसेच याहून १६
वाढे जनीं रसिकता सदभिरुचिहि सहज वाढती झाली
कवि ह्मणती तुज सुदशा सत्य महाराष्ट्रभारती आली १७
करुनि पराक्रम इतका सर्व महाराष्ट्रमंडलामाजी
गाजी ह्मणवुनि घेते नट असती ते कुठें अहा आजी १८
नाट्याचार्य कुठेंहो असती बळवंतराव अण्णा ते
विसरूनि काय गेला रसिकांचें भाउरायही नातें १९
गेले अहा रसिकहो गेले ते मित्र अन्य लोकातें
अवतार कार्य त्यांचें झालें संपूर्ण त्यांचिया हातें २०
भरतमुनीश्वर तुमच्या अण्णाला सुरसभेंत वसवील
संदेह काय भाऊ-रायहि गंधर्व लोक वसवील २१
संगीत काय, सादर निज भाषेची करावया सेवा
निजबांधवांस लावुनि सुयशाचा जोडिला तिहीं ठेवा २२
अभिनय अंतरला तो जरि मधुरालाप तोहि अंतरला
उरला तथापि आहे त्याचा संस्कार मानसावरला २३
इतिहासकार त्याच्या हितपरिणामा सदा पहातील
कविवर त्या अण्णाच्या भाऊच्याही यशास गातील २४

रा० रा० गंगाधर रामचंद्र मोगरे मुंबई येथील आधुनिक प्रसिद्ध कवी यांनीं वरील आर्या मेहेरबानीनें करून दिल्या त्या प्रस्तुत चरित्रास जोडल्या आहेत.

---

REFBK-0000015

# शिळ्या पुस्तकांच्या जाहिराती

| | |
|---|---|
| **लंदनरहस्य** भाग ७ | किं. ४ रु. ट. हं. शिवा |
| **मुद्रणदर्पण** अथवा छाप. | |
| खान्याच्या माहितीचें पुस्तक. | „ ०६ आणे. |

सदहू पुस्तकें किर्लोस्कर मंडळी असेल तेथें मिळतील.